मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर, विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | शुक्रवार, २२ ऑगस्ट २०२५ | वर्ष: १ | अंक:८२ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

## बीडमधील बेपत्ता होमगार्ड महिलेचा मृतदेह आढळला

**बीड, दि. २१ प्रतिनिधी**

शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत एका होमगार्ड महिलेचा मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. आयोध्या राहुल व्हरकटे असे मयत महिलेचे नाव असून त्या गेवराई येथे होमगार्ड म्हणून कार्यरत होत्या. चार दिवसांपूर्वी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात आयोध्या बेपत्ता असल्याची तक्रार नोंदविण्यात आली होती. आणि आज दुपारच्या सुमारास त्यांचा मृतदेह एका नाल्यात आढळून आला. ही हत्या की आत्महत्या? याचा तपास पोलीस करत आहेत. मात्र एका होमगार्ड महिलेचा मृतदेह आढळून आल्यानं परिसरात खळबळ उडाली आहे.

अग्रलेख

**खरीखरी**

## जीएसटीची सूट लाभदायी ठरो

**आज जीएसटी म्हणजेच वस्तू, सेवा कराच्या बाबतीत पंतप्रधान मोदी यांनी मोठी घोषणा केल्याने जीएसटी करात बदल होणार आहे. आतापर्यंत पाच टक्के, बारा टक्के, १८ टक्के आणि २८ टक्के अशा चार प्रकारच्या जीएसटीमुळे सर्वांनाच थोडाफार त्रास होत होता. पण आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एकूणच या परिस्थितीवर जनतेला सवलत देण्याचे ठरवल्याने आजच्या बैठकी मुळे वस्तू सेवा करांमध्ये लक्षणीय बदल झाल्याचे दिसून येइल असे वाटते. राहुल गांधी यांनी याबाबत वारंवार टीका केली होती. देशातील सर्वच स्तरांवर या जीएसटीमुळे जो असंतोष होता त्यामुळे त्यात बदल करणे गरजेचे होते. त्यातच आता मतदार याद्यांच्या बाबतीत जो प्रकार झालेला आहे आणि त्यामुळे देशातील वातावरण मोठ्या प्रमाणात बदललेले आहे. त्यामुळे तोडगा म्हणून बरेचसे किंवा विविध बाबतीत वेगवेगळे निर्णय घेण्यात येतील असे दिसते कदाचित त्यापैकी हा एक निर्णय असावा. जीएसटीमुळे त्रस्त झालेल्या अनेकांसाठी हा बदल सुखदायी होइल यात शंका नाही. आज हॉटेलच्या तीनशे रुपयांच्या खोलीसाठी सुद्धा १२% जीएसटी आहे. अशा अनेक गोष्टींवर असलेला हा जीएसटी पाच टक्केवर येणार की, १८ टक्क्यांवर जाणार याबाबतीत संभ्रम निर्माण होऊ शकतो. आता ज्या चैनीच्या वस्तूंवर म्हणजेच महागड्या गाड्या वगैरेवर २८% वस्तू सेवा कर आहे तो कर १८% होणार आहे म्हणजेच श्रीमंतांना बरीच मोठी सूट मिळणार आहे. ५० लाख, ७० लाख ते एक करोडच्या गाडीवर जो कर आहे तो जवळजवळ दहा टक्क्यांनी कमी होणार आहे. म्हणजेच या जीएसटी कपातीचा मोठ्या खरेदीदारांना किंवा मोठी खरेदी करणाऱ्या मोठ्या लोकांना बराच मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या जीएसटीचे उत्पन्न अत्यंत मोठ्या प्रमाणावर वाढलेले आहे त्यामुळे पुढे कमी होणाऱ्या जीएसटी चा फायदा सर्वसामान्यांनाही मिळावा अशी साधीसुधी अपेक्षा असली. तरी पुढे त्याबाबतीत काय निर्णय होतील, हे केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या निर्णय आणि समन्वयावर अवलंबून आहे. आपल्याला गेल्या अनेक वर्षांमध्ये अशा प्रकारची सुखद बातमी पहिल्यांदाच मिळणार आहे. देशातील कोणतीही वस्तू जीएसटी शिवाय मिळत नाही आता तरी सरकारने काही वस्तू वरील जीएसटी रद्द केला तर सामान्यांवर सरकारचे उपकार होतील. तरीही आज सरकारने जो सकारात्मक निर्णयाचा इरादा जाहीर केला आहे त्यामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे १५ ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरील भाषण कारणीभूत आहे. त्या १०३ मिनिटांच्या अत्यंत तेजस्वी भाषणात अनेक बाबींचा त्यांनी उहापोह केला पण त्यामध्ये सर्वाधिक महत्त्वाचा प्रश्न जीएसटीचा होता आणि तो आता जवळजवळ जनहितार्थ निर्णय होणार आहे. जर खरोखरच असे असेल तर हा अत्यंत खुशीचा मामला आहे. याबद्दल केंद्र सरकार आणि राज्य सरकारचे अभिनंदन केलेच पाहिजे.**

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

# 12%, 28%चा जीएसटी स्लॅब संपवण्याचा प्रस्ताव राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या गटाने स्वीकारला

**नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था**

राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या गटाच्या (GoM) एका महत्त्वाच्या बैठकीत, वस्तू आणि सेवा कराचे (जीएसटी) दर तर्कसंगत करण्याचा केंद्र सरकारचा प्रस्ताव स्वीकारण्यात आला. बैठकीत, टॅक्स स्लॅब कमी करुन ५ टक्के आणि १८ टक्के करण्याच्या केंद्राच्या प्रस्तावावर चर्चा झाली, ज्याला GoM नं सहमती दर्शवली आहे. केंद्र सरकारनं जीएसटीमध्ये मोठ्या प्रमाणात बदल प्रस्तावित केला आहे, ज्यामध्ये १२% आणि २८% स्लॅब काढून टाकून फक्त ५% आणि १८% असे दोन दर ठेवण्याचं म्हटलंय. याशिवाय, तंबाखू आणि पान मसाला सारख्या वस्तूंवर ४०% चा विशेष दर लागू करता येईल.

खरंतर, केंद्र सरकारजी एसटीमध्ये बदल करून सामान्य व्यक्ती, शेतकरी, मध्यमवर्ग आणि एमएसएमई यांना दिलासा देऊ इच्छिते. याद्वारे करप्रणालीही सोपी करण्यात येणार आहे.

**नवी प्रणाली लागू होणार**

बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्यीय मंत्रिगटानं ५, १२, १८ आणि २८ टक्के या सध्याच्या चार दराच्या प्रणालीमध्ये बदल करण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे. आता त्याऐवजी फक्त दोन टॅक्स स्लॅब लागू होतील. जीवनावश्यक वस्तूंवर ५ टक्के आणि सामान्य वस्तूंवर १८ टक्के कर लादण्याचा प्रस्ताव होता. त्याच वेळी, तंबाखूसारख्या काही हानिकारक वस्तूंवर ४०% दर लागू होईल.

**बदलांबद्दल अर्थमंत्र्यांनी काय म्हटले?**

दरांमध्ये सुधारणा केल्यानं सामान्य व्यक्ती, शेतकरी, मध्यमवर्ग आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) अधिक दिलासा मिळेल. तसेच, एक सोपी आणि पारदर्शक कर प्रणाली सुनिश्चित केली जाईल, असं अर्थमंत्री निर्मला सीतारामन म्हणाल्या होत्या. सध्या जीएसटी ५, १२, १८ आणि २८ टक्के दरानं आकारला जातो. अन्न आणि जीवनावश्यक वस्तूंवर शून्य किंवा पाच टक्के कर आकारला जातो. त्याच वेळी, लक्झरी आणि हानिकारक वस्तूंवर २८ टक्के दरानं कर आकारला जातो, त्याच्यावर उपकर देखील आकारला जातो.




## रोहित पवारांना पीएमएलए कोर्टाचा मोठा दिलासा, जामीन मंजूर

**मुंबई, दि. २१ प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (शिखर बँक) घोटाळ्याशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरणी शरद पवारांच्या पक्षाचे आमदार रोहित पवारांना दिलासा मिळाला आहे. आमदार रोहित पवारांची जातमुचलक्यावर सुटका केली आहे. रोहित पवारांची पीएमएलए कोर्टाकडून जातमुचालक्यावर सुटका करण्यात आली आहे. रोहित पवारांना अटक न झाल्याने कोर्टाने त्यांची जातमुचालक्यावर सुटका केली. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळ्याप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाने रोहित पवार आणि इतर काही व्यक्तींविरुद्ध मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक कायदा, 2002 अंतर्गत पुरवणी आरोपपत्र मुंबईतील विशेष न्यायालयात दाखल केली होती.



आरोपपत्र दाखल होण्यापूर्वीच ईडीने रोहित पवार यांच्या बारामती ॲग्रो कंपनीची ५० कोटी रुपयांहून अधिक किमतीची मालमत्ता जप्त केली होती. जानेवारी २०२३ मध्ये ईडीने बारामती ॲग्रोच्या ठिकाणांसह विविध ठिकाणी छापे टाकले. त्यानंतर, कर्जत-जामखेड मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांना चौकशीसाठी ईडीच्या मुंबई कार्यालयात हजर राहण्यास सांगण्यात आले होते.

ईडीचा तपास हा ऑगस्ट २०१९ मध्ये मुंबई आर्थिक गुन्हे शाखेने नोंदवलेल्या एफआयआरवर आधारित आहे. या एफआयआरमध्ये भारतीय दंड विधान आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या विविध कलमांखाली गंभीर आरोपांचा समावेश करण्यात आला होता. एफआयआरनुसार, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे तत्कालीन अधिकारी आणि संचालकांनी अनेक सहकारी साखर कारखाने बेकायदेशीर पद्धतीने अत्यल्प किमतीत आपल्या निकटवर्तीयांना आणि संबंधित खाजगी कंपन्यांना विकले. या विक्रीत ना पारदर्शक प्रक्रिया राबवली, ना कायदेशीर औपचारिकता पाळली गेली.

२००९ मध्ये कन्नड एसएसकेकडून ८०.५६ कोटी रुपयांचे थकबाकी कर्ज वसूल करण्यासाठी एमएससीबीने कारखान्याच्या मालमत्तेचा ताबा घेतला. त्यानंतर संशयास्पद पद्धतीने कमी राखीव किंमत ठेवून लिलाव प्रक्रिया पार पडली. ईडीच्या आरोपानुसार, या लिलाव प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्या. सर्वोच्च बोली लावणाऱ्या प्रतिस्पर्ध्याला कमकुवत कारणे दाखवून अपात्र ठरवण्यात आले, तर बारामती ॲग्रोशी संबंध असलेल्या व्यक्तीला, ज्याची आर्थिक पात्रता आणि अनुभव संशयास्पद होते, त्यालाच लिलावात कायम ठेवण्यात आले.

## इंडिया आघाडीतर्फे उपराष्ट्रपती पदासाठी बी. सुदर्शन रेड्डी यांचा अर्ज दाखल

**नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था**

इंडिया आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार, सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांनी गुरुवारी (दि. २१ ऑगस्ट) अर्ज दाखल केला. यावेळी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष, राज्यसभा खासदार मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी आणि लोकसभा खासदार राहुल गांधी उपस्थित होते. काल बुधवारी (दि. २० ऑगस्ट) महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला होता. यामुळे उपराष्ट्रपतीपदासाठी एनडीएचे सी. पी. राधाकृष्णन विरुद्ध इंडिया आघाडीचे बी. सुदर्शन रेड्डी यांच्यात थेट सामना होईल.




बी. सुदर्शन रेड्डी हे कायद्याच्या क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्ती आहेत. ७९ वर्षीय बी. सुदर्शन रेड्डी यांनी २७ डिसेंबर १९७१ रोजी आंध्र प्रदेश बार कौन्सिल, हैदराबाद येथे वकील म्हणून कारकिर्दीला सुरुवात केली. त्यांनी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयात वकिली केली. २ मे १९९५ रोजी त्यांची आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर ५ डिसेंबर २००५ रोजी ते गुवाहाटी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती झाले. पुढे १२ जानेवारी २००७ रोजी त्यांची सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीपदी नियुक्ती झाली आणि ते ८ जुलै २०११ रोजी निवृत्त झाले.

पुढच्या वर्षी मार्च एप्रिल दरम्यान तामिळनाडूमध्ये विधानसभा निवडणूक होणार आहेत. या पार्श्वभूमीवर उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत भाजपने मुळचे तामिळनाडूमधील असेलेले सी. पी. राधाकृष्णन यांना उमदेवारी दिली. यामुळे दक्षिण भारतात विशेषतः तामिळनाडूत या माध्यमातून चांगला संदेश जाईल. तसेच यानिमित्ताने भाजपला दक्षिण भारतात पाय आणखी घट्ट करता येईल, असा भाजपचा कयास असण्याची शक्यता आहे. सध्याचे राजकारण पाहता काँग्रेस आणि सत्ताधारी पक्षांची ही मोठी खेळी मानली जात होती. मात्र काँग्रेसनेही उपराष्ट्रपतीपदासाठी दक्षिण भारतातील उमेदवार देऊन काँग्रेसच्या या खेळीला चांगलेच प्रत्युत्तर दिले आहे.

## आम्हाला तुमचाही पाठिंबा हवाय

### फडणवीसांचा शरद पवार- उद्धव ठाकरेंना फोन



**मुंबई, दि. २१ प्रतिनिधी**

लोकसभा, विधानसभा निवडणुकांनंतर सध्या राज्याचे लक्ष लागले ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे. मात्र, तत्पूर्वीच उपराष्ट्रपती जगदीश धनखड यांनी आपल्या पदाचा अचानक राजीनामा दिल्याने उपराष्ट्रपती पदाची निवडणूक जाहीर झाली आहे. भाजप एनडीएकडून उपराष्ट्रपती पदासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल सी. राधाकृष्णन यांना उमेदवारी जाहीर करण्यात आल्याने ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशीच भाजपची इच्छा आहे. मात्र, काँग्रेस इंडिया आघाडीकडूनही आपला उमेदवार जाहीर करण्यात आला आहे. विशेष म्हणजे आजच प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत बी. सुदर्शन रेड्डी यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंना फोन केला.

उपराष्ट्रपती पदासाठी एनडीए उमेदवार सी. पी. राधाकृष्णन यांना पाठिंबा मागण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार आणि उद्धव ठाकरे दोघांनाही फोन केला होता. उपराष्ट्रपती पदाचे एनडीएचे उमेदवार राज्यपाल राधाकृष्णन हे महाराष्ट्रातील मतदार असल्याने त्यांना पाठिंबा द्यावा, अशी विनंती फडणवीसांनी दोन्ही नेत्यांकडे केल्याची सूत्रांची माहिती आहे. उपराष्ट्रपतीपदासाठीच्या निवडणुकीत आपला तुमचाही पाठिंबा हवाय, असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांना फोन केला. मात्र, काँग्रेस प्रदेशाध्यक्षांना फोन केल्याचे कुठलेही वृत्त नाही. त्यामुळे, फडणवीसांनी ठाकरे आणि पवारांना फोन करुन पाठिंबा मागितला आहे. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. महाराष्ट्रातील सर्वपक्षीय नेत्यांशी देवेंद्र फडणवीस संवाद साधत आहेत. उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीसाठी फडणवीस मविआतील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा करत आहेत. एनडीएच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याबाबत ही चर्चा होत असून याबाबतची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे, त्याचाच एक भाग म्हणून फडणवीसांनी ठाकरे-पवारांना फोन केले. खासदार संजय राऊत यांनीही यास दुजोरा दिला आहे.

## राज ठाकरेंनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**मुंबई, दि. २१ प्रतिनिधी**

गेले चार दिवस मुसळधार पावसाने मुंबईकरांचे अक्षरशः हाल केले. शहरातील अनेक भागांत पाणी साचल्याने वाहतूक व्यवस्थेचा बट्ट्याबोळ झाला. रस्ते आणि ब्रिजवर पाणी साचले, रेल्वेसेवा ठप्प झाली आणि लोकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. या पार्श्वभूमीवर मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी अचानक भेट घेतली. सुमारे ४५ मिनिटे चाललेल्या या चर्चेनंतर राज ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली.

राज ठाकरे म्हणाले की, "गेल्या काही महिन्यांपासून मी मुख्यमंत्र्यांशी काही महत्त्वाच्या विषयांवर बोलत होतो. साधारणपणे त्याचा कशा प्रकारे आराखडा आखता येईल? मी २०१४ ला ॲस्थेटिक विषयाशी एक डॉक्युमेंटरी केली होती, जी आजही यूट्यूबवर आहे. जी मी इतर भाषांमध्येही करतोय. टाऊन प्लॅनिंग या गोष्टी माझ्या आवडीचे विषय आहेत. एका साहित्यिकांचं चांगलं वाक्य आहे. तुमच्याकडची लहान मुलं कोणती गाणी गातात सांगा, मी तुमच्या देशातील भविष्य सांगतो. मला ते बदलावंस वाटतं, ते वाक्य असं असावं, तुमच्याकडे ट्रॅफिकची परिस्थिती दाखवा मी तुमच्या देशाची परिस्थिती सांगतो."



पुढे या भेटीत नेमकी कशावर चर्चा झाली हे राज ठाकरे यांनी सांगितले. ते म्हणाले, "आज जी शहरं आहेत; मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, संभाजीनगर. या बऱ्याचशा शहरांमध्ये आज खूप मोठ्या प्रमाणावर रिडेव्हलपमेंटची कामं होत आहेत, त्यात अनधिकृत गोष्टी पण होत आहेत. आज जिकडे ५० माणसं राहत होती, तिथे एका जागेत ५०० माणसं राहायला आली आहेत. माणसं वाढली आहेत, त्यांच्या गाड्या वाढल्या आहेत, ट्रॅफिक वाढलं आहे. सगळ्या गोष्टी रस्त्यावर आल्या आहेत."

"साधारणपे २६ जुलैला पाऊस पडला होता, तो ९०० मिमी इतका होता, काल परवा पाऊस पडला तो ४०० मिमी होता. त्या ४०० मिमीमध्ये मुंबईचा केआस बघितलं, तर लक्षात येईल की रस्ते कमी आहेत. ट्राफिकला शिस्त नाही. काय झालंय आपण कबुतर, हत्ती या गोष्टींमध्ये इतके अडकलोय, की या ज्या गंभीर समस्या आहेत त्याच्याकडे कोणाचंच लक्ष नाही. लोकांना गाड्या पार्क करण्यासाठी जे पार्किंग लॉट उभे केले पाहिजे सरकारकडून, पालिकेकडून तिथे लोकं जात नाहीत. तिथे गेलं पाहिजे. बाहेरून जी लोकं आली आहेत. ओला, उबेर चालवतात. त्यांना माहीतच नाहीये, इथे कशाप्रकारे गाड्या पार्क केल्या पाहिजेत. लोकांना शिस्त लागली पाहिजे. त्यासाठी मी छोटासा आराखडा मुख्यमंत्र्यांना दिला."

**अर्बन नक्षलपेक्षा इथे शिस्त महत्त्वाची**

"ज्यांना गाड्याची लायसन्स देताय त्यांना शिकवलं जात नाही कुठे गाडी पार्क करायची, कसं वागायचं. त्यांना कुठल्याही प्रकारचा दंड नसल्यामुळे किंवा कोणत्याही प्रकारची भीती नाही. नको तेथे भीती दाखवतात, अर्बन नक्षलपेक्षा इथे शिस्त लावा. इथे गरजेचे आहे," असे राज ठाकरे म्हणाले. "ज्या प्रकारे जमिनी गौतम अदानीच्या घशात घातल्या जात आहेत, काय होणार आहे त्या धारावीमध्ये मला सांगा? कुठचे रस्ते होणार आहेत?" असा सवालही त्यांनी केला.

## मुख्यमंत्र्यांना भेटणे हा राजकीय अपराध होत नाही- संजय राऊत

आज सकाळी पत्रकार परिषदेत संजय राऊत यांना याबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर संजय राऊत म्हणाले, "माध्यमांनाच या भेटीची चिंता लागली आहे. मुख्यमंत्र्यांना विरोधी पक्षाचे नेते भेटण्यासाठी गेले असतील आणि त्यांच्यात काही चर्चा सुरू असेल तर ती होऊ द्या. राज ठाकरे आणि फडणवीस याआधीही अनेकदा भेटले आहेत."

"राज्यातले दोन प्रमुख नेते भेटत आहेत. त्यांच्यात बंद दाराआड चर्चा होत असेल तर त्यांनीच भेट घेण्याचे कारण सांगितले पाहिजे. राज ठाकरे यांचा स्वभाव पाहता, ते स्वतःच याबद्दल परखडपणे आणि स्पष्ट बोलतील", असेही संजय राऊत म्हणाले. "राज ठाकरे राज्याच्या मुख्यमंत्र्यांना भेटले आहेत. मुख्यमंत्र्यांना भेटणे हा राजकीय अपराध होत नाही. माझे किंवा उद्धव ठाकरेंचे काही सामाजिक काम असेल तर आम्हीही मुख्यमंत्र्यांना भेटू शकतो. राज्याचा मुख्यमंत्री एका गटाचा किंवा पक्षाचा नसतो. ते ११ कोटी जनतेचे प्रतिनिधी आहेत", असेही संजय राऊत यावेळी म्हणाले.

## खासदार सुनेत्रा पवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमात

**नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या राज्यसभा खासदार सुनेत्रा पवार या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका कार्यक्रमाला हजर राहिल्याची बाब समोर आली आहे. भाजपा खासदार कंगना रणौत यांच्या घरी आयोजित 'राष्ट्र सेविका समिती'च्या महिला शाखेच्या कार्यक्रमाला त्यांनी हजेरी लावली होती. या कार्यक्रमाचा फोटो समोर आल्यानंतर यावरून राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते आणि आमदार रोहित पवारांनी हा दुटप्पीपणा अल्याचे म्हटले आहे. दरम्यान यावर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे.

भाजपाच्या खासदार कंगना रणौत यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट केली आहे. यामध्ये त्यांनी काही फोटो पोस्ट केले आहेत. ज्यामध्ये एका फोटोत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा पवार या देखील पाहायला मिळत आहेत.

"आज माझ्या घरी राष्ट्र सेविका समिती महिला शाखेचे आयोजन केले होते. आपण सर्वजण एकत्र येऊन सनातन मुल्य, हिंदू संस्कृती आणि राष्ट्रीय चेतना आणखी प्रखर बनवू. आम्हा सर्वांचा संकल्प आहे की मानव सेवा आणि राष्ट्राचे निर्माण आणि सनातन संस्कृतीचे संरक्षण यासाठी सतत कार्य करत राहू. महिलांची जागरूकता आणि सहभागच देशाला बलवान बनवतो," असे कंगना रणौत त्यांच्या पोस्टमध्ये म्हणाल्या आहेत.

दरम्यान वर्धा येथील पत्रकार परिषदेत अजित पवारांना या कार्यक्रमाबद्दल विचारले असता अजित पवारांनी आपल्याला याबद्दल माहिती नसल्याचे उत्तर दिले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, "मी विचारतो. मला माहिती नाही.



माझी बायको सकाळपासून संध्याकाळपर्यंत कुठे जाते ते मिनीट-मिनीट मला माहिती नसतं. मी आता विचारतो की, का गं कुठं गेली होती?" असं खोचक उत्तर अजित पवार यांनी दिले.

दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते रोहित पवार यांनी मात्र यावरून टीका केली आहे. अजित पवारांच्या पक्षाची ही दुटप्पी भूमिका असल्याचे रोहित पवार म्हणाले आहेत.

"जेव्हा ओबीसी आरक्षण दिलं गेलं होतं तेव्हा कमंडल यात्रा काय होती, हे आरएसएसच्या प्रमुखांना त्यांनी विचारलं पाहिजे. सत्तेत ते गेलेत, त्याची कारणं वेगळी आहेत. पण तिथं गेल्यानंतर त्यांचे विचार काही त्यांनी स्वीकारले नसतील. पण कुठेतरी त्यांच्यावर प्रेशर असेल की एखाद्या बैठकीला या, एखादा फोटो येऊद्या... म्हणजे हे आरएसएसचा विचार स्वीकारत असल्याचा संदेश जातो. एकाबाजूला तुम्ही पुरोगामी विचार म्हणता, एकाबाजूला चव्हाण साहेबांचं, शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचे नाव घेता आणि दुसरीकडे आरएसएसच्या बैठकीला तुम्हा किंवा तुमचे प्रतिनिधी जात असतील, तर ही दुटप्पी भूमिका आहे आणि आज राजकारणात लोकांना दुटप्पी भूमिका नकोय," असे रोहित पवार म्हणाले.

## कोकणात जाणाऱ्या भाविकांसाठी टोलमाफी

**मुंबई, दि. २१ प्रतिनिधी**

यंदाच्या गणेशोत्सवात कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी राज्य सरकारकडून टोलमाफीचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय कोकणात निघालेल्या लाखो भाविकांच्या प्रवासाला नक्कीच सुखकर ठरणार आहे. पमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा निर्णय जाहीर केला असून तो २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर या काळात लागू राहणार आहे.



मुंबई–बेंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील रस्ते या सर्व ठिकाणी गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या वाहनांना व एसटी बसेसना विशेष टोलमाफी मिळणार आहे.

यासाठी शासनाने "गणेशोत्सव २०२५ – कोकण दर्शन" या नावाने खास टोलमाफी पास तयार केले आहेत. या पासवर वाहन क्रमांक व मालकाची नोंद असेल. पास परतीच्या प्रवासासाठीही ग्राह्य राहतील. हे पास प्रादेशिक परिवहन अधिकारी, पोलीस व वाहतूक विभागाकडून उपलब्ध होणार आहेत.

यासोबतच ग्रामीण व शहरी पोलीस, परिवहन विभागाने समन्वय साधून पास वाटप, जाहीरात आणि सूचना नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचवाव्यात, असे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्र्यांकडून देण्यात आले आहेत.

या निर्णयामुळे कोकणाच्या दिशेने निघालेल्या भाविकांच्या खिशाला व प्रवासाला मोठा दिलासा मिळणार आहे.

**महत्त्वाचे**

## जागतिक छायाचित्रण दिनी ६१ छायाचित्रकारांसह महिलांचा सन्मान

**नाशिक ।** चंदू काका सराफ नाशिक शाखेच्यावतीने जागतिक छायाचित्रण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात नाशिक फोटोग्राफर्स असोसिएशनचे अध्यक्ष संजय जगताप व सर्व पदाधिकारी यांच्या हस्ते कॅमेऱ्याचे



पूजन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित सर्व महिला फोटोग्राफर, प्रेस फोटोग्राफर, फोटोग्राफी क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी नाशिकमधील निमंत्रित एकूण ६१ छायाचित्रकार व नाशिक असोसिएशनचे पदाधिकारी, प्रेस फोटोग्राफर व महिला छायाचित्रकार, सहकारी उपस्थिती होते. मार्केटिंगचे क्लस्टर मॅनेजर गजानन बारगजे व फ्लोअर मॅनेजर जितेंद्र नाथ यांनी कंपनी विषयी माहिती देऊन ऑफर्स व भिशी योजनांची माहिती दिली. नाशिक फोटोग्राफर्स असोसिएशनचे सेक्रेटरी नंदू विसपुते यांनी आपले मनोगत व्यक्त करताना चंदुकाका सराफ सुवर्णपेढीचे आभार मानून पुढील शुभेच्छा दिल्या. सर्व मान्यवरांना शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.

## श्रीक्षेत्र बळी महाराज देवस्थान येथे अखंड हरिनाम सप्ताहची समाप्ती

**नाशिक ।** नाशिक येथील नाशिक मनपाच्या हद्दीत असलेल्या आडगाव. परिसरातील श्रीक्षेत्र बळी महाराज देवस्थान येथे दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा श्रावण मासानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहचे आयोजन करण्यात आले होते. या सात दिवसाच्या सप्ताहमध्ये बळी मंदिरमध्ये दररोज सकाळपासून



तर रात्री दहा वाजेपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केले असून, या सप्ताहचे आयोजन आयोजित केले आहे. यामध्ये. सकाळी काकडा आरती, देवपूजा. आरती. ज्ञानेश्वरी पारायण, ग्रंथवाचन असे बरेच धार्मिक कार्यक्रम आयोजित केले असून, रात्री. 8 ते 10 वाजेपर्यंत. कीर्तन आयोजित केले होते. काल्याच्या कीर्तनाने महाप्रसादाने या सप्ताहची सांगता झाली. अखंड परिसरातील बळी मंदिर, हनुमाननगर, अमृतधाम जत्रा परिसरमधील नागरिकांनी या अखंड हरिणाम सप्ताहला उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला.

# जानोरी ग्रामसभेत शिक्षक १००% नेमणूक संदर्भात ठराव दिल्यास हजर न करून घेण्याचा पवित्रा

**दिंडोरी ।** जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षक बदल्यामधील धोरणामुळे शहरापासून जवळ असलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याने जि.प. शाळा जानोरी येथे संवर्ग ०१ चे शिक्षक १००% नेमणूक न करणेबाबतचा ठराव जानोरी ग्रामसभेत करण्यात आला आहे. तरीही शासनाने १००% संवर्ग १ मधून शिक्षक दिल्यास त्यांना हजर न करून घेण्याचा पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे.

दिंडोरी तालुक्यातील जानोरी येथे ऑगस्ट महिन्याची ग्रामसभा ग्रामपंचायत सभागृहात पार पडली. यावेळी अध्यक्षस्थानी सरपंच सुभाष नेहरे होते. यावेळी ग्रामविकास अधिकारी नानाभाऊ खांडेकर यांनी मागील सभेचे प्रोसिडिंग वाचन केले. यावेळी गावातील विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी शिक्षण विभागाचा मुद्दा जोरात गाजला. यावेळी ग्रामस्थ संदीप गुंजाळ यांनी शिक्षक बदली विषयी प्रश्न उपस्थित केला. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षाच्या जिल्हा परिषद शाळांच्या शिक्षकांच्या बदल्या ऑनलाइन पद्धतीने पार पडत आहे. या बदल्या होत असतांना यामध्ये शारीरिक दृष्ट्या व्याधी, आजार किंवा शारीरिक दृष्ट्या अक्षम असणाऱ्या उमेदवारांना बदल्यांसाठी संवर्ग-१ प्रमाणे प्राधान्य दिले जाते. परंतु सोयीच्या दृष्टीने प्रथम प्राधान्याने शहरापासूनच्या जवळच्या शाळांमध्ये बदली करून घेतात व त्यांना तश्या बदल्या दिल्या जातात. त्यांच्या आरोग्यविषयक प्रश्नामुळे ही सुविधा देणे योग्यही आहे परंतु हे सगळं करत असताना नाशिक शहराच्या जवळपास असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या शाळेत एकूण शिक्षकांपैकी बहुतांश किंवा सर्व शिक्षक या संवर्ग-१ मधील शारीरिक व मानसिक दृष्ट्या अक्षम असणारे त्या शाळेत बदली होऊन आले आहेत. सन २०२५-२६ पासून सी.बी.एस.ई अभ्यासक्रम जिल्हा परिषद शाळांमध्ये सुरू करण्याची तयारी शासन करत असताना शहरा लगत असणाऱ्या जिल्हा परिषद शाळांमध्ये सर्व शिक्षक 53 पेक्षा अधिक वयोगटाचे व दुर्धर आजाराने व्याधीग्रस्त असतील तर शाळेतील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण कसे मिळणार? हा देखील मोठा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झालेला आहे.



त्यातून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान देखील आहे व जिल्हा परिषद शालेकडील मुलांचा कल कमी होत असून जिल्हा परिषद शाळेच्या दर्जावर याचा परीणाम होत आहे याचा विचार होणे गरजचे आहे. शिक्षकांच्या बदल्या होत असतांना संवर्ग ०१ ला प्राधान्य देत असतांना प्रमाण ठरणे आवश्यक आहे. एकाच शाळांमध्ये १००% संवर्ग ०१ चे शिक्षक न भरता यामध्ये ठराविक टक्केवारी बंधनकारक करून इतर शिक्षकांना देखील अशा शाळांवर प्राधान्य देता येईल याचा विचार होणे गरजचे आहे परंतु शहरालगत असलेल्या बहुतेक शाळांवर सर्व शिक्षक संवर्ग ०१ मधून आले आहेत. मानसिक व शारीरिक दृष्ट्या सक्षम नसणारे शिक्षक आल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे आज आपण शिक्षण विभागात मुख्यमंत्री माझी शाळा अशा योजना असतील किंवा इतरही मॉडेल स्कूलचे काही उपक्रम असतील त्या योजना सक्षमपणे राबवण्यासाठी धावपळ करणारे शिक्षक देखील शाळेत असणे आवश्यक आहे. शहरालगत असलेल्या गावांनाच खाजगी शाळांकडून आव्हान मिळत असल्याने पटसंख्येवर त्याचा परिणाम होणार आहे शासनाच्या या धोरणामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार असल्याने व खाजगी शाळांमध्ये मुलांचे प्रमाण वाढत असून त्यामुळे त्या कुटुंबावर शिक्षणाचा आर्थिक भार पडत आहे. त्यामुळे जानोरी ता. दिंडोरी येथील सर्व ग्रामस्थांनी धोरणावर नाराजी व्यक्त करत असून जि.प. शाळा जानोरी येथे संवर्ग ०१ चे शिक्षक १००% नेमणूक करून दिल्यास आम्ही त्यांना हजर करून घेणार नाही अशा तीव्र शब्दात ग्रामस्थांनी प्रतिक्रिया व्यक्त केली व याबाबत कार्यवाही करणेसाठी आजच्या ग्रामसभेत ठराव करून वरिष्ठ कार्यालयास कळविण्यात यावे असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. यावेळी उपसरपंच हर्षल काठे त्यांनी त्यास अनुमोदन दिले. यावेळी सर्व ग्रामपंचायत सदस्य, अंगणवाडी सेविका, जिल्हा परिषद शाळा जानोरी व इंदिरानगर मुख्याध्यापक, महात्मा फुले विद्यालयाचे मुख्याध्यापक, विज वितरण कर्मचारी, आरोग्य कर्मचारी, आशा कार्यकर्ती तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाज दिनाचा उत्सव ज्ञानमहोत्सवाने उजळला

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे संस्थापक कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्मदिवस १९ ऑगस्ट हा "समाज दिन" म्हणून दरवर्षी साजरा करण्याची परंपरा १९८२ पासून सुरू असून, या दिवशी विविध सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते.

यंदा संस्थेच्या कार्याची १११ वर्षे पूर्ण होत असून, ५०८ शाखांचा भव्य वटवृक्ष म्हणून मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेने शिक्षण व सामाजिक क्षेत्रात आपले विशेष स्थान निर्माण केले आहे. समाज दिनानिमित्त मराठा विद्या प्रसारक समाज विधी महाविद्यालय,नाशिक आणि नाशिक बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने "स्व. ॲड बाबुराव ठाकरे स्मृती अभिमुखीकरण आठवडा" अंतर्गत सात दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवार, दि. १९ ऑगस्ट २०२५ रोजी या उपक्रमाचे उद्घाटन पुणे येथील वरिष्ठ



अधिवक्ता ॲड श्रीकांत कानेटकर तसेच भारतीय बार कौन्सिलचे माजी सदस्य तथा महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिलचे सदस्य ॲड जयंत जायभावे यांच्या हस्ते झाले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नाशिक बार असोसिएशनचे अध्यक्ष तथा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी भूषविले.मराठा विद्या प्रसारक समाज विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या संध्या गडाख यांनी मान्यवरांचे मनःपूर्वक स्वागत केले.या आठवड्यातील व्याख्यानमालेचा प्रारंभ ॲड कानेटकर यांच्या "दस्तऐवजाची नोंदणी व नोंदणी न केल्याचे परिणाम" या विषयावरील सखोल व उपयुक्त व्याख्यानाने झाला. त्यांनी कायदेशीर व्यवहारांमध्ये दस्तऐवज नोंदणीचे महत्व, नोंदणी न केल्यास उद्भवणारे परिणाम, तसेच न्यायालयीन दृष्टिकोनातून होणारे परिणाम याविषयी सविस्तर विवेचन केले. उपस्थित विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या विषयावर मोठ्या उत्साहाने प्रश्नोत्तरांचा लाभ घेतला. हा विशेष उपक्रम दि. १९ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट २०२५ दरम्यान सातत्याने पार पडणार असून, विविध क्षेत्रातील नामवंत कायदेतज्ज्ञ, वरिष्ठ अधिवक्ते आणि न्यायालयीन अधिकारी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. या व्याख्यानमालेत कायद्याच्या विविध शाखांशी संबंधित महत्त्वाचे मुद्दे उलगडले जाणार असून, हे मार्गदर्शन कायद्याचे विद्यार्थी, नवोदित वकिलांसह प्रात्यक्षिक अनुभव घेणाऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मराठा विद्या प्रसारक समाज विधी महाविद्यालयातील सर्व शिक्षकवृंद, कर्मचारी यांनी मनःपूर्वक परिश्रम घेतले. यावेळी बार कौन्सिलचे सदस्य, ज्येष्ठ वकील, विधी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या व्याख्यानमालेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ कायद्याचे सैद्धांतिक ज्ञानच नव्हे, तर न्यायालयीन व्यवहारातील प्रत्यक्ष अनुभव आणि व्यावहारिक अंगाची जाणही मिळणार असल्याने हा उपक्रम खऱ्या अर्थाने समाज दिनाचे वैशिष्ट्य अधोरेखीत करणाराठरणारआहे

# को- ब्रॅण्डेड आयुष्मान कार्ड मोहिमेची ३१ ऑगस्ट पर्यंत उद्दिष्टपूर्ती पूर्ण करावी : जिल्हाधिकारी




**नाशिक ।** नाशिक जिल्ह्यातील सर्व नागरिकांना को- ब्रॅण्डेड आयुष्मान कार्ड वितरणासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मोहीमस्तरावर उद्दिष्टपूर्तीसाठी साध्य करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी दिल्या.

को- ब्रॅण्डेड आयुष्मान कार्ड वितरणाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी शर्मा यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी सिद्धार्थ रामकुमार, उपजिल्हाधिकारी (प्रशासन) तुकाराम हुलावळे, जिल्हा पुरवठा अधिकारी कैलास पवार, प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा फुले प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे विभागीय व्यवस्थापक डॉ.कुलदीप शिरपूरकर, जिल्हा समन्वयक डॉ. पंकज दाभाडे, जिल्हा प्रमुख डॉ. राहुल जोगवणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. जगदीप पवार उपस्थित होते.

तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, नाशिक महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, सर्व उप विभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी, नगरपालिका मुख्याधिकारी, आरोग्य अधिकारी दूरदृष्यसंवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. शर्मा म्हणाले की, आयुष्मान भारत कार्ड वितरणासाठी जिल्ह्यात एकूण १४.५ लाख कुटुंबांची संख्या आहे, तर लाभार्थी संख्या ६१ लाख ६८ हजार आहे. त्या तुलनेत १७ लाख ६८ हजार एवढेच कार्ड वितरीत झाले आहेत. हे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे. कार्ड निर्माण करण्यासाठी आवश्यक माहितीचे तातडीने अद्ययावतीकरण करावे. यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्वतःच्या कुटुंबापासून सुरवात करून मोहिमेची व्यापकता वाढविण्याच्या दृष्टीने कार्यक्रमांचे नियोजन करावे.

यासाठी अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, मदतनीस यांच्यासह आरोग्य कर्मचारी यांची पथके तयार करून गृहभेटींद्वारे नोंदणी करावी. मुदतबाह्य झालेल्या शिधापत्रिका नुतनीकरण करण्यासाठी शिबिरांचे आयोजन करण्यात यावे. या मोहिमेची माहिती नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी विशेष प्रचार व प्रसिद्धी करावी. आगामी गणेशोत्सवातही अशा प्रकारचे शिबिराचे आयोजन करून नागरिकांना आयुष्यमान कार्ड नोंदणीसाठी प्रोत्साहित करण्याच्या सूचना शर्मा यांनी बैठकीत दिल्या.

# अस्वली-जानोरी रस्त्यावरील पुलाचे काम जलदगतीने पूर्ण करा; अन्यथा आंदोलन

## माजी सभापती सोमनाथ जोशी यांचा इशारा

**बेलगाव कुऱ्हे ।** इगतपुरी तालुक्यातील अस्वली स्टेशन जानोरी रस्त्यावरील उंडओहोळ नदीपात्रावरील पुलाचे काम गेल्या चार ते पाच वर्षांपासून रखडल्याने पावसाळ्यात अस्वली, जानोरीसह, बारा वाड्यांच्या नागरिकांना जाण्यायेण्यासाठी मोठे हाल सोसावे आहे. अतिपावसामध्ये या गावांचा नेहमीच संपर्क तुटतो. ह्या पुलाचे जलदगतीने काम पूर्ण करावे अन्यथा आंदोलनाचा इशारा पंचायत समितीचे माजी सभापती सोमनाथ जोशी यांनी दिला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने जुन्या पुलावरून दुसऱ्या बाजूने रस्ता केला आहे. अरुंद पुलामुळे याठिकाणी सतत अपघात घडत आहे. या पुलाबाबत येथील नागरिक, शेतकरी पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागत नाही. मुकणे धरणातून सोडण्यात येणाऱ्या आवर्तनामुळे व पावसामुळे बांधकाम विभागाने बनवलेला तात्पुरता रस्त्यावरून जास्त पाणी असल्याकारणाने दरवर्षी अनेकांचा संपर्क तुटतो. पर्यायाने नांदगाव बुद्रुक तसेच पाडळी देशमुख मार्गे दूरवरून त्यांना मार्गक्रमण करावे लागते. सदर उंडओहोळ नदीवरील पुलाचे काम जलदगतीने करावे, अशी मागणी होत असतांनाही नेहमीच दुर्लक्ष केले जाते. अस्वली स्टेशन ते मुंढेगाव रस्ता नागरिकांचा दळण वळणासाठी महत्वाचा मार्ग असून पुलाचे काम रखडल्याने मुंढेगावकडे जातांना अनेक शेतकरी नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.





"गेल्या चार ते पाच वर्षांपासून उंडओहोळ नदीपात्रावरील पुलाचे काम रखडल्याने आमच्या बारा वाड्यांमधील तसेच जानोरीच्या नागरिकांना खूप मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका लांबणीवर पडल्याने अनेक शासकीय योजनांना खीळ बसली आहे. जिल्हा परिषद पंचायत समितीमध्ये लोकप्रतिनिधी नसल्यामुळे अधिकाऱ्यांना वचक राहिला नाही. सदर पुलाच्या कामांबाबत लोकप्रतिनिधींचे सक्षम दुर्लक्ष आहे. पुलाचे काम जलदगतीने सुरू करावे अन्यथा शेतकरी, नागरिकांना एकत्र करून वेगळ्या पद्धतीने आंदोलन करू.

**-सोमनाथ जोशी, माजी सभापती पंचायत समिती इगतपुरी**

# सिन्नरच्या पूर्व भागातील सामाजिक कार्यकर्ते कै. रामभाऊअण्णा गाढे ऊर्फ निळू फुले..




रामभाऊ अण्णा गाढे ऊर्फ निळू फुले. सामाजिक, सांस्कृतिक, राजकिय, शैक्षणिक व शेती क्षेत्रात हिरीरीने काम करणारे एक महनीय व्यक्तिमत्व आपल्यातून निघून गेले आहे. एक सच्चा सामाजिक कार्यकर्ता गमावल्याचे दुःख आज प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत आहे.संवेदनशील व आक्रमकतेसोबत त्यांचे व्यक्तिमत्त्व आश्वासक होते. त्यांच्या अकाली निधनाने राजकीय व सामाजिक चळवळीची मोठी हानी झाली आहे. अण्णांचा जन्म १९४८ साली सिन्नर तालुक्यातील दहिवाडी गावातील मोठ्या एकत्रित कुटुंबामध्ये झाला. वडील कै.कारभारी गजराजी गाढे व दोन चुलते तसेच वडिलांचे भाचे कै.सोपान पंढरीनाथ रहाणे त्यांचे दोन भाऊ असे मामा,भाचे व अण्णांचे दोन बंधू, दोन चुलत बंधू अश्या मोठ्या एकत्रित कुटुंब पद्धतीत अण्णांचा वावर होता.

त्यांचे प्राथमिक शिक्षण इयत्ता १ ली ते ४ थी गावातच दहिवाडी येथे झाले आणि चौथीनंतर ५ वी आणि ६ वी शेजारील उजनी गावामध्ये, ७ वी शिक्षण पंचाळेत ८ वी चे शिक्षण कोळपेवाडी येथील रयत शिक्षण संस्थेमध्ये झाले, ९ वी चे शिक्षण लासलगाव, १० वी चे शिक्षण धामोरी या गावी झाले आणि ११ वीचे शिक्षण देवपूर येथे स्व.गडाख नानांच्या संस्थेत झाले.अण्णा शालेय जीवनातच सामाजिक-राजकीय प्रश्नाचे भान असलेने ते अल्प वयातच प्रगल्भ बनलेले विद्यार्थी होते. १९५५ मध्ये राष्ट्रीय संत श्री.गाडगेबाबा यांचे दहिवाडी गावामध्ये कीर्तन झाले तेव्हा अण्णा सात वर्षाचे होते त्यांच्या कीर्तनाच्या प्रभावाने अण्णांना सामाजिक कार्याची प्रेरणा मिळाली होती ती त्यांनी आपल्या अंतीम श्वासा पर्यंत जपली.

अण्णांना पूर्वी पासूनच समाजकारणाची फार आवड होती. अण्णांनी घरच्या प्रपंचापेक्षा गावातील समाजकार्यात जास्त लक्ष घातले. गावात एसटी बस सुरू करणे,कै.तुकाराम दिघोळे आमदार असतांना आमदार निधीतून जिल्हा परिषद शाळेसाठी तसेच हभप काशिनाथ महाराज माध्यमिक विद्यालयासाठी डोंगरी अनुदानातून वर्ग खोल्या आणने, विना अनुदानित माध्यमिक शाळेसाठी कै. शंकरराव काळे यांच्या कारखान्यामार्फत शिक्षकांसाठी



पगार मिळविण्याचे कामात महत्वाची भूमिका बजावणे,जिल्हा परिषद शाळेची जुनी इमारत निर्लेखित करणे व नवीन ईमारतीसाठी स्थानिक स्कूल कमेटीस सहकार्य करणे,काशिनाथ महाराज माध्यमिक विद्यालयासाठी प्रस्ताव तयार करून मान्यता आणने, गोदावरी उजवा तट कालव्याद्वारे शेती पिकांसाठी रोटेशन ची मागणी करणे, चास दहिवडी रस्त्यासाठी तसेच दहिवडी पांचाळे रस्त्यासाठी पाठपुरावा करणे, दहिवाडी तलाठी कार्यालयासाठी दहिवाडीतच कार्यालय व्हावे यासाठी प्रयत्न करणे, जिल्हा परिषद शाळेसाठी वाढीव शिक्षकांची मागणी करणे अथवा स्मशान भूमीचा प्रश्न असो हे सर्व प्रश्न सुटावेत यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. शासनाचा निधी गावासाठी कसा आणता येईल हाच प्रामाणीक प्रयत्न ते सतत करत. दहिवाडी गावचे विकास कामामंध्ये त्यांचे फार मोठे योगदान राहिलेले आहे हे कुणीही नाकारणार नाही. राजकीय क्षेत्रात कार्य करीत असताना कै.आ. सूर्यभान गडाख , कै.आ.दिघोळे , खा.राजाभाऊ वाजे, क्रीडामंत्री माणिक कोकाटे या सर्व नेत्यांशी अण्णांचे जवळचे व घनिष्ठ संबंध होते. रामभाऊ अण्णा यांचे भाषण मुद्देसूद व सरळ सोप्या शब्दात असायचे.गावचा विकास व्हावा या साठी त्यांची सतत तळमळ असायची. रामभाऊ अण्णा यांचा पेहराव सफेद कुर्ता त्यावर काळे जॅकेट, सफेद पायजमा व डोक्यावरती सफेद कांजीची टोपी नेहमीच असायची. त्यांची शरीर यष्टी हि सडपातळ होती ती हूबेहूब दिवंगत मराठी कलाकार निळू फूले यांचेशी मिळती जूळती होती त्यामुळे पंचक्रोशीत ते निळूभाऊ म्हणून प्रसिद्ध होते.यांना निळू फुले असे प्रेमाने संबोधले जायचे. सतत राजकीय चर्चा करणे,आमदार ,खासदार, अधिकारी यांचे कायम संपर्कात राहून समाजासाठी व गावासाठी काय विकासकामे करता येतील यावर त्यांचा कायमच भर रहात होता.सर्वसामांन्याच्या अडी अडचणी कश्या मार्गी लागतील यासाठी ते अटोकाट प्रयत्न करत.

असा हा निस्वार्थी सामाजिक कार्यकर्ता बुधवार दि.१३ रोजी सकाळी १०:१७ वा.आपल्यातून कायमचा निघून गेला याचे फार मोठे दुःख आहे.या पुढच्या काळात गावातील विकास कामे विशेषतः स्मशान भूमीचा प्रश्न सोडवने हि अण्णांची ईच्छा अपूर्ण राहीली. त्यासाठी त्यांनी प्रयत्नही केले परंतू ते पूर्णत्वास गेले नाही. म्हणूनच एक उत्तम प्रकारची स्मशान भूमी बांधून उभी करणे ही रामभाऊ अण्णांना आदरांजली ठरू शकते व दहिवाडी गाव एकत्र येऊन हे काम नक्कीच करेन हा विश्वास आहे. रामभाऊ अण्णांच्या जाण्याने दहिवडी गावाचा एक खंबीर आधारवड निश्चितत हरपला आहे.परीसरातील शेतांतील पिकांना उन्हळ्यात पाण्याचा ताण पडत तेंव्हा अण्णा दहिवाडी गावालगत प्रवाहीत असणाऱ्या गोदावरी उजवा तट कालव्याचे अधीकारी यांना रोटेशन सोडण्यासाठी धारेवर धरत व पाणी सोडण्यास भाग पाडत त्याच कालव्यावरती अण्णांचा दशक्रीया विधी शुक्रवार दि.२२ रोजी होणार आहे. अण्णा कालव्यात वाहत्या पाण्याप्रमाणे समाजासाठी सतत प्रवाहीत राहीले ते कधीच थांबले नाही आज थांबला तो त्यांचा श्वास त्यांच्या आठवणी ग्रामस्तांना, पंचक्रोशीला व तालुक्यासह जिल्हावासियांना कायमच स्मरणात रहातील.आयुष्याच्या उत्तरार्धात आजारपणात जखडलेले असतानाही त्यांच्यातील सामाजिक कार्यकर्ता सतत जागरुक राहिला.त्यामुळे त्यांचा सामाजिक पिंड त्यांचे चाहत्यांसाठी,कुटुंबासाठी, नातेवाईकांसाठी व समाजासाठी प्रेरणादायी आहे.अश्या या निस्वार्थी सामाज सेवकास व मार्गदर्शकास शतशः नमन व भावपूर्ण श्रद्धांजली!

# ठेकेदारांनी काढली सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा







## प्रलंबित देयके मिळावे यासाठी निषेध आंदोलन

**नाशिक ।** गेल्या दोन-तीन वर्षांपासून प्रलंबित असलेली विविध कामांची देयके मिळावीत यासाठी शासकीय ठेकेदारांनी गेल्या दोन दिवसांपासून निषेध आंदोलन सुरू केले आहे. गुरुवारी (दि. २१) ठेकेदारांच्या भावनांचा उद्रेक होऊन त्यांनी महायुती सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढत सरकारचा तीव्र निषेध नोंदविला.

बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया, नाशिक चॅपटर, नाशिक जिल्हा मक्तेदार संघटना, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग ठेकेदार संघटना यांच्यासह समस्त शासकीय कामे करणाऱ्या ठेकेदारांनी या निषेध आंदोलनात सहभाग नोंदविला. त्र्यंबक रोडवरील सार्वजनिक बांधकाम भवनाच्या प्रवेशद्वारालगत ठेकेदारांनी निषेध आंदोलन सुरू केले आहे. निषेध असे लिहिलेल्या पांढऱ्या गांधी टोप्या डोक्यावर परिधान करीत ठेकेदारांनी सरकारचा तीव्र निषेध केला. महायुती सरकारने केले काय, खाली डोके वर पाय, कोण म्हणतं देणार नाही, घेतल्याशिवाय राहणार नाही, मुख्यमंत्री हाय हाय, वित्तमंत्री हाय हाय, मंत्रिमंडळ हाय हाय, अशा जोरदार घोषणा देत परिसर दणाणून सोडला होता. या आंदोलनामुळे त्र्यंबक रोडवर काही काळ वाहतूक कोंडी झाली. रस्त्याच्या कडेला ठेकेदार आंदोलकांच्या चारचाकी, दुचाकी गाड्या पार्क केल्याने कोंडी झाली होती. त्यावरून पोलीस आणि आंदोलकांमध्ये जर बाचाबाचीही झाली. प्रचंड घोषणाबाजी करीत आंदोलक थेट सार्वजनिक बांधकाम भवनात घुसले. यावेळी त्यांनी राज्य सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढली. प्रतिकात्मक तिरडी खांद्यावर घेऊन रामनाम सत्य है। अशी हाळी ठोकत बांधकाम भवन परिसरातून अंत्ययात्रा काढली. एक ठेकेदार पुढे मडके घेऊन चालत होता तर तिरडीला ठेकेदार आळीपाळीने खांदा देत होते. यावेळी त्यांनी मुख्य इमारतीत घुसण्याचाही प्रयत्न केला; पण बंदोबस्तावरील पोलिसांनी दारे बंद करून घेतली होती. यावेळी अनेक ठेकेदारांनी मनोगत व्यक्त करीत आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. ठेकेदारांच्या सहनशीलतेचा अंत पहिला जात आहे. निवडणुकीच्या वेळेला कामे करून घेतली आणि आता देयके देण्यास विलंब केला जात आहे. ठेकेदारांनी विविध प्रकारे हातउसने, बँकांची कर्जे खासगी घेत, सावकारांकडून कर्ज घेऊन, मालमत्ता गहाण ठेवत पैसे उभे करून कामे पूर्ण केली आहेत. आता पैसे परत करण्यासाठी समोरच्यांकडून तगादा सुरू आहे. दोन-तीन वर्षे होऊनही सरकार देयके देत नसल्याने ठेकेदारांची प्रचंड आर्थिक कोंडी होत असल्याचे ठेकेदारांनी सांगितले. आतापर्यंत अनेक वेळा ठेकेदारांनी प्रलंबित देयकांसाठी पाठपुरावा केला, निवेदने दिली, वरीष्ठ अधिकारी आणि संबंधित मंडळींच्या भेटी घेतल्या. वित्तमंत्री, मुख्यमंत्री यांच्याही भेटी घेतल्या; पण काहीच कार्यवाही नसल्याने ठेकेदार हवालदिल झाले आहेत. त्यांच्या सहनशीलतेचा अंत झाला असून, प्रलंबित देयके मिळाल्याशवाय कोणतेही काम न करण्याचा निर्णय घेतला आहे.

## महायुती सरकारने केले काय, खाली डोके वर पाय

### मुख्यमंत्री हाय हाय, वित्तमंत्री हाय हाय । क्लब टेंडर बंद करा, बंद करा

### सरकारच्या नावाने ठोकल्या बोंबा

प्रलंबित देयकांसाठी ठेकेदारांनी गुरुवारी (दि. २१) राज्य शासनाची प्रतिकात्मक तिरडी काढली. राम नाम सत्य है। चा नारा देत ठेकेदारांनी तोंडावर उलटी मूठ ठेवत सरकारच्या नावाने बोंबा ठोकल्या. मुख्य इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ तिरडी खाली ठेऊन तिरडीला जोडे मारले. आंदोलनस्थळी मुख्य अभियंता यांनी आंदोलकांची भेट घेतली. यावेळी ठेकेदारांच्या शिष्टमंडळाने त्यांना मागण्यांचे निवेदन दिले.

## महत्त्वाचे

### जातेगाव पिनाकेश्वर महादेव मंदिर डोंगरावर स्वच्छता मोहीम

**नांदगाव ।** तालुक्यातील पिनाकेश्वर महादेव मंदिर (मोठा महादेव) लाखो भाविकांचे



श्रद्धास्थान आहे. नाशिक, छत्रपती संभाजी नगर आणि जळगाव येथून मोठ्या प्रमाणावर भाविक श्रावण महिन्यामध्ये या डोंगरावरती श्री पिनाकेश्वर महादेव चे दर्शन घेण्यासाठी येत असतात. यावर्षी जातेगाव, लोढरा, आडगाव परिसरातील ग्रामस्थ तसेच तरुण मित्र मंडळांनी व बचत गटातील महिलांनी श्रावण महिन्यात महादेव दर्शनासाठी भाविकांसाठी खास सोयी सुविधा उपलब्ध केली होती. यात्रा उत्सव अतिशय उत्साहात पार पडला. श्री पिनाकेश्वर महादेव च्या दर्शनासाठी लाखोंच्या संख्येने भाविक शिखरावर पोहोचले होते. भाविकांची लोटलेली अलोक गर्दी व भाविकांनी सोबत आणलेले खाद्यपदार्थ व पिण्याचे पाणी संपल्यानंतर परिसरामध्ये या वस्तू टाकून दिल्याने श्रीफनाकेश्वर महादेव मंदिराच्या डोंगरावरा वरची पवित्र व स्वच्छता धोक्यात आली होती. या यात्रेनंतर विजय पाटील, संतोष कायस्थ, अक्षय झिम्मन, दादासाहेब शिंदे, देविदास पाटील, राजू निकम यांच्यासह गावातील व परिसरातील नागरिकांनी महादेव डोंगर कचरा मुक्त करण्यासाठी स्वच्छता मोहीम हाती घेऊन स्वच्छता मोहीम राबविली. व परिसर स्वच्छ करून टाकला.

### मेडिकल नीट पीजी परीक्षेत तेजस बनकर देशात ३५४ वा

**नाशिक ।** नुकत्याच झालेल्या मेडिकल नीट पीजी-२०२५ परीक्षेत चांदशी (ता.नाशिक)येथील



डॉ.तेजस बनकर ८०० पैकी ६४७ गुण मिळवून संपूर्ण देशात ३५४ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला.टपारिया टूल्सचे कर्मचारी महंत माणिक बनकर यांचा तो मुलगा आहे. मन लावून केलेला अभ्यास आणि आई-वडिलांचे पाठबळ यामुळे मी हे यश मिळवू शकलो,असे तेजसने आपल्या मनोगत सांगितले. त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### पर्यावरण रक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी : रेखा म्हस्के

**नाशिकरोड ।** गणेशोत्सव साजरा करताना नद्यांसह पर्यावरणाला हानी पोहोचणार नाही, असे




प्रयत्न आपण केले पाहिजे. त्यासाठी शाश्वत, पर्यावरणपूरक आणि पुन्हा वापरता येणारी श्री गणेशाच्या धातूच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करावी. कारण पर्यावरण रक्षण ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन वॉव समूहाच्या रेखा म्हस्के यांनी केले. पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात वॉव समूहाच्या वतीने आरंभ अभियानाच्या द्वितीय वर्षी 'घरोघरी बाप्पा मनात भक्ती; धातूची मूर्ती देई प्रदूषणापासून मुक्ती' या उपक्रमात त्या बोलत होत्या. मंचावर वॉव समूहाच्या संस्थापिका अश्विनी न्याहारकर, अध्यक्षा विभा खोत, संचालिका माधुरी कोतवाल, सुनंदा रहाणे, सुषमा जाधव, मुख्याध्यापक अरुण पगार उपस्थित होते. यावेळी वॉव समूहाच्या वतीने विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्यात आले आणि पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्याच्या आवश्यकतेबद्दल माहिती देण्यात आली. मुख्याध्यापक अरुण पगार आणि शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या वतीने पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. शिक्षक रवींद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले.

## संभाजी ब्रिगेडचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन






### शेतकरी प्रश्न, आरक्षण व निवडणूक पारदर्शकतेसाठी निवेदन

**नाशिक ।** महाराष्ट्रभर सुरू असलेल्या लक्षवेधी आंदोलनाचा भाग म्हणून संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या देत ज्वलंत प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधले. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनात शेतकरी कर्जमाफी, उस, कांदा, कापूस व दूध दर वाढ, मराठा व धनगर समाज आरक्षण, निवडणुका बॅलेट पेपरवर घेणे, अतिवृष्टीमुळे ओला दुष्काळ जाहीर करून हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई आदी मागण्यांचा समावेश आहे. ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी राज्य सरकारवर निवडणूक काळात दिलेल्या आश्वासनांकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला. दररोज तीन शेतकरी आत्महत्या करत असतानाही कर्जमाफी व शेतमालाला योग्य भाव न मिळाल्याची खंत व्यक्त करण्यात आली. तसेच दूध भेसळीवर कठोर कारवाई करून दूधाला किमान ७० रुपये दर जाहीर करावा, अशी ठाम मागणी करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुका इव्हिएमऐवजी बॅलेट पेपरवरच घेण्यात याव्यात, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली. या आंदोलनात जिल्हाध्यक्ष प्रफुल्ल वाघ यांच्या नेतृत्वाखाली नाना बच्छाव, नितीन रोटे पाटील, हिरामण वाघ, विक्रम गायधनी, महिला अध्यक्षा प्रज्ञा टुपके यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## ग्रामीण रुग्णालयातील समस्या, अनागोंदी कारभाराविरोधात शिवसेनेचे आंदोलन



**सटाणा ।** सटाणा शहर व बागलाण तालुका शिवसेना (उबाठा) तर्फे ग्रामीण रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटरमध्ये भेडसावणाऱ्या गंभीर समस्या आणि अनागोंदी कारभाराविरोधात ज्येष्ठ नेते लालचंद सोनवणे, तालुकाप्रमुख डॉ.प्रशांत सोनवणे व शहर प्रमुख रवींद्र सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली वैद्यकीय अधीक्षक डॉ.भगत यांना घेराव घालून तीव्र आंदोलन करण्यात आले.

येत्या सात दिवसांत कामकाजात सुधारणा करावी अन्यथा कोणतीही पूर्वसूचना न देता रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सुद्धा यावेळी देण्यात आला. सकाळी अकरा वाजता मोठ्या संख्येने शिवसैनिक रुग्णालय आवारात दाखल होत घोषणाबाजी सुरू केली. यावेळी बोलताना शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी ग्रामीण रुग्णालयातील नवजात बालकांचे लसीकरण सत्र पूर्वी आठवड्यातून दोनदा होत असताना मागील सहा महिन्यांपासून फक्त मंगळवारीच घेतले जाते. त्यामुळे माता-भगिनींना व लहान बालकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. आवारातील ट्रॉमा केअर सेंटरची इमारत उभी असूनही गेल्या सात-आठ वर्षांत त्याचे कार्यान्वयन झालेले नाही. हाडांचे ऑर्थोपेडिक शस्त्रक्रिया अद्याप सुरू झालेल्या नाहीत. स्वच्छतेचा गंभीर अभाव, पुरेसे वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी नसणे, रुग्णांना मुद्दाम खाजगी दवाखान्यांकडे वळवणे या गंभीर तक्रारींवर संताप व्यक्त करण्यात आला. आंदोलनात ज्येष्ठ नेते लालचंद सोनवणे, तालुकाप्रमुख डॉ.प्रशांत सोनवणे, तालुका उपाध्यक्ष राजेंद्र खानकरी, राजनसिंह चौधरी, जिल्हा संघटक अमोल पगार, अनिल सोनवणे, शरद शेवाळे, लक्ष्मण सोनवणे, पंकज ठाकूर, सुनील गायकवाड, संदीप सोनवणे, सुनील गायके, मंगलसिंग जोहरी यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक सहभागी होते. दरम्यान, वैद्यकीय अधीक्षक डॉ.भगत यांनी, आठवड्यातील दोन दिवस लसीकरण मोहीम पूर्ववत पुन्हा सुरू केली जाणार असून रुग्णवाहिकांच्या दुरुस्तीसह अतिरिक्त कर्मचारी व नवीन रुग्णवाहिकेसाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू आहे.

> सटाणा उपजिल्हा रुग्णालय हे गोरगरीब रुग्णांसाठी मोठा आधार असायला हवे होते. परंतु इथे फक्त इमारत उभी आहे. डॉक्टर नाहीत, सुविधा नाहीत, स्वच्छता नाही. रुग्णांना सरकारी रुग्णवाहिका असूनही खाजगी रुग्णवाहिकावाल्यांकडे पाठवले जाते. हे खपवून घेतले जाणार नाही. जर सात दिवसांत सुधारणा झाली नाही तर आम्ही शिवसेना स्टाईलने रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडू.
>
> **– रवींद्र सोनवणे, शहर प्रमुख, शिवसेना उबाठा**

## जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे राज्यव्यापी अधिवेशन

**नाशिक ।** जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन नाशिक येथिल गरुडझेप अँकाडमी येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या वेळी जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या सर्व पदाधिकारी यांना अपघाती विमा योजना, पत्रकार बांधवांच्या पत्नी साठी पैठणी साडी व आकर्षक भेट वस्तू प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते देण्यात आले.



कार्यकमाचा अध्यक्षस्थानी जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संतोष जाधव होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस उप अधीक्षक वासुदेव देसले, दै महासागर चे संपादक जेष्ठ पत्रकार प्रा.जयंत महाजन, जागर जनस्थान चे मुख्य संपादक समिर चव्हाण, गरुडझेप अँकाडमी चे व्यवस्थापक प्रा.लक्ष्मण डोळस, माजी नगरसेवक दिनकर पाटील, दै.महासागर चे वृत्त संपादक सुधीर उमराळकर, माजी नगरसेवक अरविंद सोनवणे, सामाजिक कार्यकर्ते गणेश सावंत,अल्पसंख्यांक सेलचे तन्वीर तांबोळी, गुड्डू सय्यद यांच्यासह जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष रफिक सैयद, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष देविदास बैरागी, राष्ट्रीय सल्लागार अन्वर पठाण, विश्वस्त मंगेश भामरे, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रकाश बागुल, नासिक जिल्हा कार्याध्यक्ष अकिल पटेल, नासिक जिल्हा महिला विभागाच्या जिल्हा अध्यक्ष वृषाली साळुंके, नाशिक शहर अध्यक्ष शोहेब शेख यांच्या सह पोलीस मित्र समितीचे राज्य अध्यक्ष आनंद दाणी, दिव्यांग सेवा समिती चे राज्य अध्यक्ष सुकदेव खुर्दळ, अन्याय अत्याचार निवारण समितीचे राज्य अध्यक्ष कल्याणी धोंडगे, अन्याय अत्याचार निवारण समितीचे राज्य उपाध्यक्ष करुणा पाटील उपस्थित होते. दिप प्रज्वलनाने कार्यकमाची सुरवात करण्यात आली तर उपस्थित सर्व प्रमुख पाहुणे यांचे जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला. प्रा जयवंत महाजन यांचे पत्रकारिता काल आज आणि उद्या या विषयावर व्याख्यान झाले तर वासुदेव देसले व समिर चव्हाण यांनी पत्रकारिता कशी निर्भीड करावी या विषयावर सविस्तर मनोगत व्यक्त केले या प्रसंगी जनकल्याण मराठी पत्रकार संघाच्या प्रत्येक पदाधिकारी यांना अपघाती विमा, भेटवस्तू व त्यांच्या पत्नी साठी पैठणी साडीचे वाटप करण्यात आले. यावेळी यवतमाळ, अकोला, पुणे, अहिल्यानगर, नासिक, धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील पदाधिकारी तसेच सटाणा, दिंडोरी, सुरगाणा, मालेगाव, चांदवड, निफाड, नासिक शहर येथिल पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते उपस्थित होते कार्यकमाचे यशस्वी नियोजन जनकल्याण मराठी पत्रकार संघाचे नासिक जिल्हा व नासिक शहर पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.

## हातात कोयता घेऊन इन्स्टाग्रामवर लाईव्ह करणारा अल्पवयीन गुन्हे शाखेच्या जाळ्यात

**नाशिक ।** शहरात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने धारदार शस्त्रे बाळगणाऱ्यांवर कठोर कारवाई सुरू असतानाच, गुन्हेशाखा युनिट-२ ने आणखी एक धडक कारवाई करत अल्पवयीन बालकाला ताब्यात घेतले आहे. हा विधीसंघर्षित बालक हातात धारदार कोयता घेऊन इन्स्टाग्रामवर थेट प्रक्षेपण करत समाजात दहशत माजविण्याचा प्रयत्न करत होता.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, गुन्हे शाखेचे पोलीस उपआयुक्त किरणकुमार चव्हाण आणि सहा. पोलीस आयुक्त संदीप मिटके यांनी अशा प्रकारे शस्त्रासह दहशत माजविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर या प्रकरणाची दखल घेण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या आदेशानुसार, गुन्हेशाखा युनिट-२ चे अधिकारी व अंमलदार तपास करत असताना पोहवा चंद्रकांत गवळी आणि पोअं तेजस मते यांना गुप्त बातमी मिळाली की, लेखानगर परिसरात एक इसम कंबरेला धारदार कोयता लावून फिरत आहे. सपोनि हेमंत तोडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने बालभारती पुस्तकालयाच्या कंपाउंडलगत सापळा रचून संशयिताला पकडले. चौकशीत तो विधीसंघर्षित बालक



असल्याचे समोर आले. त्याच्या पालकांना घटनास्थळी बोलावून त्याच्या उपस्थितीत अंगझडती घेण्यात आली असता कमरेला लावलेला धारदार कोयता आढळून आला. शहरात शस्त्रबंदी आदेश लागू असताना हा कोयता विनापरवाना आढळून आल्याने, पोअं तेजस मते यांनी सरकारतर्फे अंबड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा नोंदवून अल्पवयीन बालकाला पालकांसह पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या कारवाईत सपोनि हेमंत तोडकर, सपोनि डॉ. समाधान हिरे, पोउनि मुक्तारखान पठाण, श्रेणी. पोउनि यशवंत बेंडकोळी, पोहवा चंद्रकांत गवळी, पोहवा नंदकुमार नांदुर्डीकर, पोअं तेजस मते, पोअं प्रविण वानखेडे, महेश खांडबहाले, सुनील खैरनार, अतुल पाटील आणि प्रकाश महाजन यांनी सहभाग घेतला.

## वाहनांमध्ये अवैधरित्या गॅस भरणारा आरोपी जेरबंद

### ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त । गुन्हेशाखा युनिट-२ ची धडक कारवाई

**नाशिक ।** शहरात जीवघेणा धोका निर्माण करणाऱ्या बेकायदेशीर गॅस रिफिलिंग रॅकेटवर गुन्हेशाखा युनिट-२ ने मोठी कारवाई केली आहे. अवैधरित्या वाहनांमध्ये गॅस भरून विक्री करणाऱ्या आरोपीस जेरबंद करत पोलिसांनी ८५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) किरणकुमार चव्हाण आणि सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) संदीप मिटके यांनी अशा प्रकारच्या बेकायदेशीर धंद्यावर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार १८ ऑगस्ट रोजी गुन्हेशाखा युनिट-२ चे पथक पेट्रोलिंग दरम्यान सतर्क झाले. पोहवा नंदकुमार नांदुर्डीकर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, नाशिकरोड परिसरातील पाटील गॅरेजच्या मागे एका पत्र्याच्या शेडमध्ये घरगुती गॅस सिलेंडरमधून मशीनद्वारे गॅस खाजगी वाहनांत भरला जात आहे.




सपोनि हेमंत तोडकर (प्रभारी अधिकारी, युनिट-२) यांच्या मार्गदर्शनाखाली श्रे. पोउनि प्रेमचंद गांगुर्डे, यशवंत बेंडकोळी, पोहवा नंदकुमार नांदुर्डीकर, संजय सानप आणि नितीन फुलमाळी यांच्या पथकाने सापळा रचून छापा टाकला. कारवाईदरम्यान विशाल बाजीराव बोंडारे (वय २९, रा. वंदेभारत अपार्ट, औटे मळा, नाशिकरोड) हा घरगुती वापरासाठी असलेले भारत गॅस सिलेंडर वापरून बेकायदेशीरपणे वाहनांत गॅस भरताना रंगेहात पकडला गेला. त्याच्याकडून भरलेले व रिकामे ८ सिलेंडर, २ कॉम्प्रेसर मोटारसह मशिन, वजनकाटा व रोख ८२० रुपये असा एकूण ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईबाबत पंचनामा करण्यात येऊन आरोपीविरुद्ध पोहवा नितीन फुलमाळी यांनी भारतीय दंड विधान कलम २८७ तसेच जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ कलम ३ व ७ नुसार नाशिकरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. आरोपी व जप्त माल पुढील तपासासाठी नाशिकरोड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. या धडक कारवाईत सपोनि हेमंत तोडकर (प्रभारी अधिकारी), श्रे. पोउनि प्रेमचंद गांगुर्डे, मुक्तारखान पठाण, यशवंत बेंडकोळी, पोहवा नंदकुमार नांदुर्डीकर, संजय सानप, चंद्रकांत गवळी, प्रकाश महाजन, नितीन फुलमाळी, मनोज परदेशी, प्रविण वानखेडे, महेश खांडबहाले व तेजस मते यांनी सहभाग घेतला.

# अण्णा.. आम्हाला माफ करा!

कर्मवीर अण्णांच्या पत्नी लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांनी विद्यार्थ्यांसाठी गळ्यातलं मंगळसूत्र विकलं होतं. त्याच अत्यंत नामवंत अशा रयत शिक्षण संस्थेत बाया नाचवताना पहायला मिळाव्यात हे समस्त बहुजन समाजाचे दुर्दैव म्हणावे लागेल. सुसंस्कृत महाराष्ट्राची अशी भीषण अधोगती आहे की नाही ? यावर आता मंथन होणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात अशा अनेक शिक्षण संस्था आहे की, त्या संस्थेच्या संस्थापकांनी पदरमोड करून संस्था मोठ्या केल्या. एवढेच नव्हे तर कुटुंबातील महिलांनी गळ्यातील सोन्याचे दागिने मोडून गोरगरिबांच्या मुलांनी शिक्षण घ्यावे म्हणून त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था केली. त्याबाबतीत कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ अण्णा यांनी जो त्याग केला, अशाच प्रकारचा त्यात नाशिक जिल्ह्यात मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्थेत कर्मवीर रावसाहेब थोरात आणि त्यांच्या परिवाराने देखील केला आहे. त्यामुळेच अशा शिक्षण संस्थांमध्ये पावित्र्य राखले जाणे गरजेचे वाटते. ग्रामस्थांचा हेतू वेगळा तर शिक्षण संस्थेचा हेतू वेगळा असू शकेल. परंतु समाजामध्ये त्यामुळे चुकीचा संदेश जातो. आता यानिमित्ताने पवार परिवारासह संस्थेतील कार्यकारी मंडळावर टीकास्त्र सोडले जातीलच. अशा कार्यक्रमासाठी परवानगी देऊ नये, असे ठराव कदाचित भविष्यात होतील. परंतु कित्येक वेळा ग्रामस्थांच्या पुढे संस्था चालकांना देखील जाता येत नसते. त्यामुळे संस्थेच्या प्रांगणात कोणते कार्यक्रम घ्यावेत याचा सालासार विचार झाला पाहिजे. ज्या संस्थेला देदीप्यमान शैक्षणिक वारसा आहे, अशा महाराष्ट्रातील नामांकित रयत शिक्षण संस्थेच्या प्रांगणात अश्लील 'नाच' हा प्रकार संतापजनकच ठरला. कारण या संस्थेकडे अत्यंत आदराने पाहिले जाते. पण या आदराला गालबोट लागेल असाच हा प्रकार म्हणावा लागेल. बारामतीच्या मोरगावमधील रयत शिक्षण शिक्षण संस्थेत मुलं शिक्षणासाठी येत असतात. मात्र या शिक्षण संस्थेच्या प्रांगणात झालेल्या एका कार्यक्रमात 'नाचा'चा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचं समोर आलं आहे. धक्कादायक बाब म्हणजे नाचताना डान्सरने अतिशय अश्लिल हावभाव केल्याने संस्थेच्या हितचिंतकांना वाईट वाटले. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही संताप व्यक्त केला. गावच्या ग्रामदैवत भैरवनाथाच्या यात्रेनिमित्त आयोजित केलेल्या मनोरंजनाच्या ऑर्केस्ट्राच्या तो कार्यक्रम होता. रयत शिक्षण संस्थेअंतर्गत राज्यात अनेक ठिकाणी विद्यालयं चालवली जातात. ही राज्यातील एक नावाजलेली संस्था आहे. विशेष म्हणजे माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, नाशिक जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते ॲड. भगीरथ शिंदे यांच्यासह अनेक जण या संस्थेचे नेतृत्व करतात. घडलेला प्रकार रयत शिक्षण संस्थेच्या प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा असून शैक्षणिक संस्थेच्या पवित्रतेला धक्का लावणारा ठरला.

गावातील यात्रेमध्ये तमाशाच्या माध्यमातून नृत्याचे प्रकार हे ठरलेलेच असायचे. पूर्वीच्या काळी नृत्यांमध्ये एक विशेष अदाकारी होती. त्यात अश्लीलपणा नव्हता. परंतु आता मात्र त्यात एक वेगळेपणाच आला आहे. गौतमी पाटील, माधुरी पवार यांसारख्या ऑर्केस्ट्रा डान्सर मुलींना आजकाल 'कला' व 'सांस्कृतिक' कार्यक्रमाच्या नावाखाली स्टेजवर बोलावले जाते.

आज महाराष्ट्रात असा एकही कानाकोपरा नाही जिथे यांनी हजेरी लावली नसेल. विशेषतः दहीहंडी, गणेशोत्सव, नवरात्र किंवा कुठलाही उत्सवी कार्यक्रम जवळ आला की यांचे शो ठरलेले असतात. कुठेही सांस्कृतिक या नावाखाली कार्यक्रम होत असला तरी या मुलींना हजेरी लावायला बोलावले जातेच.

यामध्ये महत्त्वाचे म्हणजे अशा गडगंज कार्यक्रमांना राजकीय पाठबळ असते. राजकीय नेत्यांना गर्दी हवी असते आणि लोकांना मनोरंजन हवे असते. कलाकार म्हणवणाऱ्यांना पैसा हवा असतो. म्हणूनच राजकीय अधिष्ठान असलेल्या कार्यक्रमांमध्ये या मुलींना पहिले प्राधान्य दिले जाते.

त्यांच्यासाठी मोठमोठे बॅनर, पोस्टर्स, विशेष गाड्या, सुरक्षा, लोकांसमोर सत्कार, सगळे ठरलेले असते. राजकीय लोक त्यांना स्वतःच्या पैशाने प्रोत्साहन देतात. कारण यातून त्यांची लोकप्रियता वाढते आणि त्या मुलींकडेही पैशाचा ओघ जाऊन मिळतो. पण आजकाल रंगमंचावर घडते काय तर डोळे मारणे, शिट्ट्या वाजवणे, विचित्र हालचाली करून अंगविक्षेप दाखवणे, अंगप्रदर्शन करणारे हावभाव करणे हेच या कार्यक्रमांचे मुख्य आकर्षण असते.

अशा प्रकारच्या अभिनयालाच ही मंडळी कला म्हणतात. या सगळ्याला कला म्हणणे देखील ही पुरुषसत्ताक मानसिकतेचीच देण आहे. कारण मंचावर स्त्रिया वस्तूप्रमाणे उभ्या केल्या जातात आणि पुरुषी वासना संस्कृती म्हणून लोकांसमोर मिरवली जाते. हे आधुनिक सरंजामी तंत्र आहे.

जुन्या काळी जसे जमावाला दारू तमाशाने बहकवायचे, तसेच आज लोकांना अशा अश्लील कार्यक्रमांनी फसवले जाते. खऱ्या अर्थाने लोककला म्हणजे ग्रामीण भागातील जीवन, लोकपरंपरा, संघर्ष, शौर्य, भक्ती किंवा संस्कार यांचे दर्शन घडवणारी कला. पण इथे लावणी, तमाशा लोककलांच्या नावाखाली अश्लील हालचालींचे प्रदर्शन होते.





प्रेक्षकांमध्ये फक्त तरुण मुलं-मुलीच नसतात, तर शाळकरी मुले, लहान मुली, मध्यमवयीन आणि वृद्ध मंडळी सगळे असतात. हे सर्व लोक अशा दृश्यांना सामोरे जातात आणि त्या वातावरणाला 'सांस्कृतिक कार्यक्रम' (?) म्हणतात. त्यामुळे मुलांवर लहान वयातच चुकीचे संस्कार होतात.

तरुण पिढी अश्लीलतेकडे आकर्षित होते आणि मोठी मंडळीही हेच 'मनोरंजन' म्हणून स्वीकारतात. त्यामुळे एकंदरित वातावरणावर अश्लीलतेचा पगडा बसतो. मुळातच कोणतीही कला ही समाजाला विचार देणारी, प्रेरणा देणारी, माणसाला सौंदर्यदृष्टी आणि नैतिक मूल्यं शिकवणारी असते. परंतु या मुली आणि त्यांना प्रोत्साहन देणारे आयोजक केवळ पैसा, टाळ्या आणि स्वस्त लोकप्रियतेसाठी मंचाचा वापर करत आहेत. त्यांचे कार्यक्रम हे क्षणिक आकर्षण निर्माण करतात. पण त्यातून समाजाच्या नैतिक मूल्यांचे अधःपतन होते.



थर्ड अम्पायर
जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९१४२०

आज महाराष्ट्रातील लोककला लावणी, पोवाडा, भारूड या कलांना जगासमोर उभे राहण्यासाठी धडपड करावी लागते. त्याचवेळी तथाकथित 'स्टेज डान्स' समाजात 'संस्कृती' म्हणून पोसले जात आहेत. हे दृश्य केवळ कलाविकृतीचे उदाहरण आहे. जर अशा कार्यक्रमांमुळे समाजाचे मानसिक स्वास्थ्य बिघडत असेल, पुढच्या पिढीला चुकीचे संस्कार मिळत असतील, तर अशा प्रकारच्या तथाकथित कार्यक्रमांना हजेरी लावणे कितपत योग्य आहे? याचा विचार सर्व नागरिकांनी करणे गरजेचे आहे.

पण प्रश्न असा की, ज्यांना हे सगळे 'कला' म्हणून आदर्श वाटते, त्यांच्यातले कुणी आपल्या घरातून गौतमी पाटील किंवा माधुरी पवार घडवायला तयार आहे का? आपल्या मुलींना, बहिणींना किंवा बायकोला या रंगमंचावर नाचवून 'संस्कृती' घडवता येईल का ? जर उत्तर नाही असेल, तर लोकांसमोर उभ्या राहणाऱ्या मुलींना मात्र अशा अश्लील नाच-गाण्याचे प्रतीक बनवून, टाळ्या, शिट्ट्या वाजून तुम्ही महाराष्ट्रासमोर काय सिद्ध करू इच्छित आहात? त्यामुळेच या सर्व प्रकाराला फक्त राजकारण्यांना दोष देऊन चालणार नाही, तर त्या कार्यक्रमासाठी गर्दी करणाऱ्या रसिकांनाही त्याचा दोष द्यावा लागेल.

रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील सर्वात आदर्श शिक्षण संस्था आहे. त्यामुळे झालेल्या प्रकारामुळे त्या शिक्षण संस्थेला मानहानिकारक टीकेला सामोरे जावे लागले. तरी देखील या संस्थेबद्दलचा आदर्श समाजात कायम राहील, यासाठी समाजाने देखील आता जागृत राहिले पाहिजे. मात्र असे प्रकार पुन्हा घडू नये यासाठी सर्वांनी सामूहिक प्रयत्न करावे. तूर्त तरी अण्णांनी सर्वांना माफ करावे हीच माफक अपेक्षा!

## गावात मैदानच नसल्याने हा प्रकार घडला

रयत शिक्षण संस्था ही महाराष्ट्रातील एक नावाजलेली शैक्षणिक संस्था आहे, जी राज्यभरात अनेक शाळा आणि महाविद्यालये चालवते. मोरगाव येथील मयुरेश्वर विद्यालयही याच संस्थेच्या अंतर्गत आहे. या शाळेच्या प्रांगणात दरवर्षी भैरवनाथ यात्रेनिमित्त मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात, कारण गावात स्वतंत्र मैदान उपलब्ध नाही. स्थानिकांच्या मते, ही वर्षानुवर्षे चालत आलेली परंपरा आहे. मात्र, यंदाच्या कार्यक्रमातील नृत्याच्या अश्लील स्वरूपामुळे ही परंपरा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. आता या घटनेला राजकीय रंग प्राप्त झाला आहे. विरोधकांनी या व्हिडिओचा आधार घेत पवार कुटुंबावर टीका सुरू केली आहे. शैक्षणिक संस्थेत अशा प्रकारचा कार्यक्रम होणे अयोग्य असल्याचा आरोप त्यांच्याकडून होत आहे. यामुळे बारामतीच्या राजकीय वातावरणात तणाव निर्माण झाला आहे. मोरगाव हे अष्टविनायकांपैकी मयुरेश्वर गणपती मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. या मंदिराला भेट देण्यासाठी राज्यभरातून भाविक येतात. मात्र, यंदाच्या वादग्रस्त नृत्यामुळे या परंपरेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आता इथून पुढे गावातील सर्व नागरिकांनी एकत्र येऊन पुन्हा अशा प्रकारचा सार्वजनिक तमाशा होऊ नये म्हणून पुढाकार घेतला तर गावातील वातावरण देखील पूर्वीसारखेच चांगले राहील.

## संस्थेने 'कमवा आणि शिका' हा मंत्र दिला

रयत शिक्षण संस्थेची स्थापना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी सातारा जिल्ह्यातील काले गावात केली. त्यांचा उद्देश बहुजन समाजातील, विशेषतः मागासवर्गीय आणि गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हा होता. कमवा आणि शिका या मंत्राद्वारे त्यांनी स्वावलंबी शिक्षणावर भर दिला आणि ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार केला. रयत शिक्षण संस्थेने शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच सामाजिक समता, बंधुता आणि श्रमप्रतिष्ठा यांसारख्या मूल्यांचा प्रचार केला. संस्थेने प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये, तंत्रशिक्षण संस्था आणि वसतिगृहे स्थापन केली. दलित आणि उपेक्षित समाजातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उघडून अंधश्रद्धा, अस्पृश्यता आणि जातीभेदाविरुद्ध लढा दिला. आज संस्था महाराष्ट्र आणि कर्नाटकात ६७९ शाखांद्वारे साडेचार लाख विद्यार्थ्यांना शिक्षण देते. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील १६ जिल्ह्यांमध्ये कार्यरत आहे, ज्यात ४३ महाविद्यालये, ४३९ शाळा, १७ कृषी महाविद्यालये आणि अनेक वसतिगृहे समाविष्ट आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्यामुळे त्यांना १९५९ मध्ये पद्मभूषण पुरस्कार मिळाला. संस्था आजही शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तन घडवत आहे आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देत आहे.

# भविष्यातील विश्वगुरू भारतासाठी शिक्षणाचा मंत्र

(कालच्या अंकावरून पुढे)

जर आपली शाळा आणि पालक या मुल्यांचे बीजारोपण लहान वयातच करतील, तर ही मुले भविष्यातः

वयाने मोठ्यांचा आदर करतील, समाजात सहअस्तित्व राखतील, मतभेद असूनही संवाद साधतील, आणि निर्णय घेताना स्वतःपेक्षा समाजाच्या हिताचा विचार करतील. या सर्वांचा थेट परिणाम देशाच्या सामाजिक सलोख्यावर आणि एकूण विकासावर होतो.

थोडक्यात काय? जर आपण भारताला विकसित राष्ट्र बनवायचं ठरवलं असेल, तर फक्त ऋद्ध वाढवणं, तंत्रज्ञानात प्रगती करणं, किंवा पायाभूत सुविधा निर्माण करणं पुरेसं नाही. देशाच्या प्रगतीचा खरा वेग हे त्याच्या नागरिकांच्या मानसिकतेवर आणि मूल्यांवर अवलंबून असतो.

यासाठी आवश्यक आहेः शाळा पातळीवर civic sense शिकवणं, सार्वजनिक मालमत्तेला आपलं मानण्याची सवय घालणं, नम्रता, आदर, सहिष्णुता यांसारख्या मुल्यांचं शिक्षण देणं, आणि पालक व शिक्षक यांचा सक्रिय सहभाग असणं.

ज्याप्रमाणे इमारतीचा पाया मजबूत असेल तर ती भक्कम उभी राहते, त्याचप्रमाणे देशाच्या भविष्यातील पायाला घडवायचं असेल, तर मुलांमध्ये लहानपणापासूनच योग्य मूल्यं, समज, आणि जबाबदारीचं भान निर्माण करणं अत्यावश्यक आहे.

अंतिम भाग

भारत हा एक कृषिप्रधान देश आहे, पण दुर्दैवाने आज कृषिक्षेत्र मागे पडताना दिसत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे या क्षेत्राबाबत पुरेशी जागरूकता आणि प्रतिष्ठा समाजामध्ये अद्याप निर्माण झालेली नाही. इतर क्षेत्रांप्रमाणेच कृषी क्षेत्राचं देखील राष्ट्रनिर्मितीत मोलाचं योगदान आहे, पण दुर्दैवाने याकडे फारसं गांभीर्याने पाहिलं जात नाही.

आज जर एखाद्या वर्गातील १०० विद्यार्थ्यांना विचारलं की तुम्हाला मोठं होऊन काय बनायचं आहे, तर त्यातील फारच थोडे कदाचित २-३ विद्यार्थी मला शेतकरी व्हायचं आहे असं सांगतील. उर्वरित मुलं डॉक्टर, इंजिनीअर, आयएएस अधिकारी, सॉफ्टवेअर डेव्हलपर होण्याचं स्वप्न पाहतील. ही गोष्ट आपल्या समाजातील मानसिकतेचं आणि कृषी क्षेत्राविषयी असलेल्या गृहित धारणा यांचं वास्तव दर्शवते.

पण जर आपण लहानपणापासूनच विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्राचं महत्त्व, त्यातील संधी, आणि शाश्वत विकासात शेतकऱ्यांची भूमिका शिकवायला सुरुवात केली, तर निश्चितच भविष्यात देशाला सशक्त, साक्षर, आणि आधुनिक विचारसरणी असलेले शेतकरी लाभतील झ ज्यांची आज अत्यंत गरज आहे. तसंच, पारंपरिक शेती पद्धतींमध्येही आता बदल घडवणं अत्यावश्यक आहे.

आज आपण रासायनिक खतांच्या अतिरेकी वापरामुळे मातीच्या सुपीकतेचा नाश करत आहोत. ही कृत्रिम शेती भविष्यात निसर्ग, आरोग्य आणि अन्नसुरक्षेसाठी गंभीर धोका ठरू शकते. म्हणूनच, आता वेळ आली आहे की शेतीमध्ये सेंद्रिय पद्धती (organic farming), नवीन वैज्ञानिक तंत्रज्ञान, आणि स्मार्ट ॲग्रीकल्चर यांचा वापर करून पर्यावरणपूरक, टिकाऊ, आणि उत्पादक शेतीकडे वाटचाल करावी.

विद्यार्थ्यांना लहानपणापासून शेतीचे मूल्य शिकवणं, तिला प्रतिष्ठा देणं, आणि नव्या तंत्रज्ञानासह आधुनिक शेतीचे शिक्षण देणं हे आपल्या शिक्षणपद्धतीचा अविभाज्य भाग बनणं अत्यंत गरजेचं आहे. यातूनच आपल्याला उद्याचे यशस्वी शेतकरी आणि सशक्त भारत घडवता येईल.

विद्या भारती ही एक संघटित सामाजिक शैक्षणिक चळवळ असून, ती आज संपूर्ण भारतात राष्ट्रीय पातळीवर कार्यरत आहे. सध्या देशभरात विद्या भारतीच्या मार्फत सुमारे १२,००० शाळा थेट चालवल्या जात आहेत, तर आणखी २४,००० शाळा विविध संस्थांच्या माध्यमातून या चळवळीशी सलग्न आहेत. म्हणजेच एकूण ३६,००० शाळा विद्या भारतीच्या शिक्षणदृष्टीकोनाने प्रेरित होऊन कार्यरत आहेत.

विद्या भारतीच्या शिक्षणपद्धतीचा केंद्रबिंदू म्हणजे शैक्षणिक गुणवत्ता, मूल्याधारित शिक्षण, आणि संस्कारांचे संवर्धन. हे शिक्षण आपल्या भारतीय संस्कृती आणि हिंदुत्ववादी विचारसरणीचा पाया मानते.

प्राचीन भारत विश्वगुरू होता, कारण इथे केवळ ज्ञानच नव्हे, तर मूल्य, आचारधर्म, आणि चारित्र्य यांना सर्वोच्च स्थान दिलं जात होतं. आजही आपण २१ व्या शतकात भारताला पुन्हा विश्वगुरू बनवायचं असेल, तर नवीन पिढीमध्ये देशभक्ती, संयम, सेवा, आणि नीतिमूल्यांची रुजवणूक झाली पाहिजे झ आणि हे कार्य शिक्षणाच्या माध्यमातूनच साध्य होऊ शकतं.

विद्या भारती हीच भूमिका पार पाडत असून, संपूर्ण देशभरात ती नव्या पिढीमध्ये भारतीय संस्कृतीवर आधारित शिक्षण मूल्यांचं सिंचन करत आहे. म्हणूनच, भारतातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांनी विद्याभारतीच्या या व्यापक कायार्शी सलग्न होऊन मूल्याधारित शिक्षण देण्याच्या या राष्ट्रीय प्रयत्नाला हातभार लावणं ही काळाची गरज आहे. या समन्वयातून एक नवा भारत उभा राहील झ असा भारत जो केवळ ज्ञानसमृद्धच नव्हे, तर संस्कारी, सशक्त, आणि पुन्हा एकदा जगाला मार्गदर्शक बनण्यास सज्ज असेल, म्हणजेच विश्वगुरू भारत.

सारांशतः, आपल्या शिक्षणपद्धतीमध्ये अभ्यासक्रमाचे अद्यतीकरण, इंटर्नशिपला अनिवार्यता, स्किल-आधारित मूल्यांकन, उद्योग-शिक्षण समन्वय, आणि विद्यार्थी-केंद्रित विचारसरणी ही तत्त्वे अंगीकारली तरच आपण भविष्यातील जागतिक स्पर्धेमध्ये टिकू शकतो.

केवळ मार्क्सच्या आधारावर शिक्षणाचा दर्जा मोजणं थांबवावं लागेल, आणि त्याऐवजी, विद्यार्थ्यांनी काय करू शकतात यावर भर द्यायला हवा. ही गरज आता नाहीतर कधीच नाही. देशाची खरी उन्नती हे शिक्षणावर अवलंबून आहे, पण केवळ शिक्षणच नव्हे तर योग्य शिक्षणावर!

श्रिजीत राजश्री चेतक भोकरे
१२ वी (विज्ञान शाखा)
मॉडेल ज्युनिअर कॉलेज,
कारंजा घाडगे, जिल्हा वर्धा.
9970591697
bhokareshrijeet@gmail.com

# बाकी सगळं ठीक आहे...



डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
नागपूर.
९४२२१२५६५६
७०२०३४३४२८

**बाप्पा.......**
तुमच्या आगमनाची बातमी मिळाली...मन आनंदाने फुलून गेले. शहर तुमच्या स्वागताच्या तयारीत गुंतले आहे. चौक-चौकात तोरणद्वार झळकत आहेत, मंडपात रंगीबेरंगी दिवे लुकलुकत आहेत आणि ढोल-ताशांच्या गजराने वातावरण दुमदुमले आहे. सगळं काही वरवर उत्सवी दिसतंय, पण यामागची खरी परिस्थिती काही औरच आहे. म्हणून तुम्हालाही थोडं कळवावं असं वाटलं... बाकी सगळं ठीक आहे.

**गणराज,**
यंदा तुमच्या स्वागताला सर्वात मोठा अडसर म्हणजे रस्ते आणि पुलांवरील खड्डे आहेत. स्थिती अशी आहे की वाहनचालकांना समजेनासं झालंय की ते रस्त्यावरून चालताहेत की एखाद्या ऑफ-रोड रॅलीत भाग घेताहेत. पुलांवरील खड्डे, गल्लीबोळातील उखडलेला डांबर आणि अधुरं काम असलेले पूल हेच जणू तुमच्या नगरप्रवेशासाठीच्या पुष्पशय्येऐवजी काट्यांचं बिछानं आहे... बाकी सगळं ठीक आहे.

**हे विघ्नहर्त्या,**
ट्रॅफिक जाम तर आता शहराचा कायमस्वरूपी उत्सवच झालाय. लोक घरापर्यंत पोहोचण्याआधीच तासन्तास रस्त्यावर अडकतात आणि तिथूनच गणपती बाप्पा मोरया चा जप सुरू करतात. बाप्पा, बाकी सगळं ठीक आहे.

**चिंताहरणा,**
राजकारणाचाही उत्सव जोशात आहे. महापालिका निवडणुकीच्या आशेने नेते गणित मांडण्यात व्यस्त आहेत. विरोधक मतांची चोरी झाल्याचं गाणं गातायत तर सत्ताधारी त्याला उलटतायत. काहीजण तर बिहारच्या मतचोरीच्या होडीत बसून आपली नैया पार लावायचं स्वप्न पाहताहेत. पण जनता? तिची होडी तर लाटांमध्ये डळमळतेय आणि तिला केवळ तुमचाच आधार हवाय. बाप्पा, या दहा दिवसांत हे सारे तुमच्या चरणी येऊन तुम्हाला चुकीची माहिती देऊन भुलवायचा प्रयत्न करतील. पण तुम्ही सावध राहा...बाकी सगळं ठीक आहे.

**बाप्पा......**
यंदा एकच विनंती... शहरात येताना ट्रॅफिक नेव्हिगेशन ॲप, हेल्मेट आणि थोडा जास्त वेळ घेऊन या. तुमची सवारी खड्ड्यांतून आणि जाममधून पार काढणं काही सोपं नाही.

आणि सर्वांत महत्वाचं – मूषक महाराजांना सडकेवर फिरताना जपून फिरायला सांगा...श्वानानना हद्दपार करण्याचे आदेश आले आहेत....त्यासाठी श्वानपथक त्यांना पकडण्यासाठी रस्त्यावर फिरत आहे....

अजून एक महत्त्वाचं... यंदा प्रसादात बुद्धी भरपूर आणा. कारण शहरातील नेत्यांना हाच प्रसाद सर्वाधिक आवश्यक आहे. लाडू-मोदक तर प्रत्येक मंडपात मिळतीलच...बाकी सगळं ठीक आहे.

हीच थोडक्यात परिस्थिती तुमच्या ध्यानात आणून दिली आहे. तुम्ही तर सिद्धी-बुद्धीचे दाता आहात. म्हणून आपल्या सोयीप्रमाणे पधारा **बाप्पा,** स्वागत नेहमीप्रमाणे मनापासूनच होईल. गणपती बाप्पा मोरया....

■ ■ ■

# नागपूरची म्युझिकल चेअर आणि खरा दोषी कोण?

दशकानुदशके ग्रामीण आणि मराठी माध्यमातील शाळा हे महाराष्ट्राच्या स्वस्त व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे मेरुमणी राहिले आहेत.

१९७०-८० च्या दशकात शासनाकडे पुरेशा संसाधनांची कमतरता असतानाही अशा अनेक शाळांनी समाजाच्या देणग्या, सेवाभाव आणि अल्प शुल्काच्या (म्हणजे अवघे २० ते २००) जोरावर लाखो डॉक्टर, अभियंते, अधीकारी व वकील घडवले. परंतु आज त्या शाळाच शालार्थ घोटाळ्याच्या भोवऱ्यात सापडल्या आहेत. शिक्षण विभागाच्या चौकशीने सुरू झालेला हा प्रकार आता एक राजकीय म्युझिकल चेअर झाला आहे. दोष एकाकडून दुसऱ्यावर फिरवला जातो, पण कोणताही निर्णय निश्चित होत नाही.

## शालेय शिक्षणातील शालार्थ घोटाळा

### दोष रोखण्यासाठी सुरू झालेला 'खेळ'

सुरुवातीला चौकशी यंत्रणांनी सर्व दोष शिक्षण विभागावर ढकलला. नंतर तपासाचा घेर वाढवून शाळांच्या सचिव व व्यवस्थापन मंडळांवर आरोप ठेवले गेले, जरी त्यांच्या शालार्थ प्रक्रियेतील प्रत्यक्ष भूमिकेचा पुरावा नसतानाही. त्यानंतर शिक्षकांवर आणि मुख्याध्यापकांवर कारवाई करत त्यांचे पगार रोखण्यात आले.

शिक्षक हे सर्वात जवळचे व सोपे टार्गेट असल्याने त्यांच्यावर कारवाई सहज झाली. परंतु शिक्षक संघटनांच्या दबावानंतर लक्ष प्रशासकांवर वळले.

आता खरी अडचण सुरू होते. हे प्रशासक स्वतः शिक्षण विभागाशी आणि मंत्रालयीन मंजुरी प्रक्रियेशी जोडलेले असल्याने त्यांच्यावर कारवाई करणे म्हणजे शासनाने स्वतःच स्वतःविरुद्ध खटला चालवणे. त्यामुळे पुन्हा दोष शाळांवर ढकलला गेला.

आज पालकमंत्र्यांपासून काही राजकीय मंडळी शाळांचे मालमत्ता जप्तीचे इशारे देत आहेत, जणू ग्रामीण शिक्षण पद्धतीच हाच घोटाळ्याचा मूळ आहे! ही अत्यंत अन्यायकारक भूमिका आहे.

### 'ड्राय डिस्ट्रिक्ट्स' आणि अधुरी चौकशी

नागपूर विभागात २० पेक्षा अधिक अटक झाल्या असताना काही जिल्ह्यांवर अजून कोणतीही चौकशी सुरू नाही. ज्या जिल्ह्यांतून खास राजकीय हस्तक्षेप होतो, तिथे चौकशी जणू थांबवली गेली आहे – जणू काही ते ड्राय डिस्ट्रिक्ट्स आहेत आणि तिथे घोटाळाच झाला नाही!

जर शाळांचे व्यवस्थापन, मुख्याध्यापक आणि शिक्षक यांचं एकत्रित मत नोंदवून खऱ्या दोषींवर (आयडी तयार करणारे, मंजुरी देणारे आणि प्रक्रियेला परवानगी देणारे अधिकारी) कारवाईची मागणी केली नाही, तर नेहमीप्रमाणे वरची जबाबदार मंडळी मोकाटच राहतील.



अरूण सोपानराव कराळे
सेवानिवृत्त पदाविधर शिक्षक
दत्तवाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

### निष्कर्ष

शिक्षक, मुख्याध्यापक आणि ग्रामीण शाळा या कोणत्याही राजकीय म्युझिकल चेअरचा भाग नसाव्यात. जर शासन आपल्या परस्परावलंबी प्रशासकीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास तयार नसेल, तर राजकीय आरोप-प्रत्यारोप सुरूच राहतील आणि ग्रामीण शिक्षण संस्थांवर न केलेल्या गुन्ह्यांचे डाग कायम राहतील.

■ ■ ■

# कुत्र्यानं चाटल्यानं बाळ दगावलं



सर्वोच्च न्यायालयाने दिल्ली-एनसीआरमध्ये सर्व भटक्या कुत्र्यांना रस्त्यावरून डॉग शेल्टर होममध्ये पाठवण्याचे आदेश दिले. त्याविरोधात लोक रस्त्यावर उतरले. पण याचवेळी एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. कुत्रा चावल्याने वेळेवर इलाज न झाल्यास काय होते, याचे वृत्त तुम्ही वाचले अथवा पाहिले असतील. पण कुत्र्याने दोन वर्षांच्या बाळाच्या जखमेला चाटल्याने त्याचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. अदनान नावाच्या २ वर्षांच्या मुलाचा रेबीजमुळे मृत्यू ओढावला. या कुत्र्याने बाळाची एक जखम जिभेने चाटली होती. कुटुंबाने त्याकडे दुर्लक्ष केले. हा हलगर्जीपणा मुलाच्या जीवावर उठला.

### कुत्र्याने चाटली जखम

कुत्र्याने एक महिन्यापूर्वी मोहम्मद अदनान याच्या पायावर एक जखम झाली होती. ती कुत्र्याने चाटली होती. त्यानंतर हा मुलगा पाण्याला घाबरायला लागला आणि त्याने पाणी पिणेच बंद केल्याने कुटुंबाला संशय गेला. या लक्षणाला हायड्रोफोबिया म्हणतात. मुलाची तब्येत बिघडल्यावर त्याला सार्वजनिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. तिथे दुसऱ्या दिवशीच हे मुल दगावले.

या घटनेने कुटुंबालाच नाही तर त्या परिसराला मोठा धक्का बसला. या गावातील जवळपास दोन डझन लोकांना रुग्णालयात आणून त्यांना रेबीजचे इंजेक्शन देण्यात आले. त्यानंतर डॉक्टरांचं पथक या गावात पोहचले आणि त्यांनी रेबिजची कारणं, लक्षणं,परिणाम आणि उपायांची माहिती दिली.

उत्तर प्रदेशातील बदायू जिल्ह्यातील गावात ही घटना घडली. त्यानंतर डॉक्टरांचे पथक गावात दाखल झाले. त्यांनी गावकऱ्यांना रेबिजची माहिती दिली. केवळ कुत्रा चावल्यानेच नाही तर कुत्रा चाटल्याने सुद्धा रेबीजचा धोका होऊ शकतो असा दावा त्यांनी केला. त्याकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. या गोष्टींकडे कानाडोळा करू नका असा दावा त्यांनी केला. अशा प्रसंगात लागलीच रेबीजचे इंजेक्शन घ्यावे असा सल्ला डॉक्टरांनी दिला.

### रेबीज काय आहे?

रेबीज एक असा आजार आहे, जो मेंदू आणि मज्जासंस्थेला प्रभावित करतो. हा आजार जीवाणूंमुळे होतो. त्याचे नाव रॅपटो व्हायरस असे आहे. कुत्रा चावला अथवा तो चाटला जरी तरी त्यामुळे हा आजार पसरतो. अशा आजारामुळे मृत्यू पण ओढावू शकतो.

कुत्र्याच्या लाळेत रेबिज व्हायरस असू शकतो. हा व्हायरस जखम, मेम्ब्रेन (डोळे, तोंड, नाक) यांच्या संपर्कात आल्यावर मनुष्यात संक्रमित होऊ शकतो आणि त्यामुळे जीव जाऊ शकतो.

■ ■ ■

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

### सर्जा राजाचे मनोगत..!

लम्पीमुळे आमच्या
सणावर पडलं विरजन
यांत्रिक युगामुळे
आमचीही झाली घसरण..!

अतिवृष्टी ढग फुटीने
पिकांची झाली धुळधाण
दुबार पेरणीने, मालका
तुझ्यात राहीला नाही त्राण..!

शासन आहे वाचाळ-
नुसतेच पंचनामे करतात
पाठीराखा म्हणून ऑनस्पॉट
बांधावर मदत कुठे देतात ?

# गणेशोत्सव कालावधीत राष्ट्रीय महामार्ग क्र. 66 वर 16 टनापेक्षा जास्त क्षमता असणाऱ्या सर्व वाहनांना पूर्णत: बंदी

**रायगड, दि. २१ : प्रतिनिधी**




दि. 27 ऑगस्ट 2025 पासून सुरु होणाऱ्या गणेशोत्सवाचे अनुषंगाने गणेशभक्त कल्याण, डोंबिवली, ठाणे, वसई, व मुंबई येथून मोठ्या प्रमाणावर कोकण व गोवा या भागात जाण्याकरिता खाजगी व प्रवासी वाहनांचा वापर करतात. त्यामुळे या कालावधीत दोन्ही (पुणे व कोकणमार्गे) मार्गावर प्रचंड प्रमाणात बाहतुकीची वर्दळ वाढते. याकरिता गणेशोत्सव कालावधीत राष्ट्रीय महामार्ग क्र. 66 वर सर्व वाहने ज्यांची वजनक्षमता 16 टन किंवा 16 टनापेक्षा जास्त आहे. (जड-अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर, लॉरी इ. वाहने) अशा वाहनाच्या वाहतुकीस पूर्णतः बंदी सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल निलेश धोटे यांनी लागू केली आहे.

दि.23 ऑगस्ट 2025 रोजी 00.01 वाजेपासून ते दि.28 ऑगस्ट 2025 रोजी रात्री 23.00 वाजेपर्यंत, दि. 31 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी 08.00 वाजेपासून ते रात्री 23.00 वाजेपर्यंत आणि दि. 02 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 08.00 वाजेपासून ते रात्री 23.00 वाजेपर्यंत तसेच दि. 06 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 08.00 नंतर ते दि. 07 सप्टेंबर 2025 रोजी 20.00 वाजेपर्यंत या कालावधीत मुंबई गोवा या राष्ट्रीय महामार्ग क्र. 66 वर सर्व वाहने ज्यांची वजनक्षमता 16 टन किंवा 16 टनापेक्षा जास्त आहे. (जड-अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर, लॉरी इ. वाहने)यांची वाहतुक पूर्णतः बंद करण्यात येणार आहे.

जेएनपीटी बंदर व जयगड बंदर येथून आयात निर्यात मालाची वाहतूक करणारी वाहने दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस सिलेंडर, मेडीसीन, लिक्वीड मेडीकल ऑक्सीजन, अन्न-धान्य, भाजी-पाला, नाशवंत माल इ. जीवन आवश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना लागू राहणार नाही. तसेच मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. 66 च्या रस्ता रुंदीकरण/रस्ता दुरुस्ती कामकाज इ. साठी लागणारे साहित्य ने-आण करणाऱ्या वाहनांना बंदी लागू राहणार नाही. मात्र या संदर्भात वाहतूकदारांनी संबंधित वाहतूक विभाग/महामार्ग पोलीस यांच्याकडून प्रवेशपत्र घ्यावे असे त्यांनी प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# "वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय बाल शौर्य " पुरस्कार मिळालेली हाली बरफ आज बेरोजगार !

## शहापूर तालुक्यातील आदिवासी समाजाची धाडसी कन्या शासनाच्या दुर्लक्षामुळे त्रस्त

**शहापूर, दि. २१ : प्रतिनिधी**

शहापूर तालुक्यातील नांदगाव येथील मूळ रहिवासी असलेल्या हाली बरफ या आदिवासी कन्येने लहान वयात आपल्या स्वतःच्या बहिणीचे प्राण वाघाच्या हल्ल्यातून वाचवले, ही घटना संपूर्ण देशभर गाजली होती. तिच्या या पराक्रमाबद्दल तिला देशाचे तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या हस्ते सन २०१३ मध्ये " वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय बाल शौर्य पुरस्कार " बहाल करण्यात आला. तिच्या शौर्याची नोंद आज महाराष्ट्रातील शालेय पाठ्यपुस्तकांत आहे. प्राथमिक शिक्षणात इयत्ता चौथीच्या अभ्यासक्रमात तिचा पाठ आहे. शहापूर तालुक्यातील व आदिवासी समाजाचा हा अभिमान असून, हीच मुलगी सध्या बेरोजगारीच्या गर्तेत सापडली आहे.

हाली बरफ मागील काही वर्षांपासून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापूर अंतर्गत खर्डी येथील मुलींच्या वस्तीगृहात रोजंदारीवर काम करत होती. त्याआधी तिने शासकीय आश्रम शाळा पेंढरघोळ व शासकीय मुलींचे वस्तीगृह शहापूर येथेही सेवा बजावली होती. परंतु मागील



सहा महिन्यांपासून तिच्या हाताला काम नाही. परिणामी जगण्यासाठी तिला गावागावांत मजुरी करावी लागत आहे. जंगलातील गवत कापून ते विकून जगावे लागत आहे. शासन नको येथे कोट्यवधी रुपये खर्च करत असते. मात्र हाली बरफ सारख्या " वीर बापूराव गायधनी राष्ट्रीय बाल शौर्य " पुरस्कार मिळालेल्या हाली बरफ हिला कायमचा रोजगार विशेष बाब म्हणून का नाही देऊ शकत नाही अशी विचारणा लोकांमधून होत आहे. एक आदिवासी समाजाची असलेली शौर्य विर पुरस्कार प्राप्त कन्या शासनाच्या दुर्लक्षामुळे त्रस्त बनली आहे. पुरस्कार मिळाला त्यावेळी ती लहान होती.आज तो प्रश्न नाही. शासन विशेष बाब म्हणून कायमचा रोजगार देऊ शकतो.

एकीकडे स्वतःच्या बहिणीचे प्राण वाचवणाऱ्या आणि वाघाशी झुंज देणाऱ्या या धाडसी आदिवासी कन्येला देशभरातून गौरवले जाते, तिच्या शौर्यकथेवरून विद्यार्थी प्रेरणा घेतात, परंतु शासनाने तिला आजवर कायमस्वरूपी नोकरी वा रोजगाराचा आधार दिला नाही, ही बाब समाजाला वेदनादायी व लज्जास्पद ठरली आहे.

श्रमजीवी संघटना शहापूर तालुका यांच्यावतीने या संदर्भात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प शहापूर प्रभारी प्रकल्पाधिकारी श्री. दिवाकर काळपांडे साहेब यांच्याकडे निवेदन देण्यात आले आहे. हाली बरफ हिला तातडीने कायमस्वरूपी नोकरी द्यावी किंवा शासकीय सेवेत समाविष्ट करून तिच्या शौर्याचा सन्मान करावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलनात्मक पावले उचलावी लागतील, असा इशाराही संघटनेने दिला आहे. निवेदन देताना शहापूर तालुका सचिव प्रकाश खोडका आणि तालुका युवा प्रमुख रुपेश अहिरे तसेच स्वतः हाली बरफ उपस्थित होत्या.

# मालवण तहसील कार्यालयाचा अनागोंदी कारभार! सुनावणीसाठी आलेल्या हार्टच्या पेशंटला तीन तास बसवून ठेवले

**मालवण, दि. २१ : प्रतिनिधी**

ग्रामीण जनतेच्या सेवेसाठी असलेले जिल्हाधिकारी, तहसीलदार , आणि तलाठी कार्यालय येथील कर्मचाऱ्यांचा, तेथे येणाऱ्या जनतेशी सलोखा असायला हवा. लोकांना ताटकळत न ठेवता लोकांची झटपट कामे व्हायला हवी, असे सरकारचे सक्त आदेश आहेत.मात्र मालवण तहसील कार्यालयाने हे आदेश अक्षरशः धाब्यावर बसवलेले आहेत. या ठिकाणी ज्या केसेसची सुनावणी असते तिची वेळ अकरा वाजताची असताना, कार्यालयातील अधिकारी मनात येईल त्यावेळेला सुनावणी करतात. त्यांच्या याच नाकर्तेपणाचा फटका मुंबईवरून सुनावणीसाठी गेलेल्या, बापू( सोनू) अण्णा जाधव नावाच्या एका हार्टच्या पेशंटला बसलेला आहे. माझ्या छातीत दुखते मला लवकर फ्री करा डॉक्टर कडे जाऊ द्या! अशी विनंती करून ही तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांनी त्यांच्या या विनंतीला फाट्यावर मारून त्यांना तीन तास ताटकळत ठेवले. त्यानंतर सुदैवाने त्यांनी डॉक्टरी उपचार घेतले म्हणून ते बचावले. मात्र आता या प्रकरणी तहसीलदार आणि त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची चौकशी करावी अशी मागणी जाधव यांनी जिल्हाधिकारी आणि सामाजिक न्याय मंत्रालयाकडे केली आहे.

श्री बापू ( सोनू) अण्णा जाधव (६२) हे ज्येष्ठ नागरिक असून ते एका चाप्टर केस मध्ये फिर्यादी आहेत. आणि या केसची सुनावणी मालवण तहसील कार्यालयात सुरू आहे. २५ जुलै रोजी ते सुनावणीसाठी १०.३० वाजता मालवण तहसील कार्यालयात पोहचले. मात्र कार्यालयाची वेळ ११ वाजता असतानाही तेथे सुनावणीसाठी कोणीही संबंधित अधिकारी नव्हते .१ तासानंतर जाधव यांच्या छातीत दुखू लागल्याने, त्यांनी माझी सुनावणी घ्या किंवा तारीख द्या अशी विनंती तिथल्या अधिकाऱ्यांना केली. यावेळी जाधव यांचे वकील ॲड.यादव हे सुधा हजर होते .पण कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दाद दिली नाही. त्यामुळे जाधव यांनी जिल्हाधिकाऱ्यांना फोन लावला. पण ते बैठकीसाठी मुंबईला गेल्याचे समजले. मात्र त्यांच्या पी ए ने प्रकरणाचे गांभीर्य ओळखून मालवणच्या तहसीलदार वर्षा झालटे मॅडम यांना फोन लावला. आणि त्यांना प्रकरण सांगितले. त्यावर बघते असे त्यांनी टिपिकल उत्तर दिले. पण बाहेर एक हार्टचां पेशंट तळमळतोय त्याची दखल घ्यावी एवढी साधी माणुसकी तहसीलदार मॅडमने दाखवली नाही.अखेर त्रास वाढल्याने वकिलाना पुढची तारीख घ्यायला सांगून जाधव हे तेथून बाहेर पडले. आणि डॉक्टरकडे गेले. तेव्हा त्यांचे प्राण वाचले. अन्यथा काहीही घडू शकले असते.मालवण तहसील कार्यालयाचा आणि खुद्द तसीलदार मॅडमची ही कृती संतापजनक असून, या वरून मालवण तहसील कार्यालयात न्याय मागण्यासाठी येणाऱ्या गरीब ग्रामीण जनतेची काय अवस्था होत असेल याची कल्पनाही करवत नाही.तेंव्हा या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी. आणि तहसील कार्यालयातील हा अनागोदी कारभार थांबवा. अशी विनंती सोनू अण्णा जाधव यांनी सिंधुदुर्गचे जिल्हाधिकारी आणि सामाजिक न्याय विभागाला केली आहे.

# कोल्हापुरात मोठा राजकीय स्फोट! 25 ऑगस्टला धडाकेबाज घोषणा

**मुंबई, दि. २१ : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील राजकारणाला हादरा देणारी मोठी घडामोड २५ ऑगस्ट रोजी घडणार आहे. कोल्हापुरातील एक बड्या घराण्याचा वारस, जिल्हा परिषदेचा माजी अध्यक्ष आणि उद्योग क्षेत्रात मजबूत पकड असलेला हा नेता थेट अजित पवारांच्या उपस्थितीत रंगणाऱ्या सोहळ्यात नवीन राजकीय वाटचाल सुरू करणार आहे.

करवीर विधानसभा मतदारसंघात २०२४ मध्ये झालेल्या निवडणुकीत या नेत्याने थेट विरोधकांना घाम फोडला होता. अवघ्या १७०० मतांच्या फरकाने पराभव होऊनही या तरुण नेत्याची ताकद जिल्ह्याच्या राजकारणात चांगलीच गाजली. त्यामुळेच त्यांच्या या हालचालीकडे संपूर्ण कोल्हापुराचे लक्ष लागले आहे.

तो नेता म्हणजे माजी आमदार दिवंगत पी. एन. पाटील यांचे चिरंजीव राहुल पाटील.

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष म्हणून ठसा उमटविल्यानंतर त्यांनी राजीवजी सहकारी सूतगिरणीचे अध्यक्षपद सांभाळत उद्योग क्षेत्रातही वेगळी ओळख निर्माण केली.

आता २५ ऑगस्ट रोजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवारांच्या उपस्थितीत राहुल पाटील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार असून हा प्रवेश जिल्ह्यातील राजकीय समीकरणे पालटणारा ठरेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात जोर धरू लागली आहे.

कोल्हापुरातला हा 'राजकीय भूकंप' नेमका कोणाच्या पायाखालची जमीन सरकवणार, याकडे सगळ्यांचे डोळे लागले आहेत.

# उल्हासनगर महापालिकेची गणेशोत्सवानिमित्त जय्यत तयारी; आयुक्तांनी केल्या सुचना

**उल्हासनगर, दि. २१ : प्रतिनिधी**

उल्हासनगर शहरात २७.०८.२०२५ ते ०६.०९.२०२५ या कालावधीत साजरा होणाऱ्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर करावयाच्या पूर्व तयारीबाबत चर्चा करण्या करिता २०.०८.२०२५ रोजी दुपारी ३.३० वाजता प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महापालिका यांचे अध्यक्षतेखाली सर्व संबंधित अधिकारी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत संबंधितांना कारवाईच्या सूचना महापालिका प्रशासक तथा आयुक्त सौ . मनिषा आव्हाळे (भाप्रसे) यांनी दिल्या आहेत. उत्सवापूर्वी शहरातील मुख्य रस्ते, मिरवणूक मार्ग विसर्जन मार्ग यावरील खड्डे भरणे.कृत्रिम विसर्जन तलावांची दुरुस्ती करून सुसज्ज ठेवणे.कृत्रिम विसर्जन तलावांच्या ठिकाणी मनपा कर्मचारी, पोलीस कर्मचारी यांचेसाठी मंडप इत्यादी व्यवस्था सुसज्ज ठेवणे.कृत्रिम विसर्जन तलावात विसर्जित होणाऱ्या मुर्ती तात्काळ कल्याण येथील खाडीत विसर्जित करण्यात याव्यात . तर कृत्रिम विसर्जन तलावात विसर्जित झालेल्या मुर्त्या विसर्जन घाटांवर उघडयावर राहणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या सुचना आयुक्तानी दिल्या आहेत . तर शांतता क्षेत्र दर्शविणारे फलक लावुन कृत्रिम विसर्जन तलावाच्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता होणेसाठी नियमीत टँकर पुरविण्याचे नियोजन करण्यात येणार आहे . दरम्यान शहरातील मुख्य रस्त्यांवर व शहरातील गणेश विसर्जन तलावाच्या ठिकाणी पुरेशी विद्युत रोषणाईची व्यवस्था करणे.गणेश उत्सवाकरीता तात्पुरता मंडप उभारणेस नियमानुसार कारवाई करुन गणेश विसर्जन तलावांच्या ठिकाणी सी.सी. टी.व्ही. कैमरे बसविण्यात यावे . तात्पुरत्या मंडप परवानगीसाठी तयार केलेल्या ऑनलाईन सुविधेची माहिती गणेश मंडळाना देणे.नागरिक सुविधा केंद्रामध्ये मंडप परवानगीसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची सुविधा मंडळाना उपलब्ध करुन देणे.तर गणेशोत्सव कालावधीत कृत्रिम विसर्जन तलावांवर रुग्णवाहिकेसह वैद्यकीय पथक कार्यरत ठेवणे. दुर्गाडी कल्याण येथील गणेश विसर्जन तलावावर विसर्जनाच्या शेवटच्या दिवशी रुग्णवाहिका व वैद्यकीय पथकाची नियुक्ती करणे.गणेशोत्सव कालावधीत कृत्रिम विसर्जन तलावांच्या ठिकाणी अग्निशमन विभागाचे पथक, लाईफ जॅकेट बोट ठेवणे. गणेश घाटांवर कार्यरत असणारे महापालिका अधिकारी, कर्मचारी, पोलीस अधिकारी, कर्मचारी व इतर गणेश विसर्जन करणाऱ्या मंडळाचे प्रतिनिधी यांना चहा, नास्ता व जेवणाची वेळोवेळी व्यवस्था करणे.कृत्रिम विसर्जन तलावांच्या ठिकाणी सुरक्षा रक्षकांची नियुक्ती करणे.शहरातील भूमिगत व ओव्हरहेड असलेल्या विद्युत वाहिन्या तुटुन अपघात होणार नाही, याबाबतची दक्षता घेणे. उत्सव कालावधीत विद्युत पुरवठा सुरळीत राहील या दृष्टीने नियोजन करणे.कृत्रिम विसर्जन तलावांवर आवश्यकतेप्रमाणे पोलीस कर्मचारी यांची नियुक्ती करणे.कृत्रिम विसर्जन तलावांच्या मार्गावर व परिसरात वाहतुक कोंडी होणार नाही या दृष्टीने वाहतुक पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करणे.उत्सवाच्या कालावधीत शहरात कोणत्याही ठिकाणी विनापरवानगी अनधिकृत पोस्टर्स, बॅनर्स, होडींग्ज, जाहिरात फलक, कमानी इ. लागणार नाहीत याची दक्षता घेणे. बेकायदेशीर फलक लागल्याचे निदर्शनास आल्यास संबंधिताविरूध्द नियमानुसार कायदेशीर कारवाई करणे.शहरात सार्वजनिक गणेश मंडळांकडून नियमांचे उल्लंघन करून रस्त्यांवर सार्वजनिक ठिकाणी मंडप उभारले जाणार नाहीत याची दक्षता घेणे. नियमांचे उल्लंघन झाल्यास त्यांचे विरूध्द नियमानुसार कारवाई करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

गणेशोत्सवात ओला व सुका कचऱ्याचे विलगीकरण करून निर्माल्याची विल्हेवाट लावून स्वच्छता राखणे, परवानगीसह कमीत-कमी बॅनर्सचा वापर करणे, डॉल्बी (डीजे) फ्री, फटाके मुक्त गणेशोत्सव साजरा करणे, दारूबंदी, पारंपारीक वाद्यांचा सहभाग, सामाजिक उपक्रम राबविणे ज्यामध्ये रक्तदान शिबीर, स्वच्छता शिबीर यांचा समावेश असावा, प्लॅस्टीक व थर्माकोलचा वापर टाळण्याचे आवाहन महापालिका प्रशासनामार्फत करण्यात येत आहे. तसेच सर्व गणेशोत्सव मंडळ व प्रशासकीय अधिकारी यांचा सामाईक ग्रुप तयार करणे व एमपीसीबी पोर्ट मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत .

## आज का अंदाज

शुक्रवार २२ ऑगस्ट २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ७ | ० | ४ | ५ | ८ | ९ |
| १५७ | २६८ | १७९ | २८० | ७८९ | २३० | ४७७ | २७० |
| ३०० | ३६७ | ३५९ | ३७० | ६८० | १४० | ५६७ | ४६९ |
| २४७ | ४६६ | ४४९ | ४६० | ५९० | ३५७ | ३६९ | ३६० |
| ३१ | ६१ | ७५ | ०५ | ४१ | ५१ | ८६ | ९६ |
| ३९ | ६९ | ७२ | ०२ | ४७ | ५७ | ८२ | ९२ |
| ३८ | ६८ | ७४ | ०४ | ४० | ५० | ८३ | ९३ |

**२२ ऑगस्ट : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २० | ५४ | ८४ |
| १९ | २९ | ५६ | ८६ |
| १७ | २७ | ५३ | ८३ |
| ६७८ | १५६ | ११३ | १७० |
| ३४४ | २३७ | २६७ | ३६९ |
| २९० | ५७० | ३३९ | ५६९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

## सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरीने युगकडे आपल्या प्रेमाची कबुली दिली

**मुंबई, २१ ऑगस्ट :** सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... या मालिकेतील भावनांचे चढ–उतार, नाट्य आणि युग (शब्बीर अहलूवालिया) व कैरी (आशी सिंह) यांच्यातील गुंतागुंतीचे नाते यामुळे प्रेक्षकांना मालिका आवडली आहे. अलीकडच्या भागामध्ये प्रेक्षकांनी पाहिले की कैरीने भावा–भावांतील भांडण मिटवले आणि त्यामुळे त्यांनी युगसोबत दर वर्षीप्रमाणे रक्षाबंधन साजरे केले.
आगामी भागांमध्ये, प्रेक्षक पाहतील की युग आणि कैरी शौर्य (अभिषेक वर्मा) आणि अन्या (मौसमी देवनाथ) यांच्या विवाहासाठी अन्याच्या आईचे म्हणजे शालिनीचे मन वळवण्यात यशस्वी होतात. अन्याला परत मिळवण्यासाठी शौर्य एक आगळीवेगळी अट घालतो. तो शालिनीला त्यांच्यासोबत सात दिवस राहायला सांगतो, जेणेकरून तिची खात्री पटेल की, युग आणि कैरीचे लग्न म्हणजे केवळ एक नाटक नाही, तर ते सर्व जण किती आनंदाने एकत्र राहतात. शौर्यचे बोलणे खरे करून दाखवण्यासाठी सगळेजण आपापली भूमिका बजावू लागतात आणि तसे करता करता त्यांच्या नात्याला अनपेक्षित भावनिक वळण मिळते. या नाट्यात, कैरी युगकडे आपल्या प्रेमाची कबुली देण्याचे धाडस गोळा करते.
युग देखील तिच्याविषयीच्या आपल्या भावना व्यक्त करेल का, की कैरीचा हिरमोड करून तो पाठ फिरवून निघून जाईल ?
उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरीची भूमिका करणारी आशी सिंह म्हणते, युगचा प्रामाणिकपणा आणि कनवाळू स्वभाव याबद्दल कैरीला पहिल्यापासून युगचा आदर वाटत आला आहे. तो बाहेरून कितीही तुटक असल्याचे दाखवत असला, तरी तो खरा जसा आहे, त्याबद्दल त्याला प्रेम मिळाले पाहिजे असे तिला वाटते. पुढील काही एपिसोड खूप उत्कंठावर्धक असतील, कारण तो क्षण प्रेक्षक अखेर बघतील, जेव्हा कैरी आपल्या भावना युगकडे व्यक्त करेल. तिच्यासाठी हे एक भावनिक आणि धाडसी पाऊल आहे. युगसारख्या काहीशा उग्र व्यक्तिमत्वावर प्रेम करणे काही तितकेसे सोपे नाही.

## राशीभविष्य

**मेष :** व्यवसायात अशी कोणतीही घटना घडू शकते ज्यामुळे भविष्यात मोठे फायदे होतील. नोकरदारांचा आनंद नोकरीत वाढेल. काही नवीन जबाबदाजया मिळू शकतात. परदेशात प्रवास करण्याची संधी मिळेल.

**वृषभ :** आज आर्थिक बाबींवरून वाद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे खर्चावर नियंत्रण ठेवा. अनावश्यक वाद टाळा. तुमचा आत्मविश्वास वाढेल. अचानकपणे एखादी रोमँटिक भेट होऊ शकते.

**मिथुन :** आज तुम्हाला जवळचा मित्र भेटेल. कामाच्या ठिकाणी तुमच्या बौद्धिक क्षमतेचे आणि अनुभवाचे कौतुक होईल. व्यवसायात केलेले नवीन प्रयोग फायदेशीर ठरतील.

**कर्क :** लांबचा प्रवास किंवा परदेश दौजयावर जाण्याची शक्यता आहे. प्रवासादरम्यान सावधगिरी बाळगा. कोणतीही मौल्यवान वस्तू चोरीला जाऊ शकते. अनोळखी व्यक्तीकडून अन्नपदार्थ घेऊ नका.

**सिंह :** तुमची आर्थिक बाजू मजबूत होईल. मात्र तुमच्या जोडीदारासोबतच्या नात्यात काही गैरसमज निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सावधगिरी बाळगा. तुमचा दिवस सुखद होईल.

**कन्या :** व्यवसायात अचानक येणाजया अडथळ्यामुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. तुम्हाला एखाद्या प्रिय व्यक्तीपासून दूर जावे लागू शकते. तुम्हाला वैज्ञानिक किंवा संशोधन कार्यात मोठे यश मिळेल. वेगाने गाडी चालवू नका.

**तुळ :** आज कामाच्या ठिकाणी तुम्हाला बढती मिळण्याची शक्यता आहे. तुमच्या व्यक्तिमत्त्वामुळे तुम्हाला नवीन मित्र मिळतील. तुमच्या आयुष्यात एखाद्या खास व्यक्तीची एंट्री होऊ शकते.

**वृश्चिक :** कोणताही प्रवास टाळणे तुमच्यासाठी हिताचे ठरेल. आज कोणीतरी तुमच्या जोडीदारामध्ये जास्त रस दाखवू शकतो, पण घाबरू नका. दिवस संपेपर्यंत तुम्हाला समजेल की सगळे काही ठीक आहे.


**धनु :** नोकरीच्या शोधात तुम्हाला इकडे तिकडे भटकावे लागेल. एखादा लपलेला शत्रू किंवा विरोधक व्यवसायात अडथळा ठरू शकतो. चैनीच्या वस्तूंवर खूप पैसा खर्च होईल.

**मकर :** आजचा दिवस मानसिक शांतता घेऊन येईल. तणावापासून मुक्ती मिळेल. आर्थिक बाबतीत सकारात्मक बदल होतील. तुमच्या पैशांची स्थिती सुधारेल. मात्र अनावश्यक खर्च टाळा.

**कुंभ :** कारण त्याचा आर्थिक नियोजनावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. कामाच्या ठिकाणी तुम्हाला प्रगतीचे संकेत मिळतील. तुमचे वैवाहिक जीवन आनंददायी आणि स्थिर राहील.

**मीन :** तुमची आर्थिक स्थिती चांगली राहील. मुलांचे सहकार्य मिळेल. मित्रांसोबत तुम्ही उत्तम वेळ घालवू शकाल. राजकारणात इच्छित पद मिळण्याची शक्यता आहे. मुलांकडून आनंद वाढेल.

## शब्दकोडे क्रमांक २१९८



**आडवे शब्द :-**
१) महादेवाचे एक नाव
३) विधवा
६) आग्रा येथील जगप्रसिद्ध वास्तू
१०) पाताळ
१२) भ्रमर
१३) मध्यस्थ
१५) पाळीपाळीने
१६) इच्छा
१८) चुलता (हिं.)
१९) ताजा ***, नव्या दमाचा
२१) अफवा
२४) सान
२६) काढलेली सुट्टी
२८) नेत्र
३०) चंद्र
३३) समुद्राच्या लाटांचा आवाज
३५) सत्वयुक्त
३७) सगळा, जमीनीवरील कर
३९) बंदी, मना
४०) पं नेहरुजींचे नाव
४२) पटल,
४३) दरवडा
४५) मंगलप्रसंगी वाजविण्याचे वाद्य
४६) मनाचा ओढा
४८) मोठा नगारा
५०) दारूचा एक प्रकार
५२) जमीन
५३) उपवासाचे तांदूळ
५४) दात
५६) लोणचे
५९) सुपारीचा तुकडा
६०) हिंदुस्थानी
६२) कपाळावरील भाग्यरेखा
६३) फोक, छडी
६५) गंध
६८) मोठी टोपली
६९) पराकाष्ठेचा लाभ
७०) सारखा
७२) लगेच, पाठोपाठ
७४) बसकर, योगाचे प्रकार
७५) भरभराट
७७) अंगाने जाड असलेली
७९) वाहणारी हवा
८०) गुंडांच्या दोन गटातील मारामारी
८१) पाठवणी
८२) सावकाराला कर्जावर द्यावयाची अधिक रक्कम

**उभे शब्द :-**
१) शनिवार
२) बाण सोडणे
३) अवस्था, स्थिती
४) पायाचा खालचा भाग
५) श्रीविष्णूचा बुटका अवतार
६) बळ, शक्ती
७) सोन्याचा धागा
८) चलनवलन
९) सत्ता
११) उंट हाकणारा
१४) जाळणे
१७) एक अधिक एक चतुर्थांश
२०) जासूद, पायदळातील नाईक
२२) कोवळा अंकुर
२३) दुर्दशा
२५) यावर्षी, यंदा
२७) जागृत, स्थान, ठिकाण
२९) धमनी
३१) प्रत्यक्ष कृती
३२) रोमांच उभे करणारे
३४) एक प्रकारची मोठी तलवार
३६) गाल, हनुवटीवरील केस
३८) आपला परका अशी भावना
४०) जन्म
४१) गर्द तांबडा रंग
४४) निमित्त, सबब
४७) कोवळे गवत
४९) एक प्राचीन पर्वत
५१) दिवटी
५५) किंमत
५७) बारीक नक्षीकाम
५८) सुंदर, शोभिवंत
६१) तीर्थयात्रा करीत फिरणे
६४) स्वस्तच्या विरुद्ध
६५) वाल्मिकी ऋषींचे पहिले नाव
६६) उत्सव
६७) प्रत्येक ठिकाणी
६९) रेशीमाचा किडा, कोळी
७१) दहावी रास
७३) सर, माळ, पानांचा भारा
७४) कुंभाराची भट्टी
७५) बांधलेला
७६) तेव्हा (ग्रा.)
७६) संध्याकाळ

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## महत्त्वाचे

### जीव वाचवण्यासाठी सीपीआर गरजेचे : डॉ. विक्रांत विजन

**नाशिक ।** जेव्हा एखाद्या व्यक्तीचा हृदयविकारामुळे किंवा इतर कारणांमुळे श्वास थांबतो किंवा हृदय प्रभावीपणे पंप करणे थांबवते, तेव्हा ही प्रक्रिया जीव वाचवण्यासाठी वापरली जाते. यामध्ये, छातीवर दाब देऊन आणि कृत्रिम श्वासोच्छ्वास देऊन शरीरात रक्ताभिसरण आणि ऑक्सिजनचा पुरवठा करण्याचा प्रयत्न केला तर जीव वाचविण्यास मदत होत असल्याची माहिती प्रसिद्ध हृदय विकार तज्ज्ञ डॉ. विक्रांत विजन यांनी केले. विजन हॉस्पिटलच्या 38 वर्ष सेवापूर्ती निमित्त आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात 269 रुग्णांनी तपासणी केली. स्वातंत्र्य दिनानिमित्त दि. 16 व 17 आगस्ट दोन दिवसीय आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये व्हिजन हॉस्पिटल चे प्रसिद्ध हृदय विकार तज्ज्ञ डॉ. विनोद विजन, डॉ. विक्रांत विजन, नेत्र विकार तज्ज्ञ डॉ. सृष्टी विजन, डॉ गुलशन तोलांनी, डॉ. अनिकेत शहा, साक्षी ढवळे, वर्चश्री सोनवणे, सारीक कांबळे, डॉ. कविता स्वानी यांच्यासह हॉस्पिटल स्टाफने रुग्णांची आरोग्य तपासणी केली.

### विंचूर उपबाजार आवारात विषमुक्त शेतीवर मार्गदर्शन

**विंचूर ।** रासायनिक खते, कीटकनाशके मानवाच्या आरोग्यासह जमीन व पर्यावरणासाठीही हानीकारक आहेत. त्यामुळे सेंद्रिय शेती काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन दिंडोरीप्रणीत श्री




स्वामी समर्थ केंद्राचे आबासाहेब मोरे यांनी केले. विंचूर उपबाजार आवारात श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राच्या कृषी विभागातर्फे आयोजित विषमुक्त शेती व बाजारपेठ या विषयावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. व्यासपीठावर लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पंढरीनाथ थोरे, लासलगाव मर्चेंट बँकेचे संचालक कैलास सोनवणे, विलास गोरे, पांडुरंग राऊत, सोमनाथ शिरसाट, संजय घायाळ उपस्थित होते. मोरे यांनी देशी गायीचे शेण, गोमूत्र, दूध हे सर्वच शेती व मानवाच्या दृष्टीने उपयुक्त असल्याने शेतकऱ्यांनी देशी गायीचे संगोपन करणे गरजेचे आहे. तसेच शेतीचे बांध मोठे व सजीव ठेवा. यावेळी शेतकरी बांधव उपस्थित होते.

### धार्मिक यात्रेच्या नावाखाली पर्यटकांना साडेसात लाखांचा गंडा!

**नांदगाव ।** धार्मिक आस्था आणि प्रवासाची ओढ यांचा गैरफायदा घेत प्रवासी कंपन्यांनी तब्बल पर्यटकांना साडेसात लाखांचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. परदेशी व देशातील धम्मस्थळांना नेण्याचे आमिष दाखवून संशयितांनी पैसे उकळले आणि त्यानंतर गायब झाले. या प्रकारामुळे संपूर्ण मनमाड शहरात संतापाची लाट उसळली असून पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मनमाड येथील श्रीधर भागवत अहिरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून, निशांत चंद्रमणी मानवटकर (संचालक, प्रॉमिस हॉलिडेज व महाबौद्धी टुरिझम नागपूर) तसेच भंते बौद्धनंद थेरो (राहणार महाबौद्धी टुरिझम, नागपूर) यांनी विश्वास संपादन करून १९ नागरिकांकडून तब्बल ७ लाख ३४ हजार ६०० उकळले.यात्रा २२ एप्रिल रोजी सुरू होणार असल्याचे सांगण्यात आले होते. पासपोर्ट तयार करणे, विमान तिकीट बुकिंग यासाठी रक्कम घेण्यात आली. लोकांच्या धार्मिक श्रद्धांचा आधार घेत, धम्मस्थळांच्या सहलीचे स्वप्न दाखविण्यात आले. कमी खर्चात विदेशवारीचे गोडवे सांगून पर्यटकांचा विश्वास संपादन करण्यात आला. त्यानंतर वेळोवेळी पैसे उकळून अचानक संपर्क तोडण्यात आला. मनमाड पोलीस ठाण्यात या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### लासलगाव ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णांचा शिबिरास प्रतिसाद

**विंचूर ।** सिव्हिल हॉस्पिटल नासिक लासलगाव ग्रामीण रुग्णालय व जिल्हा परिषद नाशिक आरोग्य विभागातर्फे लासलगाव येथे बुधवारी घेतलेल्या



शिबिरास उत्तम प्रतिसाद मिळाला लासलगाव ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी बाळकृष्ण अहिरे यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे दंतचिकित्सक उपजिल्हा निफाड रुग्णालय येथील डॉ.कविता कदम तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागुल जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.सुजित कोशिरे स्त्री रोग तज्ञ डॉ. निलेश लाड याचे मोलाचे सहकार्य लाभले आणि उपस्थित रुग्णाच्या डोळ्यांच्या तपासणी, मौखिक, स्तन, गर्भाशय, कर्करोग,दंतरोग, स्त्रीरोग, तज्ज्ञांकडून तपासणी मोफत करण्यात आली. लासलगाव वैद्यकीय अधिकारी बाळकृष्ण अहिरे व लासलगाव ग्रामीण रुग्णालय येथील कर्मचाऱ्यांनी सिव्हिल हॉस्पिटल नाशिक व जिल्हा परिषद आरोग्य विभाग नाशिक यांचे मोलाचे सहकार्य मिळाल्याने आभार व्यक्त केले.

# ओझर नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचना जाहीर

## ३१ ऑगस्ट पर्यंत हरकती नोंदविण्याची संधी

**ओझर ।** येथील नगरपरिषदेच्या सन २०२५ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचना जाहीर करण्यात आली असून त्यावर हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी, हरकती व सूचना मुख्याधिकारींकडे सादर करण्याची अंतिम तारिख ३१ ऑगस्ट २०२५ आहे. निवडणुकीसाठी १३ प्रभाग करण्यात आले. ओझर ग्रामपालिकेचे रूपांतर २०२१ मध्ये झाल्यानंतर नगरपरिषदेची पहिलीच निवडणुक असल्याने इच्छुकांमध्ये चर्चा आणि उमेदवारीसाठी पावसाळ्यातही हवा गरम झाली आहे. प्रभाग रचनेनुसार एकुण ५४०६६ मतदार असून त्यात ९१५५ अनुसुचीतील जाती तर ६४४७ अनुसुचीत जमाती मतदार संख्या आहे. ग्रामपालिका असतांना सहा प्रभागातून सतरा कारभारी निवडून येत. आता तेरा प्रभागातून तब्बल सत्तावीस कारभारी निवडून येतील. प्रभाग तेरा हा सर्वात मोठा प्रभाग असून तीन उमेदवार निवडून येतील. प्रभागा मधील निवडून देण्याचे उमेदवारांची संख्या अनु जाती, अनु जमाती इतर मागास प्रवर्ग व महिला राखीव यांची संख्या धरून करण्यात आली आहे. नविन प्रभाग रचनेत प्रभाग एक मध्ये ४२६५ मतदार त्यात ७५२ अनुसुचित जाती व २०० अनुसुचित जमाती व दोन उमेदवार निवडणूक रिंगणात असतील. प्रभाग दोन मध्ये ३७२८ मतदार त्यात ५१८ अनु जती २७३ अनु जमाती व दोन उमेदवार निवडणुक लढवतील. प्रभाग तीन मध्ये ४११० मतदार असून त्यात ६१६ अनु जाती व २२५ अनु जमाती दोन उमेदवार प्रभाग चार मध्ये ३६१० मतदार त्यात ३३७ अनु जाती १५८ अनु जमाती दोन उमेदवार प्रभाग पांच मध्ये ४१९९ मतदार २२६३ अनु जाती २७२ अनु जमाती दोन उमेदवार प्रभाग सहा ४१८२ मतदार २२९ अनु जाती ८०५ अनु जमाती दोन उमेदवार प्रभाग सात ४०६९ मतदार १२२ अनु जाती १०७ अनु जमाती दोन उमेदवार प्रभाग आठ ३८१३ मतदार ३४३ अनु जाती २०१ अनु जमाती दोन उमेदवार प्रभाग नऊ ४०२७ मतदार ६९९ अनु जाती १४०० अनु जमाती दोन उमेदवार प्रभाग दहा ३७९९ मतदार ३६० अनु जाती ३०० अनु जमाती दोन उमेदवार प्रभाग अकरा ४२४९ मतदार ६९३ अनु जाती ८८१ अनु जमाती दोन उमेदवार प्रभाग बारा ४०११ मतदार ४०२ अनु जाती २५९ अनु जमाती दोन उमेदवार प्रभाग तेरा हा सर्वात मोठा प्रभाग असून ६००७ मतदार असून १८२१ अनु जाती व १३६४ अनुसुचित जमाती असे एकूण मतदार असून तेरा प्रभागातून २७ गांव कारभारी निवडून प्रथमच नगरसेवकांचा मान मिळवतील त्यामुळे इच्छुकांची मोर्चे बांधणी सुरू झाली आहे यावर ३१ ऑगस्ट पर्यंत हरकती मार्गाविण्यात आल्या आहेत.

# मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार झाले 'पोषण दूत'

## कुपोषित बालकांच्या आरोग्य संवर्धनासाठी जिल्हा परिषदेचा उपक्रम



**नाशिक ।** जिल्हा परिषदेच्या पोषण दूत उपक्रमांतर्गत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार (भा. प्र.से.) यांनी स्वतः 'पोषण दूत' बनत दीपक गोरख पिंपळके या वैष्णवनगर येथील कुपोषित बालकाचे आरोग्य सुधारण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. दीपक हा केवळ पाच वर्षांचा असून त्याचे वजन ११ किलो व उंची ९३ सेमी नोंदविण्यात आली आहे. त्याला सॅम श्रेणीतील (गंभीर कुपोषण) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. अशा बालकांचे योग्य आहार, वैद्यकीय सल्ला व कुटुंबास मार्गदर्शन करून आरोग्य सुधारले जाऊ शकते, यासाठी 'पोषण दूत' म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी थेट कुटुंबाशी संपर्क साधणार आहेत. या प्रसंगी बोलताना पवार म्हणाले, कुपोषण निर्मूलन ही केवळ एका विभागाची जबाबदारी नसून प्रशासनातील प्रत्येक अधिकाऱ्याची सामाजिक जबाबदारी आहे. एक अधिकारी एक बालक अशा पद्धतीने आपण पुढाकार घेतला तर नाशिक जिल्हा कुपोषणमुक्त करण्यास मदत होईल. पोषण दूत उपक्रमांतर्गत प्रत्येक अधिकारी आपल्या कार्यक्षेत्रातील एका कुपोषित बालकाला दत्तक घेतो. संबंधित बालकाच्या कुटुंबाशी नियमित संवाद साधून आहारपद्धती, स्वच्छता, आरोग्य तपासण्या व पूरक आहार याबाबत लक्ष ठेवले जाणार आहे व अंगणवाडी सेविका, आशा व आरोग्य सेविका यांच्याशी समन्वय साधून बालकाचे नियमित वजन व उंची तपासली जाईल, यामुळे कुपोषित बालकांच्या प्रगतीवर थेट लक्ष ठेवले जाणार आहे. पवार यांनी जिल्हा परिषद अंतर्गत सर्व विभाग प्रमुख, प्रकल्प अधिकारी, गटविकास अधिकारी व इतर अधिकारी यांनी देखील कुपोषित बालकांचे 'पोषण दूत' बनावे अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत. त्यामुळे प्रत्येक कुपोषित बालकाच्या आरोग्याची सामूहिक जबाबदारी प्रशासनाकडून घेतली जाणार आहे, यावेळी गटविकास अधिकारी डॉ. सोनिया नाकाडे, सरपंच मंगळु पिंपळके, ग्रामपंचायत अधिकारी विश्वनाथ तरवारे यांच्यासह तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचारीउपस्थितहोते.

# विंचूर-गोंदेगाव रस्त्याच्या कामाला सुरुवात; खूप वर्षांची प्रतीक्षा संपली



**विंचूर ।** विंचूरच्या मध्यवर्ती तीनपाटी पासून हाकेच्या अंतरावर असलेल्या विंचूर-गोंदेगाव रस्त्यालगत वसाहतींचा मुख्य रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून खड्ड्यांनी अक्षरशः विद्रूप झाला होता. सरपंच सचिन दरेकर व ग्रामपंचायत सदस्य नानासाहेब जेऊघाले यांनी ठाम भूमिका घेऊन पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीतून सुमारे ३५ लाख रुपये खर्च करून साडेतीनशे मीटरचा सिमेंट कॉंक्रिट रस्ता तयार होत असल्याने नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

गोंदेगाव रस्त्यालगत अनेक वसाहती असून, दिवसेंदिवस नवीन वसाहती तयार होत आहेत. नववसाहतीत मोठ्या प्रमाणात शासकीय कर्मचाऱ्यांनी घरे बांधली आहेत. रस्त्यालगतच जिल्हा परिषदेची शाळा, पुंड, राऊत, दरेकर, खैरे, चव्हाण यांसह अनेक वस्त्या आहेत. मोठे दूध संकलन केंद्र असल्याने शेकडो दुग्ध व्यावसायिकांचीही रस्त्यावरून कायम वर्दळ असते. मात्र रस्त्याची बिकट अवस्था असल्याने रस्त्यावरून ये जा करताना स्थानिकांसह गावातील नागरिकांमधून संताप व्यक्त होत होता. वॉर्ड क्रमांकचार व पाचमधील शेकडो कुटुंबांना या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींकडे तक्रारी मांडत होते. नागरिकांची अडचण बघता सरपंच दरेकर व ग्रामपंचायत सदस्य जेऊघाले यांनी या रस्त्यासाठी ग्रामपालिकेचा १५ वा वित्त आयोगाचा निधी वापरण्याचा प्रस्ताव मांडला. वादावादी व काहीअंशी विरोधाला सामोरे जात शेवटी सर्वांना विश्वासात घेत हा मार्ग तयार झाल्याने आकाशनगरसह परिसरातील नववसाहतींचा चेहरामोहरा बदलला आहे.

# व्यवसायातील प्रामाणिकतेमुळे राजूभाई पटेल यांना व्यवसायात यश : शैलेश कुटे



**नाशिक ।** व्यावसायिक यश म्हणजे व्यवसायात अपेक्षित उद्दिष्टे साध्य करणे. यामध्ये नफा मिळवणे, व्यवसाय वाढवणे, ग्राहकांचा विश्वास संपादन करणे आणि बाजारात टिकून राहणे यासारख्या गोष्टींचा समावेश होतो. व्यावसायिक यश मिळवण्यासाठी कठोर परिश्रम, योग्य नियोजन आणि परिस्थितीचा अभ्यास आवश्यक आहे, असे मत प्रसिद्ध उद्योजक शैलेश कुटे यांनी व्यक्त केले. येथील पंचवटी फूड प्रॉडक्ट या कंपनीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ उद्योजक दिलीप (बाबा) शहा होते.

प्रमुख पाहुणे म्हणून मारूती वेफर्सचे संचालक प्रविणशेठ निकुंभ, फिटनेस ट्रेनर जगदीश पोतदार, भाजपचे नेते गणेश कांबळे, शेखरआप्पा निकुंभ, पट्रोलपंपचे संचालक विवेक कुलकर्णी, प्रा. संजय मीरजकर, उद्योजक बाळासाहेब शिंदे, केबल व्यावसायिक शिवा देशमुख, शिंदेंच्या शिवसेनेचे नेते नितीन साळवे, उद्योजक श्रीकांत ढोकणे, अशोकशेठ वैश्य, दै. 'महासागर'चे संपादक प्रा. जयंत महाजन आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबा शहा म्हणाले की, तुमच्या व्यवसायाचे प्रभावीपणे व्यवस्थापन करा, ज्यात कर्मचारी व्यवस्थापन, आर्थिक व्यवस्थापन आणि संचालन व्यवस्थापन यांचा समावेश असेल. नेहमी काहीतरी नवीन शिकत राहा आणि तुमच्या ज्ञानात भर टाकत राहा. यशस्वी उद्योजक होण्यासाठी या गोष्टींचे पालन करणे आवश्यक आहे. यावेळी नाशिक महापालिकेतील माजी नगरसेवक सतीशबापू सोनवणे, सुभाष कडलग, रमेशकाका गायकवाड आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. कुसुमबेन पटेल व काशीराम पटेल यांनी उपस्थितांचे स्वागत केले. नरेंद्र उर्फ राजूभाई पटेल व कल्पना पटेल यांनी आभार मानले.

# आमदार हिरे यांच्या प्रयत्नातून ३० लाखांचा विकासनिधी

## नर्मदेश्वर मंदिर परिसरात सुरक्षिततेसाठी भक्कम पाऊल

**नाशिक ।** प्रभाग क्र. ३१ मधील शरायु पार्क येथे असलेल्या नर्मदेश्वर महादेव मंदिर परिसरात संरक्षक भिंत बांधण्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा आमदार सीमा हिरे यांच्या हस्ते संपन्न झाला. या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाची लहर पसरली आहे.

या कामासाठी आ. हिरे यांच्या आमदार स्थानिक विकास निधीतून ३० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, त्यामुळे मंदिर परिसराच्या सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. स्थानिक नागरिकांनी आमदार हिरे यांचे आभार मानले. कार्यक्रमानंतर उपस्थित



सर्व भक्तांनी नर्मदेश्वर महादेवाचे दर्शन घेतले. यावेळी रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर 'आमचा देवा भाऊ' या अनोख्या आणि हृदयस्पर्शी संकल्पनेअंतर्गत महिलांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी यांना उद्देशून लिहिलेली भावनिक पत्रे विशेष आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरली. या पत्रांचे संकलन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली एक आगळावेगळा उपक्रम ठरला आहे, जो भावनिक नात्याची साक्ष देतो. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिसरातील नागरिक, कार्यकर्ते आणि महिला मंडळींचे विशेष योगदान लाभले. सोहळ्याला नगरसेवक सतीश सोनवणे, श्याम बडोदे, भगवान दोंदे, पुष्पा आव्हाड, महेश हिरे, जितेंद्र चोरडिया, त्रिंबक कोंबडे, विकास एखंडे, बालकृष्ण शिरसाठ, एकनाथ नवले, राम बोडोदे, सोनाली नवले यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्मवीर रावसाहेब थोरातांचे शिक्षणातील कार्य कौतुकास्पद : डॉ. पाटणे

**सिन्नर ।** कर्मवीर रावसाहेब थोरात हे त्यांच्या कार्य कर्तृत्वाने मोठे झाले. त्यांच्या दूरदृष्टीने संस्थेची मुहूतमेढ रोवली गेली, असे मत प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांनी व्यक्त केले. मराठा विद्या प्रसारक समाजाचे गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सिन्नर येथे समाजदिन कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी डॉ. पाटणे बोलत होते.

थोरात यांचा संपूर्ण जीवनपट त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडला.




याप्रसंगी यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि प्राध्यापकांचे बक्षीस वाटप करण्यात आले. याप्रसंगी श्रीलेखा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सिन्नर यांच्यावतीने एच.एस.सी. व्होकेशनल विभागाच्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व भेट देऊन सन्मान करण्यात आला. श्रीलेखा पतसंस्थेचे चेअरमन प्रा. जयंत महाजन आणि मॅनेजर कांताराम माळी यांच्यावतीने हे बक्षीस विद्यार्थ्यांना मिळाले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. यु. पाटील यांनी प्रास्तविक केले. डॉ. पाटणे यांनी कर्मवीर रावसाहेब थोरात यांचे कार्य विषद केले. अध्यक्ष निवृत्तीराव डावरे यांनी अध्यक्षीय भाषण केले. उपप्राचार्य आर. व्ही. पवार यांनी आभार व्यक्त केले. प्रा. दत्तात्रेय वेलजाळी यांनी सूत्रसंचलन केले. कार्यक्रमासाठी बहुसंख्येने विद्यार्थी, पालक, सभासद, शिक्षक उपस्थित होते.

# मविप्रचे विद्यार्थी कर्मवीरांच्या विचारांचे, कार्याचे वारसदार : नाईकवाडे

**निफाड ।** शेतकरी, कष्टकरी समाजातील विद्यार्थी उच्चशिक्षित व्हावा असे स्वप्न कर्मवीरांनी शंभर वर्षापूर्वी पाहिले. हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी न्यूनगंड बाजूला सारून सकारात्मक लोकांचा संग्रह व चांगल्या पुस्तकांचे वाचन करावे. सोशल मीडियाचा योग्य व मोजका वापर करावा. अभ्यासाचे सातत्य ठेवले तरच तुम्ही इच्छित यश मिळवाल. सहा वेळा स्पर्धा परीक्षेत अयशस्वी होऊनही फक्त संयम व सातत्याच्या जोरावर आज मी स्वतः तहसीलदार पदावर कार्यरत असल्याचे प्रेरणादायी उदाहरण निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी उपस्थितांना दिले.

कर्मवीरांच्या कार्याचे व विचारांचे सोने लुटण्याचा दिवस म्हणजे मविप्र समाजदिन होय. म्हणूनच मविप्रचे विद्यार्थी कर्मवीरांच्या विचारांचे आणि कार्यांचे वारसदार व्हावेत असे प्रतिपादनही त्यांनी केले. मविप्र समाज संस्थेच्या निफाड येथील कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात आयोजित १९ ऑगस्ट कर्मवीर रावसाहेब थोरात यांचा जन्मदिन समाजदिन कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ उत्तमराव डेर्ले, मविप्रचे माजी शिक्षणाधिकारी डॉ. रमेश दरेकर, प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे, नितीन सुगंधी, दीपक भदाणे आदी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे उद्योजक नितीन सुगंधी म्हणाले, मविप्र शिक्षण संस्थेला राजे महाराजे, देणगीदार, उद्योजक, सहकारी संस्था यांनी कायम मदत केली. संस्थेच्या पाठीशी ते उभे राहिले. हाच वारसा विविध पदावर कार्यरत संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी उचलला पाहिजे असे मत व्यक्त केले. डॉ. दरेकर, दिपक भदाणे, डॉ. उत्तमराव डेर्ले यांचीही भाषणे झाली.



प्रास्ताविक प्राचार्य डॉ.ज्ञानोबा ढगे यांनी केले. निफाड महाविद्यालयाचा उत्कृष्ठ सुवर्ण पदक प्राप्त खेळाडू भूषण शिंदे याला मराठा सेवा संघाच्या माध्यमातून महिना दहा हजार रुपये स्कॉलरशिप, राहण्याची व शैक्षणिक साहित्याची उपलब्धता करून देण्यात आले. मविप्र ध्वजाचे ध्वजारोहण व समाजगीत गायनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. छत्रपती शिवाजी महाराज आणि सर्व कर्मविरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी मविप्र सभापती बाळासाहेब क्षीरसागर यांच्या मातोश्री कै. इंदुबाई क्षीरसागर यांना श्रद्धांजली वाहिली. यावेळी डॉ. सीमाताई डेर्ले, श्रीमती ब्राह्मणकर, सुधाकर कापसे यांनी विद्यार्थ्यांना स्वतःच्या ठेव रकमेतून बक्षिसे प्रदान केली, तसेच महाविद्यालयाच्या वतीने गुणवंत विद्यार्थी व प्राध्यापक यांचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. महाविद्यालयीन सर्व प्राध्यापकांनी लिहिलेल्या शोधनिबंध पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. समारंभास माधवराव गीते, जानकीराम धारराव, अशोक कुंदे, ॲड. रामेश्वर कोल्हे, ॲड. प्रवीण ठाकरे, यशवंत वडघुले, सुधाकर कापसे, रामनाथ धारराव, शाम शिंदे, सुरज कुंदे, भागीरथ शिंदे, वसंत पानगव्हाणे, दिग्विजय देशमुख, विलास दौंड, सयाजी शिंदे, त्र्यंबक शिंदे आदी सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. महेश बनकर, प्रा प्रवीण शार्दुल यांनी केले. तर आभार प्रा. अभय वडघुले यांनी मानले. पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रवीण ढेपले यांनी करून दिला. कार्यक्रमास विद्यार्थी, मविप्र सभासद मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

नुकताच १९ वर्षीय दिव्या देशमुखने २०२५ चा महिला बुद्धिबळ विश्वचषक जिंकून इतिहास रचला. हा किताब जिंकणारी ती पहिली भारतीय महिला बुद्धिबळपटू ठरली आहे. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दिव्याने भारताची दुसरी अव्वल खेळाडू कोनेरू हम्पीला हरवले. बाकू येथे झालेल्या या अंतिम सामन्यात दिव्याने रॅपिड टाय-ब्रेकमध्ये १.५-०.५ असा विजय मिळवला. या मानिनीची कामगिरी प्रत्येक महिलेला प्रेरणा देणारी आहे.



# बुद्धिबळातील सम्राज्ञी

मानिनी

नुकताच १९ वर्षीय दिव्या देशमुखने २०२५ चा महिला बुद्धिबळ विश्वचषक जिंकून इतिहास रचला. हा किताब जिंकणारी ती पहिली भारतीय महिला बुद्धिबळपटू ठरली आहे. स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दिव्याने भारताची दुसरी अव्वल खेळाडू कोनेरू हम्पीला हरवले. बाकू येथे झालेल्या या अंतिम सामन्यात दिव्याने रॅपिड टाय-ब्रेकमध्ये १.५-०.५ असा विजय मिळवला. या मानिनीची कामगिरी प्रत्येक महिलेला प्रेरणा देणारी आहे.

स्पर्धेच्या फायनलच्या आधी दोन्ही दिवशी खेळलेले सामने ड्रॉ झाले होते. पहिल्या गेममध्ये दिव्याने पांढऱ्या सोंगट्यांसह खेळून वर्चस्व गाजवले, परंतु हम्पीने बरोबरी साधली. दुसऱ्या गेममध्येही सामना कठीण होता.

दिव्याने टाय-ब्रेकमध्ये जबरदस्त खेळ दाखवला. पहिला रॅपिड गेम ड्रॉ झाला. परंतु दुसऱ्या गेममध्ये हम्पीने वेळेच्या दबावाखाली काही चुका केल्या, ज्याचा दिव्याने फायदा घेतला आणि गेम जिंकला. या विजयासह दिव्या केवळ महिला विश्वविजेतीच नाही तर भारताची चौथी महिला ग्रँडमास्टर आणि एकुणात ८८ वी ग्रँडमास्टर बनली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या ऐतिहासिक विजयाबद्दल दिव्या देशमुख आणि कोनेरू हम्पी या दोघींचेही अभिनंदन केले. अंतिम फेरीनंतर दिव्या म्हणते, 'हा सगळा नशिबाचा खेळ आहे. स्पर्धा सुरू होण्यापूर्वी वाटले होते की, कदाचित मी ग्रँडमास्टरचा दर्जा मिळवेन, परंतु आता मी खरेच ग्रँडमास्टर आहे...' या उत्तुंग विजयामुळे स्वाभाविकच सध्या दिव्याच्या कुटुंबात आनंदाची लाट आहे. तिची काकू डॉ. स्मिता देशमुख याबाबत बोलताना म्हणाल्या, 'हे यश दिव्याच्या कठोर परिश्रमाचा आणि तिच्या पालकांच्या त्यागाचा परिणाम आहे. आम्हाला सर्वांना तिचा अभिमान आहे.' दिव्याचा विजय विशेष आहे कारण तिने कोनेरू हम्पीसारख्या बलाढ्य खेळाडूला हरवले जी दोन वेळा वर्ल्ड रॅपिड चॅम्पियन राहिली आहे आणि शास्त्रीय बुद्धिबळात जगातील टॉप ५ खेळाडूंमध्ये एक आहे. त्याच वेळी, दिव्या शास्त्रीयमध्ये १८ व्या, रॅपिडमध्ये २२ व्या आणि ब्लिट्झमध्ये १८ व्या स्थानावर आहे. गेल्या वर्षी तिने जागतिक ज्युनियर अजिंक्यपद स्पर्धा जिंकली होती. २०२४ मध्ये बुडापेस्ट येथे झालेल्या बुद्धिबळ ऑलिंपियाडमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून देण्यात तिने महत्त्वाची भूमिका बजावली. आता बाकूमधील भव्यदिव्य विजयाने तिला जागतिक बुद्धिबळातील उदयोन्मुख स्टार म्हणून स्थापित केले आहे. दिव्या देशमुखचे यश भारतीय महिला बुद्धिबळासाठी एक मोठी प्रेरणा आहे. येणाऱ्या काळात ती आणखी उंची गाठेल अशी आशा आहे. तिला अनेक शुभेच्छा.

# अस्मिता

## दार आहे, खिडक्या नाहीत

असे का?

शॉपिंग हा खास महिलांचा प्रांत. सध्याच्या सणावारांच्या वातावरणात तर यासाठी वारंवार घराबाहेर पडणे होते. आता आपली बरीचशी खरेदी मॉल्समध्येच होते. पण या ठिकाणी खिडक्या नसतात हे तुम्ही लक्षात घेतले आहे का? नसेल तर पुढच्या वेळी अवश्य बघा.



मॉलमध्ये खिडक्या न ठेवणे ही विचारपूर्वक राबवलेली एक नीती असून मार्केटिंग आणि शॉपिंग अनुभवाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे.

* खरेदी करताना बाहेरील प्रकाश आणि दृश्ये ग्राहकांचे लक्ष वेधून घेऊ शकतात. शॉपिंग मॉलचा उद्देश ग्राहकांना शक्य तितक्या काळ आत ठेवणे आणि खरेदी करण्यास प्रोत्साहित करणे हा असतो. मॉलमध्ये खिडक्या असतील तर ग्राहक हवामान, वेळ किंवा बाहेरील इतर घडामोडींकडे लक्ष देऊ लागतील. यामुळे त्यांचे लक्ष विचलित होईल किंवा ते कमी खरेदी करतील.
* मॉल्समध्ये कृत्रिम प्रकाशयोजना वापरली जाते. यामुळे दुकाने आणि उत्पादने आकर्षक पद्धतीने प्रदर्शित करता येतील. दिवसाच्या वेगवेगळ्या वेळी नैसर्गिक प्रकाश बदलत असल्यामुळे उत्पादनांच्या सादरीकरणावर परिणाम होऊ शकतो. पण कृत्रिम प्रकाशयोजनेमुळे मॉलमधील प्रत्येक गोष्ट छानच दिसते. त्यामुळे ग्राहक ती खरेदी करू इच्छितात आणि अधिक खरेदी करतात.
* खिडक्या असल्यास उष्णता आणि थंडी मॉलमध्ये येऊ शकते. स्वाभाविकच हीटिंग, व्हेंटिलेशन आणि एअर कंडिशनिंग प्रणालीवर यावर अधिक ताण येतो. खिडक्यांशिवाय मॉलचे तापमान नियंत्रित राहते. खेरीज खिडक्या नसल्यामुळे एअर कंडिशनिंग प्रणाली अधिक कार्यक्षमतेने काम करते. विजेचा वापर कमी होतो.
* मोठ्या शॉपिंग मॉल्समध्ये सुरक्षा ही एक अतिशय महत्त्वाची बाब आहे. खिडक्यांमुळे चोरांना आत आणि बाहेरील हालचाली दिसणे सोपे होते. ते सहजपणे चोरीची योजना आखू शकतात किंवा आत डोकावू शकतात. परंतु खिडक्या नसल्यामुळे कोण आत जात आहे आणि कोण बाहेर जात आहे यावर लक्ष ठेवणे सोपे होते.
* मॉलमध्ये खिडक्यांऐवजी मोठे होर्डिंग्ज आणि डिजिटल जाहिरातींचे स्क्रीन बसवले जातात. हे मॉलसाठी अतिरिक्त उत्पन्नाचे स्रोत निर्माण करतात. भिंतींचा प्रत्येक भाग ब्रँडच्या जाहिरातीसाठी किंवा नवीन दुकानांसाठी वापरला जाऊ शकतो. यामुळे व्यवसाय वाढतो.

## थंडीतल्या लग्नातही दिसा फॅशनिस्टा

स्टाईल स्टेटमेंट

पावसाळ्यानंतर येणाऱ्या थंडीत लग्नांचा सीझन सुरू होतो. या दिवसात आपले छान छान कपडे स्वेटर, शालींमागे लपतात. पण या दिवसातही तुम्ही तुमचा स्टायलिंग सेन्स जपू शकता, फॅशनिस्टा बनू शकता. थंडीतल्या लग्नात कोणते पेहराव परिधान करता येतील? जाणून घेऊ.

- सध्या लेहंग्याची चलती आहे. लग्नसोहळ्यात लेहंगा चोली खूपच आकर्षक दिसते. मात्र हिवाळ्यातल्या लग्नासाठी लेहंगा चोली घेताना स्लीव्हलेस किंवा शॉर्ट ब्लाउज घेऊ नका. लेहंग्यासोबत पूर्ण बाह्यांचं वेलवेट ब्लाउज कॅरी करा. दुपट्टा श्रग स्टाईलमध्ये कॅरी करा. यामुळे तुम्ही छान दिसाल.
- पलाझो किंवा धोती सलवारसारख्या बॉटम्सवर कुर्ता किंवा क्रॉप टॉप घालता येईल. त्यावर लाँग श्रग घेता येईल.
- इव्हिनिंग गाउन हा जबरदस्त ऑप्शन आहे. या गाउनमुळे तुम्हाला इंडो वेस्टर्न लूक मिळतो. थोडा ट्रॅडिशनल लूकवाला गाउन खरेदी करता येईल. त्यावर झुमके, चोकर, ब्रेसलेट अशा ॲक्सेसरीज कॅरी करता येतील.
- सध्या फ्लोअर लेंग्थ अनारकलीचा ट्रेंड आहे. हुडहुडी भरवणाऱ्या थंडीत अनारकली उबदार ठरू शकतील. लांब बाह्यांचे अनारकली या दिवसात चालून जातील.
- लग्नात साडी नेसायची असेल तर ब्लाउजमध्ये प्रयोग करता येतील. वेलवेट ब्लाउज किंवा स्वेटर स्टाईल ब्लाउज कॅरी करता येईल. साडीवर आकर्षक शालही घेता येईल. एका बाजूने घेतलेली शाल सुंदर



## पौष्टिक पालक, ब्रोकोली, स्वीट कॉर्न सूप

रसगंधा

*साहित्य : पाव कप चिरलेला पालक, एक कप ब्रोकोली, किसलेलं एक कप स्वीट कॉर्न, बारीक चिरलेला अर्धा कप टॉमेटो, एक चमचा मूगाची डाळ, एक चमचा बटर, बारीक चिरलेला अर्धा कांदा. तीन चमचे कॉर्नफ्लोर, अर्धा चमचा लिंबाचा रस, मिरपूड, दोन चमचे बदामाचे काप.*



थंडीत गरमागरम सूप प्यावंसं वाटतं. सूप पिण्यासाठी रेस्टॉरंटमध्ये जायची काहीच गरज नाही. तुम्ही घरच्या घरी चविष्ट आणि पौष्टिक सूप बनवू शकता. पालक, ब्रोकोली, स्वीट कॉर्न सूप सगळ्यांना नक्कीच आवडेल.

**कृती:** स्वीटकॉर्न, ब्रोकोली, पालक, मूग डाळ, टोमॅटो हे सगळं एकत्रितपणे उकडून घ्या. थंड झाल्यानंतर बारीक वाटून घ्या. एका वाटीत कॉर्नफ्लोर आणि पाणी घालून घट्ट पेस्ट बनवून घ्या. आता एका कढईत बटर घाला. त्यात कांदा घालून परतून घ्या. मग ब्रोकोली, पालकाचं मिश्रण घाला. त्यात पाव कप पाणी आणि मीठ घाला. दोन मिनिटं शिजू द्या. यात कॉर्नफ्लोर घाला. नीट हलवून घ्या. शेवटी लिंबाचा रस आणि मिरपूड घाला. हे सूप बाउलमध्ये काढून घ्या. वरून बदामाचे काप घाला. गरमागरम सूप प्या.

## घ्या पालकाचं पीक

परसबाग



पालक ही अत्यंत आरोग्यदायी अशी हिरवी भाजी आहे. थंडीत पालक खाल्ला जातो. या दिवसात पालकाचं भरपूर पीक घेतलं जातं. शहरांमध्ये पालेभाज्यांची लागवड सांडपाण्यावर केली जात असल्याचं आपण ऐकतो. तसंच भाज्यांवर बरीच किटकनाशकं फवारली जातात. म्हणूनच पालकाची लागवड घरीच करणं योग्य ठरतं. थोडी मेहनत करून तुम्ही रसायनमुक्त आणि आरोग्यदायी भाज्या खाऊ शकता.

1. पालक कुंडीत लावता येतो. यासाठी सहा ते आठ इंच खोल कुंडीची निवड करा. कुंडी फार खोलगट नसवी. शक्यतो पसरट किंवा आडवी कुंडी घ्यावी. लाकडी किंवा पुठ्याच्या खोक्यातही पालकाची लागवड करता येईल.
2. पालकाची लागवड करताना दोन रोपट्यांमध्ये किमान तीन इंचांचं अंतर ठेवावं. पालकाची मोठी पानं हवी असतील तर पाच इंचांचं अंतर ठेवावं. पालकाचं पीक लवकर हवं असेल तर दोन इंच अंतरही पुरेसं आहे.
3. पालकाची लागवड हिवाळ्यात करणार असाल तर कुंडी उन्हात ठेवा. मात्र उन्हाळ्यात लागवड करायची असेल तर कुंडी सावलीत ठेवायला हवी. हिवाळ्यात दिवस लहान असल्यामुळे पालकाला अधिक सूर्यप्रकाश लागतो.

## गव्हाळ वर्ण असेल तर...

ब्युटी टॉक



सावळ्या किंवा गव्हाळ वर्णाच्या महिला योग्य मेक अपमुळे अधिक सुंदर दिसू शकतात. फाउंडेशनपासून लिपस्टिकपर्यंत विविध प्रकारची मेक अप उत्पादनं कशी कॅरी करता येतील याविषयी...


- चेहऱ्याची स्वच्छता सर्वात महत्त्वाची. यासाठी दररोज क्लिंजिंग, टोनिंग आणि मॉईश्चरायझिंग हे रूटिन फॉलो करा. त्वचेची काळजी घेताना हे टप्पे खूप महत्त्वाचे आहेत. यामुळे त्वचा आतून स्वच्छ होते आणि मेक अप अधिक सुंदर दिसतो.
- त्वचेचा वर्ण कोणताही असला तरी फाउंडेशनची योग्य निवड करणं गरजेचं आहे. म्हणूनच आपल्या वर्णाला म्हणजेच स्कीन टोनला साजेसं फाउंडेशन निवडा. बऱ्याच महिला गोरं दिसण्यासाठी लाईट फाउंडेशन निवडतात. पण यामुळे चेहऱ्यावर पॅचेस दिसू शकतात. त्वचा तेलकट असेल तर वॉटरबेस्ड आणि कोरडी असेल तर क्रीमबेस्ड फाउंडेशनची निवड करावी.
- क्रीमबेस्ड आयलायनरचा वापर योग्य ठरतो. हे आयलायनर त्वचेत सामवतात आणि तुम्हाला नॅचरल लूक देतात. आयशॅडो लावत असाल तर ब्राउन, प्रून, कॉपर आणि बरगंडी हे रंग शोभून दिसतील. गुलाबी, जांभळा अशा लाईट शेड्स टाळा. डार्क मेटॅलिक रंग शोभून दिसतील.
- गव्हाळ वर्णावर ब्राउन, बेंज असे रंग शोभून दिसत नाहीत. त्याऐवजी रोज, डीप ऑरेंज आणि कोरल या शेड्सच्या ब्लशचा वापर करा. रात्रीच्या वेळी शिमर किंवा गोल्डन ब्लश शोभून दिसतील.
- गव्हाळ वर्णावर मॅट किंवा ग्लॉसी प्रकारच्या लिपस्टिक्स शोभून दिसतात. लिपस्टिक्समध्ये बेरी, प्लम, बरगंडी असे रंग ट्राय करता येतील.

## नात्यात दुरावा आला आहे...

काय करू?

माझ्या लग्नाला पाच वर्षं झाली असून अडीच वर्षांची मुलगी आहे. माझ्या सासरी सासू-सासरे आणि धाकटा दीर आहे. पती माझ्यावर अजिबात प्रेम करत नाहीत. ते नेहमीच आपल्या कुटुंबाला प्राधान्य देतात. आमच्या मुलीलाही ते फार वेळ देत नाहीत. माझ्या माहेरची आर्थिक स्थिती चांगली होती. पण सासरच्या बाबतीत तसं नाही. काही साधेसुधे खर्चही पतीला वायफळ वाटतात. मला भौतिक सुखं नको आहेत. मला आयुष्यात शांतता आणि स्थैर्य हवं आहे. आमच्यातल्या वादाला दीर आणि सासू कारणीभूत आहेत. हे दोघं पतीला माझ्याविरोधात भडकवतात. त्याच्या डोक्यात चुकीच्या गोष्टी भरवतात. यामुळे आमच्यामध्ये दुरावा निर्माण झाला आहे. काय करू?

- तुझी सासू आणि दीर असं का वागतात हे जाणून घेण्याचा प्रयत्न कर. तुझ्या नवऱ्याची आजी म्हणजे तुझ्या सासूची सासू तिच्याशी असंच वागलेली असू शकते. यामुळे तुझी सासू तुझ्याशी अशा पद्धतीने वागत असावी. तुझी एखादी सवय किंवा वागणं आवडत नसल्यामुळे सासू आणि दीर असं वागत असावेत किंवा त्यांच्या अशा वागण्यामागे कोणतंही कारण नसावं. त्यांचा नेमका उद्देश जाणून घेतलास तर तुला पुढची योजना आखता येईल. शक्य असेल तर सासूशी बोल. तुमच्या नात्यावर त्यांच्या वागण्याचा विपरित परिणाम होत असल्याची जाणीव करून दे.



## यात असतात चांगले फॅट्स

डाएट अँड न्यूट्रिशन

फॅट्स म्हटलं की आपल्या भुवया उंचावतात. शरीरातले फॅट्स कमी करण्यावर आपला भर असतो. आपल्याला अन्नपदार्थांमधून फॅट्स मिळतात. अर्थात सगळे फॅट्स वाईटच असतात असं नाही. शरीराला फॅट्ही लागतात. चांगले फॅट्स मिळवण्यासाठी कोणते पदार्थ खाता येतील हे जाणून घेऊ.

- ॲव्होकॅडोमध्ये चांगल्या फॅट्सचं प्रमाण बरंच जास्त असतं. ॲव्होकॅडोमध्ये ७७ टक्के फॅट्स असतात. पण हे फॅट्स चांगले आणि आरोग्यदायी असतात. यात फायबर आणि पॉटेशियमही भरपूर प्रमाणात असतं. अँटिऑक्सिडंट्स आणि ई जीवनसत्त्वामुळे ॲव्होकॅडो अधिक लाभदायी ठरतं.
- ऑलिव्ह ऑईल आणि त्यातही एक्स्ट्रा व्हर्जिन ऑलिव्ह ऑईल खूप लाभदायी ठरतं. या तेलात चांगले फॅट्स असतात.
- माशांमधूनही शरीराला चांगले फॅट्स मिळतात. यात ओमेगा ३ फॅटी ॲसिड असतं. त्यामुळे मासे आरोग्यासाठी चांगले असतात.
- पनीर लज्जतदार असतं. पनीरचा समावेश आहारात करायला हवा. यात आरोग्यदायी फॅटी ॲसिड्स असतात. यासोबतच पनीरमध्ये कॅल्शियम, प्रथिनं, जीवनसत्त्वं मुबलक प्रमाणात असतात. पनीरमध्ये आरोग्यदायी फॅट्स असतात.

### स्कीन केअर

#### घरीच बनवा ब्लॅक हेड्स रिमूव्हर

चेहऱ्यावरचे ब्लॅकहेड्स खूप त्रास देतात. बाजारात बरेच ब्लॅकहेड्स रिमूव्हर मिळतात. मात्र हे रिमूव्हर उपयुक्त ठरतातच असं नाही. तुम्ही घरच्या घरी ब्लॅकहेड्स रिमूव्हर बनवू शकता. यासाठी अंड्याचा पांढरा भाग, दोन चमचे दलिया हे साहित्य घ्या. अंड्याच्या पांढऱ्या भागात दलिया मिसळा. दलिया थोडा कुटूनही घेता येईल. आता या मिश्रणाने ब्लॅकहेड्सवर मसाज करा. हलक्या हातांनी मसाज करणं गरजेचं आहे. साधारण पाच मिनिटांनी चेहरा गरम पाण्याने धुवून टाका. तुमचा चेहरा उजळलेला दिसेल.



### हेअर केअर



#### लांबसडक केसांसाठी...

केसांची काळजी घेणं फार कठीण नाही. लांब, मुलायम आणि काळेभोर केस हवे असतील तर या टिप्स फॉलो करता येतील. केसांच्या वाढीसाठी शँपूने नियमितपणे केस धुवा. स्कॅल्प आणि केस स्वच्छ ठेवणं गरजेचं असतं. आठवड्यातून दोन किंवा तीन वेळा केस धुणं योग्य ठरतं. शँपूनंतर कंडिशनर लावायला विसरू नका. कंडिशनर केसांमधला ओलावा टिकवून ठेवतो. तसंच केसांना संरक्षणही देतो. केसांचं नुकसान भरून काढण्यासाठी हेअर मास्कचा वापर करा. केसांना तेल लावायला विसरू नका. तेलामुळे केसांना आवश्यक पोषण मिळतं. मुळं बळकट होतात आणि केसांची छान वाढही होते.

### स्मार्ट शॉपिंग

#### फंडे ऑनलाईन खरेदीचे

सध्या ऑनलाईन खरेदीची चलती आहे. विविध वस्तू ई कॉमर्स साईट्सवरून मागवल्या जातात. मात्र अनेकदा एकच वस्तू विविध साईट्सवर वेगवेगळ्या किंमतींना उपलब्ध असते. अशा वेळी ग्राहक गोंधळून जातात. वस्तूंची किंमत कमी असण्याला बरीच कारणं असतात. काही ई कॉमर्स साईट्स दुकानदारांकडून कमी शुल्क घेतात. याचा लाभ ग्राहकांना करून दिला जातो. विक्री वाढवण्यासाठीही नफा कमी करून वस्तू कमी किंमतीत उपलब्ध करून दिली जाते. अशा वेळी कमी किंमतीची वस्तू घ्यायला काहीच हरकत नाही. कारण ही वस्तू विशिष्ट कंपनीची असते आणि वस्तूच्या दर्जाची हमी कंपनीकडून दिली जाते. त्यामुळे गोंधळ उडत असेल तर कमी किंमतीतली वस्तू विकत घ्या.




### किचन टिप्स

#### भाजी तिखट झाली तर...

मैत्रिणींनो, काही वेळा भाजीत तिखट जरा जास्त पडतं. गरम किंवा इतर मसाल्यांच्या वापरामुळेही भाजी तिखट होऊ शकते. हा जास्तीचा तिखटपणा घालवण्याचा उपायही आहे. भाजीत लोणी किंवा बटर घाला. साय किंवा दही घालण्याचा पर्यायही आहे. लिंबामुळेही तिखटपणा कमी होऊ शकतो. त्यामुळे भाजी तिखट झाली तर या उपायांनी तिखटपणा कमी करा.





# सेंसेक्स 143 तर निफ्टी 33 अंकांनी वाढले

## फार्मा सेक्टरमध्ये वाढ

**मुंबई, दि. २१ प्रतिनिधी**

गुरुवारी सलग सहाव्या दिवशी शेअर बाजार वाढीसह बंद झाला. दोन्हीही बेंचमार्क निर्देशांक हिरव्या चिन्हावर बंद झाले. एका बाजूला सेंसेक्समध्ये १४३ अंकांची वाढ झाली, तर निफ्टी ५० मध्येही ३३ अंकांची उसळी नोंदली गेली.

गुरुवारी सकाळी सेंसेक्सने ८२,२२० च्या पातळीवर ओपनिंग दिली आणि दिवसाच्या अखेरीस ०.१७ टक्क्यांच्या वाढीसह ८२,००० च्या पातळीवर बंद झाला. निफ्टी ५० गुरुवारी सकाळी २५,१४२ च्या पातळीवर उघडला आणि दिवसाच्या अखेरीस ०.१३ टक्क्यांच्या वाढीसह २५,०८३ च्या पातळीवर बंद झाला.

बेंचमार्क निर्देशांकाच्या उलट, मिडकॅप आणि स्मॉलकॅपचे प्रदर्शन कमकुवत राहिले. एका बाजूला बीएसई मिडकॅप निर्देशांक ०.१२ टक्क्यांपर्यंत घसरला, तर स्मॉलकॅप निर्देशांक जवळपास स्थिर राहिला.

निफ्टी ५० मधील टॉप गेनर्समध्ये सर्वाधिक फायदा सिप्लाला झाला, ज्यामध्ये ३ टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाली. त्यानंतर डॉ. रेड्डीजमध्ये २.५१ टक्क्यांची वाढ, बजाज फिनसर्व्हमध्ये १.१० टक्क्यांची वाढ, आयसीआयसीआय बँकेत १.०८ टक्क्यांची वाढ, एसबीआय लाइफमध्ये १.०२ टक्क्यांची वाढ झाली.

निफ्टी ५० मधील कंपन्यांमध्ये सर्वाधिक नुकसान कोल इंडिया

**सेन्सेक्स 82,000**

**निफ्टी 25,083**



ला झाले, ज्यात १.७१ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर बजाज ऑटोमध्ये १.६२ टक्क्यांची घसरण, टाटा कंझ्युमरमध्ये १.५६ टक्क्यांची घसरण, पॉवर ग्रिडमध्ये १.५३ टक्क्यांची घसरण, इटरनलमध्ये १.४६ टक्क्यांची घसरण झाली.

सेक्टोरल निर्देशांकांमध्ये सर्वाधिक फायदा निफ्टी फार्माला झाला, ज्यात ०.९५ टक्क्यांची वाढ झाली. त्यानंतर निफ्टी रिअल्टीमध्ये ०.३८ टक्क्यांची वाढ, निफ्टी फायनान्शियल सर्व्हिसेसमध्ये ०.३२ टक्क्यांची वाढ आणि निफ्टी ऑइल अँड गॅसमध्ये ०.३० टक्क्यांची वाढ झाली.

सर्वाधिक नुकसान निफ्टी कॅपिटलला झाले, ज्यात २.०४ टक्क्यांची घसरण झाली. त्यानंतर निफ्टी एफएमसीजीमध्ये ०.६४ टक्क्यांची घसरण, निफ्टी इंडिया टुरिझममध्ये ०.५७ टक्क्यांची घसरण, निफ्टी एनर्जीमध्ये ०.४८ टक्क्यांची घसरण आणि निफ्टी ऑटोमध्ये ०.३६ टक्क्यांची घसरण झाली.


# राष्ट्राध्यक्ष बनल्यानंतर ट्रम्प यांनी केली 100 मिलियन डॉलर्सची गुंतवणूक

**वॉशिंग्टन, दि. २१ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पदाचा कार्यभार स्वीकारताच अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यास सुरुवात केली. जगातल्या अनेक देशांवर अव्वाच्या सव्वा टॅरिफ लागू करणे किंवा अमेरिकेतील बेकायदा स्थलांतरितांना मायदेशी परत पाठवण्याचा निर्णयही त्यातलेच. पण एकीकडे हे निर्णय घेत असताना दुसरीकडे डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर दुसऱ्याच दिवसापासून त्यांची वैयक्तिक संपत्तीही वेगाने वाढवण्यास सुरुवात केली. गेल्या सात महिन्यांत डोनाल्ड ट्रम्प यांनी १०० मिलियन अमेरिकन डॉलर्सपेक्षाही जास्त गुंतवणूक करून अनेक क्षेत्रांतील शेअर्स खरेदी केले आहेत. या व्यवहारांची एकूण संख्या जवळपास ६००च्या वर आहे!

डोनाल्ड ट्रम्प यांनी राष्ट्राध्यक्षपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर आत्तापर्यंत केलेल्या व्यवहारांबाबतची नवीन माहिती समोर आली असून त्यामधून हे आकडे स्पष्ट झाले आहेत. २० जानेवारी रोजी ट्रम्प यांनी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारला. २१ जानेवारीपासून गेल्या सात महिन्यांत डोनाल्ड ट्रम्प यांनी तब्बल १०० मिलियन डॉलर्सपेक्षा जास्त म्हणजे भारतीय चलनात जवळपास ८७० कोटींचे बॉण्ड्स खरेदी केले आहेत. हे सगळे व्यवहार त्रयस्थ ट्रस्टकडून केले जात असल्याचा दावा जरी ट्रम्प यांनी केला असला, तरी शेवटी हा सगळा पैसा ट्रम्प यांच्याच मालकीचा असल्यामुळे त्यांनी सरकारच्या निर्णयाचा फायदा स्वत:साठी केल्याचा आरोपही होऊ लागला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी ही १०० मिलियन डॉलर्सची गुंतवणूक प्रामुख्याने अमेरिकेतील कॉर्पोरेट, स्थानिक पालिका आणि राज्य कर्ज रोख्यांमध्ये केली आहे. त्यात



सिटीग्रुप, मॉर्गन स्टॅनले, वेल्स फर्गो, मेटा, क्वालकॉम, दी होम डेपोट, टी-मोबाईल यूएसए आणि युनायटेड हेल्थ ग्रुप या कंपन्यांचा प्रामुख्याने समावेश आहे. याशिवाय अमेरिकेतील राज्ये, कौंटी, शिक्षण संस्था, नैसर्गिक वायू उत्पादक संस्था आणि इतर स्थानिक पालिकांकडून जारी करण्यात आलेल्या बॉण्ड्समध्ये डोनाल्ड ट्रम्प यांनी दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून गुंतवणूक केली आहे.

दरम्यान, ट्रम्प यांनी केलेली ही बॉण्ड्सची खरेदी म्हणजे फक्त त्यांची अतिरिक्त संपत्ती दुसरीकडे वळवण्याचा मार्ग असल्याचं मत अमेरिकेतील तज्ज्ञांकडून व्यक्त केलं जात आहे. "राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची संपत्ती मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. यापैकी बहुतांश हिस्सा हा क्रिप्टोकरन्सी आणि 'ट्रम्प मीडिया' यामध्ये आहे. हे पाहता त्यांची ही गुंतवणूक अतिरिक्त संपत्ती इतर ठिकाणी वळवण्याचा पर्याय सोडून दुसरं काही वाटत नाही", असं मत ऑक्सफर्ड इकोनॉमिक्सचे अमेरिकेतील तज्ज्ञ जॉन कॅनावान यांनी व्यक्त केलं.

**डोनाल्ड ट्रम्प यांनी एकूण संपत्ती किती?**

दरम्यान, डोनाल्ड ट्रम्प यांच्या संपत्तीबाबत वेगवेगळी आकडेवारी समोर आली आहे. एकट्या २०२४ वर्षात डोनाल्ड ट्रम्प यांच्या संपत्तीत तब्बल ६०० मिलियन अमेरिकन डॉलर्स इतकी भर पडल्याचं सरकारी आकडेवारीवरून स्पष्ट झालं होतं. त्यात क्रिप्टोकरन्सी, गोल्फ मालमत्ता, परवान्यांचे व्यवहार आणि इतर उद्योगांमधून जमा झालेल्या नफ्याचा समावेश होता. एका अहवालानुसार डोनाल्ड ट्रम्प यांची एकूण संपत्ती किमान १.६ बिलियन डॉलर्स इतकी आहे.

# लोकांनी निवडून दिलेले सरकार राज्यपालांच्या मर्जीने चालू शकते का?

## सरन्यायाधीश गवई यांचा केंद्र सरकारला सवाल

**नवी दिल्ली, दि. २१ वृत्तसंस्था**

राज्य विधिमंडळाने पाठवलेल्या विधयकांना मान्यता देण्यासाठी राज्यपालांनी किती वेळ घ्यावा? याबद्दल केल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू आहे. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयासमोर झालेल्या सुनावणीदरम्यान सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी सरकारला महत्त्वाचा प्रश्न विचारला आहे.

संविधानाने अनुच्छेद २००अंतर्गत राज्यपालांना विधेयक रोखून धरण्याचा अधिकार दिला आहे असा युक्तिवाद सॉलिसीटर जनरल तुषार मेहता यांनी केला. त्यावर, विधानसभांनी मंजूर केलेली विधेयके राज्यपालांनी कायमस्वरूपी रोखून धरल्यास, लोकनियुक्त राज्य सरकारांना राज्यपालांच्या लहरी आणि मर्जीवर अवलंबून राहावे लागेल असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले.

"पण त्यानंतर आपण याचिकांना रोखून धरण्याचे संपूर्ण अधिकार राज्यपालांना देतोय असे होणार नाही का?....बहुमताने निवडून आलेल्या सरकारला राज्यपालांच्या लहरी आणि मर्जीवर अवलंबून राहावे लागेल," असा प्रश्न सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी सरकारची बाजू मांडणारे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांना केला. खंडपीठाने म्हटले की, राज्यपालांनी विधेयक रोखून धरल्यानंतर ते विधेयक रद्द होते असा अर्थ लावला, तर याचा राज्यपालांचे अधिकार आणि कायदे बनवण्याच्या प्रक्रियेवर विपरित परिणाम होईल.

राज्य सरकारने मंजूरसाठी पाठवलेल्या विधेयकांवर निर्णय घेण्यासाठी राष्ट्रपती आणि राज्यपाल यांना दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने निश्चित कालमर्यादा घालून दिली होती, यावर राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी केलेल्या



याचिकेवर पाच-न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर सुनावणी सुरू होती. संसद आणि विधिमंडळांनी संमत दिलेल्या विधेयकाला मंजुरी देण्यासाठी, सर्वोच्च न्यायालय राष्ट्रपती आणि राज्यपालांना कालमर्यादा आखून देऊ शकते का, असा प्रश्न राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विचारला होता.

संविधानानुसार राज्यपालांना अनुच्छेद २०० अंतर्गत असलेल्या अधिकारांचा दाखला देत मेहता खंडपीठासमोर म्हणाले की, "हा काही निवृत्त राजकारण्यासांठी राजकीय आश्रय नाही, त्याला ठराविक महत्व आहे, जे संविधान सभेत चर्चिले गेले होते."

राज्यपाल जरी निवडून आलेले नसले तरी ते राष्ट्रपतींचे प्रतिनिधी आहेत आणि यांत्रिकपणे विधेयकांना मंजुरी देणारे फक्त एक पोस्टमन नाहीत. "एखादा असा व्यक्ती जो थेट निवडून आलेला नाही तो दुय्यम व्यक्ती ठरत नाही," असे मेहता म्हणाले.

न्यायमूर्ती सूर्यकांत, विक्रम नाथ, पीएस नरसिंह आणि एएस चांदुरकर यांच्या खंडपीठापुढे बोलताना मेहता म्हणाले की, राज्य विधिमंडळाने पाठवलेल्या विधेयकाला मान्यता देण्याचा, मान्यता रोखण्याचा, कोणत्याही केंद्रीय कायद्याशी परस्परविरोधा आढळून आल्यास राष्ट्रपतींकडे पाठवण्याचा किंवा पुनर्विचारासाठी राज्य विधिमंडळाकडे परत पाठवण्याचा पर्याय राज्यपालांना आहे. रोखून धरणे ही काही तात्पुरती कृती नाही, आणि सर्वोच्च न्यायालयाचे ५ न्यायाधीश आणि ७ न्यायाधीशांनी याचे वर्णन विधेयक पुढे जाण्याचा मार्ग असल्याचे म्हटले आहे. यावर सीजेआय यांनी प्रश्न केला की, जर त्यांनी पुनर्विचारासाठी विधेयक परत पाठवण्याच्या पर्यायाचा वापर केला नाही तर ते चिरकाल ते रोखून धरू शकतात? यावर मेहता म्हणाले की तर ते रद्द होईल. यावेळी त्यांनी कलम २०० मधील संदर्श दिला. "तो (अधिकार) क्वचित वापरला जातो पण हा विशेष अधिकार म्हणून मिळाला आहे." आहे असे ते म्हणाले.

या सुनावणीदरम्यान सीजेआय गवई म्हणाले की, "आम्हाला असे काही अनुभव आहेत की कशा प्रकारे काही सन्माननीय राज्यपाल त्याच्या अधिकाराचा वापर करतात ज्यामुळे अनेक कायदेशीर कारवया झाल्या आहेत, पण आम्ही त्यानुसार जाणार नाहीत."

# नाट्य शुक्रवारमध्ये आज 'गोळकोंडा डायमंड्स'

**मुंबई, दि. २१ प्रतिनिधी**

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात सुरु केलेल्या नाट्य शुक्रवार उपक्रमाअंतर्गत आज 'गोळकोंडा डायमंड्स' या पुरस्कारप्राप्त नाट्यकृतीचा प्रयोग होणार आहे. आझाद मैदान येथील संघाच्या सभागृहात दि. २२ ऑगस्ट, २०२५ रोजी सायंकाळी साडेसहा वाजता होणाऱ्या या प्रयोगासाठी नाट्यरसिकांना मोफत प्रवेश असणार आहे. महाराष्ट्रातील प्रायोगिक रंगभूमीला प्रोत्साहन देण्यासाठी 'नाट्य शुक्रवार' हा अभिनव उपक्रम मुंबई मराठी पत्रकार संघात सुरू करण्यात आला आहे.

या उपक्रमाअंतर्गत, मुंबई मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात दर महिन्याच्या चौथ्या शुक्रवारी महाराष्ट्रातील दर्जेदार प्रायोगिक नाट्याचे मोफत सादरीकरण होणार आहे. नवोदित व प्रायोगिक रंगकर्मींसाठी हे व्यासपीठ खुले असणार असून, नाट्यप्रेमींना नाट्यप्रयोगांचा नि:शुल्क आनंद घेण्याची संधी यातून मिळणार आहे.

**gajanantupe2@gmail.com**

# प्रिया बापट पहिल्यांदाच झळकणार पोलिसाच्या भूमिकेत

मराठीसह हिंदी चित्रपटसृष्टीत आपली वेगळी ओळख निर्माण करणारी, अभिनयाच्या विविध छटांमध्ये रसिकांची मनं जिंकणारी प्रिया बापट आता एका नव्या आणि थरारक अविष्कारात दिसणार आहे. अमेझॉन प्राईमवर लवकरच प्रदर्शित होणाऱ्या 'अंधेरा' या हॉरर सिरीजमध्ये ती एका महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकणार आहे. नुकताच या सिरीजचा ट्रेलर सोशल मीडियावर झळकला असून, त्याने प्रेक्षकांमध्ये एकाच वेळी भीती आणि उत्सुकता निर्माण केली आहे. या सिरीजमधून प्रियाने हॉरर जॉनरमध्ये पदार्पण केले असून यात ती पहिल्यांदाच पोलिसाची भूमिका साकारत आहे. त्यामुळे तिच्या चाहत्यांसाठी ही एक आनंदाची बाब आहे.

या अनुभवाबद्दल प्रिया बापट म्हणते, "मी पहिल्यांदाच हॉरर जॉनरमध्ये काम करतेय आणि हा अनुभव खरोखरच वेगळा ठरला. खूप नाईट शिफ्ट्समध्ये शूटिंग केलं, परंतु स्क्रिप्ट इतकी इंटरेस्टिंग

**सिनेरंग**

होती की, काम करताना काहीच जाणवले नाही. जेव्हा हे स्क्रिप्ट मला मिळालं, तेव्हा वाचून एकच विचार मनात आला, तो म्हणजे सध्या

**लोकरंजन**




वाचलेल्या स्क्रिप्ट्सपैकी हे सर्वात उत्तम होतं. ही कथा फार वेगवेगळ्या पद्धतीने उलगडते आणि म्हणूनच ती अभिनयाच्या दृष्टीने खूपच आव्हानात्मक ठरली. यात ॲक्शन सिक्वेन्सेस आहेत, भीतीदायक हॉरर सीन आहेत. त्यामुळे कलाकार म्हणून ही भूमिका करताना एक वेगळीच मजा आली. आतापर्यंत मी राजकारणी, वकील यांसारख्या विविध भूमिका साकारल्या आहेत. मात्र, या सिरीजमध्ये मी एका पूर्णतः वेगळ्या प्रोफेशनमधून प्रेक्षकांसमोर येणार आहे.''

'अंधेरा'चं ट्रेलर पाहून प्रेक्षकांमध्ये अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. कथानक काय आहे? हे रहस्य नेमकं कुठं घेऊन जाणार आहे? मात्र या सगळ्या प्रश्नांची उत्तरं प्रेक्षकांना लवकरच प्रेक्षकांना मिळणार आहेत, परंतु तोपर्यंत 'अंधेरा'ची ही थरारक झलक आणि प्रिया बापटचं हॉरर शैलीतील पदार्पण यामुळे ही सिरीज चर्चेचा विषय ठरली आहे.

# 'दशावतार' चित्रपटाचे जबरदस्त ट्रेलर प्रदर्शित

'दशावतार' चित्रपटाचं पोस्टर, त्याचा पहिला लूक आणि चित्रपटातील पहिलंच गाणं "आवशीचो घो" यांनी आधीच रसिकांच्या मनात तुफान उत्सुकता निर्माण केलीय. प्रेक्षकांची ही उत्कंठा शिगेला पोहोचली असतानाच 'दशावतार' या चित्रपटाचा भव्य ट्रेलर एका शानदार समारंभात नुकताच प्रदर्शित करण्यात आला. झी स्टुडिओजची प्रस्तुती, ओशन फिल्म कंपनी आणि ओशन आर्ट हाऊसची निर्मिती असलेला 'दशावतार' चित्रपट मराठी चित्रसृष्टीत एक नवी झळाळी घेऊन अवतरत आहे.



महाराष्ट्रात आणि विशेषतः कोकणात गणेशोत्सवाचं महत्त्व सर्वाधिक आहे. या गणेशोत्सवाप्रमाणेच कोकणात दशावतार ही कलापरंपरा तितकीच महत्त्वाची आहे. म्हणूनच येत्या गणेशोत्सवाच्या पाठोपाठ अवघ्या महाराष्ट्रात 'दशावतार' चं मोठ्या दिमाखात आगमन होत आहे.ज्येष्ठ अभिनेते दिलीप प्रभावळकर, महेश मांजरेकर, भरत जाधव, सिद्धार्थ मेनन, अभिनय बेर्डे, प्रियदर्शिनी इंदलकर अशी मराठी चित्रपटातील दिग्गज कलाकारांची फौज असलेला हा मल्टीस्टारर 'दशावतार ' 'दशावतार ' मध्ये नेमकं आहे तरी काय, याची सर्वांनाच उत्कंठा आहे. कोकणातील इरसाल माणसांचे नमुने , तिथल्या प्रथा परंपरा, दशावतारी नाट्यकला यांचा सुरेख मिलाफ म्हणजे 'दशावतार '! कोकणातील समृद्ध निसर्गवैभव, गर्द देवराया, देवरायांचे राखणदार यांची गूढरम्यता म्हणजे दशावतार! कलासक्त वृद्ध दशावतारी बाबुली मेस्त्री आणि त्याच्या आयुष्यातल्या वादळांची गोष्ट म्हणजे 'दशावतार ' आहे!! अर्थपूर्ण कथा, दमदार अभिनय आणि कर्णमधूर संगीत यांचा अप्रतिम संगम म्हणजेच हा 'दशावतार' !!! असा हा कलात्मक आणि तांत्रिक दृष्ट्या भव्य अनुभूती देणारा 'दशावतार ' येत्या १२ सप्टेंबरपासून मोठ्या पडद्यावर अत्यंत दिमाखात रूजू होतोय.

# गणेशोत्सवाला भक्तीचा नवा स्वर देणारे गाणे शंकराचा बाळ आला



**स्वररंग**

लवकरच श्री गणेशाचे आगमन होणार आहे. सध्या सर्वत्र चैतन्यमय वातावरण असताना, याच उत्साहात आणि भक्तीभावात वैशाली माडे प्रस्तुत, पीसफुल बिट्स प्रॉडक्शन्स निर्मित 'शंकराचा बाळ आला' हे श्रीगणेश गीत रसिकांच्या भेटीला आलं आहे. वैशाली माडे यांच्या भावपूर्ण आणि सुरेल आवाजातील या गीताला मंदार चोळकर यांनी काव्याची ओजस्वी शब्दरचना दिली असून, वरुण लिखाते यांचे सुंदर संगीत याला लाभले आहे. या गाण्यातील कलाकारांनीही आपल्या अभिनयाने गीताला चारचाँद लावले आहेत.

या गाण्यात निसर्गरम्य कोकणात उत्साहाने साजरा होणारा गणेशोत्सव उलगडतो. मात्र हे केवळ एक गाणं नसून त्यातून एक हृदयस्पर्शी कथा सांगितली जाते – एका आईची, जी सैनिक आहे. गणेशोत्सवासाठी घरी आलेली ही आई बाप्पाची सेवा करून, नंतर पुन्हा देशसेवेसाठी निघते. भक्ती, कुटुंब आणि देशभक्ती यांचा अनोखा संगम या कथेतून आणि दृश्यातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो.गीतामधील योगिता चव्हाण यांचा भावपूर्ण चेहराभाव, अभिजीत केळकर यांची उत्सवी ऊर्जा आणि आरव आयेरचा निरागस आनंद प्रत्येकाला आपल्या घरच्या गणेशोत्सवाची आठवण करून देणारा आहे. गणेशोत्सव हा फक्त सण नसून भावनांचा, परंपरेचा आणि भक्तीचा अविष्कार आहे. ढोल-ताशांच्या गजरात, फुलांच्या सजावटीत, आरत्या आणि प्रसादाच्या सुवासात दडलेले वातावरण हे प्रत्येकाच्या मनात आनंद आणि श्रद्धेची लहर निर्माण करते. 'शंकराचा बाळ आला' हे गाणं या उत्सवात चैतन्याची, भक्तीभावाची आणि देशभक्तीची आणखी एक सुंदर भर घालणार आहे.

# 'तुझ्यासाठी तुझ्यासंगं'मध्ये सीमा घोगळे यांची नवी भूमिका

'सन मराठी' वरील 'तुझ्यासाठी तुझ्यासंगं' ही मालिका अल्पावधीतच प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली आहे. सध्या मालिकेत माईसाहेब वैदहीचा बदला घेण्यासाठी वेगवेगळे प्लॅन तयार करतात. पण तेजा कायम वैदहीच्या बाजूने खंबीर उभा राहतो. माईसाहेबांसह मालिकेत अभिनेत्री सीमा घोगळे 'पुष्पा' ही खलनायिकेची भूमिका साकारत आहेत.



**टेलीरंग**

भूमिकेबद्दल सीमा घोगळे म्हणाल्या की, "यापूर्वी बरेचदा खलनायिकेची भूमिका साकारली आहे, पण 'पुष्पा' भूमिकेत बऱ्याच वेगवेगळ्या छटा आहेत. त्यामुळे ही भूमिका साकारताना दडपण येतं पण दिग्दर्शकांच्या मार्गदर्शनामुळे पुष्पा साकारणं सोपं होतंय. मला या रूपात पाहून प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया काय असतील? याकडे माझं लक्ष आहे. पुष्पा मक्तेदार घराण्यातील मोठी जाऊबाई असली तरी, घरात तिला सत्तेचा पूर्ण हक्क नाही. माईसाहेब सगळे निर्णय घेतात आणि हेच पुष्पाच्या अस्वस्थतेचं कारण आहे. सत्ता मिळवण्यासाठी ती वेगवेगळ्या पद्धती वापरते. कोणाशी गोड बोलते, तर कोणाला फसवते. तेजाला ती आपल्या मुलासारखं मानते, पण त्याचा उपयोग करून माईसाहेबांना त्रास देण्याचा प्रयत्न करते. पुष्पा ही केवळ खलनायिका नाही, ती एक सत्तेला भुकेली बाई आहे, जी आपलं अस्तित्व सिद्ध करण्यासाठी कोणतीही सीमा ओलांडते. माईसाहेबच्या सावलीत वावरणारी, पण स्वत:चं अधिराज्य निर्माण करू पाहणारी ही 'पुष्पा' प्रेक्षकांना खिळवून ठेवेल ही खात्री देऊ शकते."

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# शिक्षकाने कानशिलात लगावली

## नववीतील विद्यार्थ्याचा शिक्षकावर गोळीबार

**देहरादून, दि. २१ वृत्तसंस्था**

उत्तराखंडच्या काशीपूर येथे एका ९वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने त्याच्या शिक्षकावर शाळेत गोळीबार केल्याची घटना घडली आहे. या घटनेत खाजगी शाळेतील शिक्षक गंभीररित्या जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. हा मुलगा त्याच्या जेवणाच्या डब्यात घालून बंदूक शाळेत घेऊन आला होता, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

कुंदेश्वरी रोडवरील श्री गुरूनानक सिनीयर सेकंडरी स्कूलमध्ये बुधवारी सकाळी ही घटना घडली. फिजिक्सचे शिक्षक गंगादीप सिंह कोहली हे त्यांचा वर्ग संपवून बाहेर पडत होते. त्याच वेळी अचानक एका विद्यार्थ्याने देशी बनावटीची बंदूक त्याच्या जेवणाच्या डब्यातून खाढली आणि पाठीमागून गोळीबार केला. ही गोळी शिक्षकाच्या उजव्या खांद्याच्या खाली लागली.

यानंतर पळून जाण्याच्या प्रयत्नात असलेल्या या विद्यार्थ्याला शाळेतील इतर कर्मचाऱ्यांनी या पकडले. तसेच जखमी झालेल्या शिक्षकाला तात्काळ खाजगी रुग्णालयात दाखल करम्यात आले, सध्या हे शिक्षक आयसीयूमध्ये आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन दिवसांपूर्वी वर्गात एका प्रश्नाचे उत्तर देऊ न शकल्याने शिक्षकाने कानशिलात लगावल्याचा आणि ओरडल्याचा राग विद्यार्थ्याच्या मानात होता. बुधवारी तो दुपारच्या जेवणाच्या डब्ब्यात लपवलेली बंदूक घेऊन शाळेत घेऊन आला. या विद्यार्थ्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला पोलीस कोठडीत पाठवण्यात आले आहे.

# भारताला गमावणे मोठी धोरणात्मक चूक ठरेल – निक्की

**वॉशिंग्टन, दि. २१ वृत्तसंस्था**

भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापारी संबंध गेल्या काही दिवसांपासून तणावाचे राहिले आहेत. यादरम्यान अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के टॅरिफ लादले आहे. यादरम्यान संयुक्त राष्ट्रातील अमेरिकेच्या माजी राजदूत निक्की हेली यांनी अमेरिका-भारत संबंध बिघडण्याच्या स्थितीत असल्याबद्दल इशारा दिला आहे. तसेच वॉशिंग्टनला जर चीनच्या जागतिक महत्वाकांक्षा रोखायच्या असतील तर हे संबंध तात्काळ सुधारले गेले पाहिजेत, असेही त्यांनी म्हटले आहे. ट्रम्प प्रशासनाला रशियन तेलावरील शुल्क आणि वादांमुळे जगातील दोन सर्वात मोठ्या लोकशाहींमध्ये दरी निर्माण होऊ देणे परवडणारे नाही.

# अभिनेत्रीला अश्लील मेसेज करणारा युवा नेता निघाला काँग्रेसचा आमदार

**पलक्कड, दि. २१ वृत्तसंस्था**

दक्षिणेतील मल्याळम अभिनेत्री आणि पत्रकार रिनी एन. जॉर्ज हिने एका मोठ्या पक्षाच्या युवा नेत्यावर गंभीर आरोप केल्याने खळबळ उडाली होती. हा नेता मला केवळ अश्लील मेसेजच पाठवत नसे तर फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये भेटण्याचीही ऑफर देत असे. जेव्हा त्याच्या या कृतीबाबत मी पक्षाला कल्पना देण्याचा इशारा दिला, तेव्हा कोणाला सांगायचे आहे त्याला जाऊन सांगायला लाग. अशा शब्दात त्याने मला आव्हान दिले, असा आरोप या अभिनेत्रीने केला होता. मात्र हा नेता कोण याचा उलगडा तिने केला नव्हता. मात्र आता या नेत्याचं नाव उघड झालं आहे.

राहुल ममकूट्टाथिल असं या नेत्याचं नाव असून, तो केरळमधील पलक्कड विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसचा आमदार आहे. तसेच केरळ युवक काँग्रेसचा प्रदेशाध्यक्ष आहे. २०२४ साली झालेल्या पोटनिवडणुकीत तो पलक्कड विधानसभा मतदारसंघातून निवडून आला होता. दरम्यान, अभिनेत्री रिनी एन. जॉर्ज आणि लेखिका हनी भास्करन यांनी केलेल्या शोषणाच्या आरोपांमुळे तो अडचणीत आला होता. तसेच विरोधी पक्षांनी त्याच्याविरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. राहुल ममकूट्टाथिल याच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी भाजपाने मोर्चा काढला होता.

दरम्यान, पीडित अभिनेत्री रिनी एन. जॉर्ज हिने गंभीर आरोप करताना या युवा नेत्याचं आणि तो काम करत असलेल्या पक्षाचं नाव जाहीर केलं नव्हतं. मात्र या नेत्याने केलेल्या कृतीबाबत पक्षाच्या नेतृत्वाला माहिती देण्यात आल्याचे तिने सांगितले होते. तसेच अनेक नेत्यांच्या पत्नी आणि मुलीसुद्धा सदर युवा नेत्याच्या गैरवर्तनाची शिकार झाल्या आहेत, असा दावाही या अभिनेत्रीने केला होता. मात्र सदर नेता कोण, हे सांगण्यास मात्र तिने नकार दिला होता. पण ती ज्या नेत्याकडे इशारा करत आहे तो सध्या आमदार असल्याचा सांगण्यात येत होते.

# अजिंक्य रहाणेने मुंबईचे कर्णधारपद सोडले

**मुंबई, दि. २१ प्रतिनिधी**

भारतीय संघाचा अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणे याने आगामी देशांतर्गत हंगामापूर्वी मुंबई क्रिकेट संघाचे कर्णधारपद सोडण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ३७ वर्षीय रहाणेने आपले वय आणि संघासाठी नवीन कर्णधार घडवण्याची गरज लक्षात घेऊन हा निर्णय घेतला असल्याचे समजते. तथापि, एक खेळाडू म्हणून तो मुंबई संघाचा अविभाज्य भाग असेल. रहाणे याने कर्णधारपद सोडण्याची ही घोषणा सोशल मीडियावरून केली.

रहाणेच्या मते, मुंबई संघासाठी नवीन कर्णधार तयार करण्याची हीच योग्य वेळ आहे. त्याने संघासाठी एक खेळाडू म्हणून आपले योगदान पूर्वीप्रमाणेच सुरू ठेवणार असल्याचेही स्पष्ट केले आहे.



'एक्स'वर पोस्ट करत रहाणेने त्याचे म्हणणे मांडले आहे. त्याने म्हटलंय की, 'मुंबई संघाचे कर्णधारपद भूषवणे आणि विजेतेपद पटकावणे, हा माझ्यासाठी अत्यंत सन्मानाचा क्षण होता. येणाऱ्या देशांतर्गत हंगामाचा विचार करता, एका नवीन कर्णधाराला तयार करण्याची हीच योग्य वेळ आहे, असे मला वाटते. त्यामुळे मी कर्णधारपदाची जबाबदारी पुढे न सांभाळण्याचा निर्णय घेतला आहे. एक खेळाडू म्हणून माझे सर्वोत्तम योगदान देण्यासाठी मी पूर्णपणे वचनबद्ध आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनसोबतचा माझा प्रवास सुरू ठेवेन, जेणेकरून आपण भविष्यात आणखी विजेतेपदे जिंकू शकू. अगामी हंगामासाठी मी खूप उत्सुक आहे.'

अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली मुंबईने २०२३-२४ हंगामात विजेतेपद पटकावत रणजी करंडकाचा सात वर्षांचा दुष्काळ संपवला होता. त्यानंतर संघाने २०२४-२५ हंगामात इराणी करंडकही जिंकला. कर्णधारपद सोडले असले तरी, आपला निवृत्तीचा कोणताही विचार नसल्याचे रहाणेने स्पष्ट केले आहे. तो सर्व प्रकारच्या क्रिकेटमध्ये एक फलंदाज म्हणून मुंबई संघासाठी खेळत राहणार आहे, असे त्याने व्यक्त केले आहे.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन. PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219